जातसे नीत बडी.

नीतिमार्गप्रदीप.



लेखक.

रंगो रामचंद्र अष्टेकर.

किमत आठ आणे.



राजाधिराज पंचम जॉर्ज आणि महाराणी मेरी
भरतखंडाचे बादशाह व बादशाहीण.
सन १९११.

चित्रशाळा प्रेस, पुणें.

नीतीपर व बोधप्रद पुस्तकमाला.

पुस्तक पहिलें.

नीतिमार्गप्रदीप.

रंगो रामचंद्र अष्टेकर.

यांनीं लिहिलें.

आवृत्ति पहिली.

पुणें येथें "चित्रशाळा" छापखान्यांत छापिलें.

सन १९१२.

किंमत आठ आणे.

हें पुस्तक **शंकर नरहर जोशी** यांनीं पुणें येथें
सदाशिव पेठ ८१८ चित्रशाळा स्टीम प्रेसमध्यें
छापलें, तें
रंगो रामचंद्र अष्टेकर, यांनीं मु० तासगांव,
ता० तासगांव, जि० सातारा येथें प्रसिद्ध केलें.

अर्पणपत्रिका.

दिल्लीदरबारचे चिरस्मरणार्थ

महाराष्ट्रीय संस्थानिक, राजे, रजवाडे,

जहागिरदार, सरदार

व

सर्व हिंदी राजनिष्ठ प्रजाजन

यांचे चरणीं

हें पुस्तक त्याच्या कर्त्यानें

परमादरानें

अर्पण केलें आहे.

सर्वांचा कृपाकांक्षी

रंगो रामचंद्र अष्टेकर.

पुस्तककर्ता.

प्रस्तावना.

मनुष्य जन्मतः चांगला किंवा वाईट असत नाहीं. त्या वेळीं ईश्वरानें प्रत्येक मनुष्याच्या मनांत चांगले व वाईट असे दोन्हीही परस्पर विरोधी विचार ठेविलेले असतात. मनुष्य बाल्यावस्थेपासून जसजसा मोठा होत जातो. तसतसा त्याच्याबरोबर वरच्यांपैकीं एक विचार वाढत जाऊन दुसऱ्या विचारापेक्षां प्रबल होतो. ह्या दोन विचारांपैकीं आपल्या अर्भकांबरोबर कोणचा विचार वाढूं द्यावा हा निर्णय आई-बापांनीं करावयाचा असतो. कोणत्याही आईबापाला आपलें लेंकरूं वाईट निपजावें असें वाटत नसतें, ही गोष्ट खरी आहे, तथापि पुष्कळ आईबाप आपल्या मुलांच्या वया-बरोबर कोणचा विचार वाढतो आहे, हें मुळींच पाहात नाहींत. वाईट विचार जागच्याजागीं खुडून टाकिले असतां ते पुढें प्रबल होण्याची भीति नसते. ह्या विचारांची वाढ भोंवतालच्या परिस्थितीवरही अवलंबून असते. तेव्हां वाईट विचारांच बीजारोपण मुलांच्या मनांत होऊं न देण्या-करितां आईबापांनीं व शिक्षकांनीं भोंवतालच्या परिस्थिती-कडे अवश्य लक्ष दिलें पाहिजे व त्यांना भल्याच्या संगतीला ठेविलें पाहिजे. कारण संगति व शिक्षण हीं जशीं असतील

त्याप्रमाणें मनुष्याच्या अंगीं चांगुलपणा अथवा वाईटपणा येतो.

संगति व शिक्षण यांशिवाय मनुष्य चांगला किंवा वाईट होण्यास, तिसरें कारण पुस्तकें होय. लहान मुलांनीं वाईट पुस्तकें वाचल्यास त्यांचीं मनें खात्रीनें बिघडतात. यासाठीं मुलांच्या हातांत चांगलीं पुस्तकें देण्याची खबरदारी पालक व शिक्षक यांनीं घेतली पाहिजे. उपदेश व उदाहरणें यांच्या योगानें मुलांचे वर्तनावर चांगला परिणाम घडतो व त्या योगानें तीं चांगलीं नीतिमान् होतात असा नित्याचा अनुभव आहे, म्हणून अशा तऱ्हेचीं जितकीं पुस्तकें विद्यार्थ्यांच्या हातांत पडतील तितकें फार चांगलें. नैतिक शिक्षण देणारीं जितकीं पुस्तकें निघतील तितकीं आज आपणांस हवींच.अशा पुस्तकांच्या वाचनानें तरुणांचें शील उत्कृष्ट बनतें. पाश्चात्त्य देशांत अशीं शेंकडों पुस्तकें नेहमीं बाहेर पडतात. अशापुस्तकांची आपल्या मराठी भाषेंत बरीच उणीव भासते, ती अंशत:तरी दूर व्हावी म्हणून हें छोटेंसें पुस्तक मराठी जाणणाऱ्या हिंदी तरुण विद्यार्थ्यांकरितां लिहिलें आहे.

नीति या शब्दाचा सर्व संमत अर्थ या पुस्तकाच्या प्रारंभींच नीति या सदराखालीं दिलेला आहे. परंतु तेवढ्यानेंच नीति या शब्दाचा सर्व अर्थ संपला असें नाहीं. कारण नीति या शब्दाचा अर्थ फार व्यापक आहे.

निरनिराळ्या वेळीं व काळीं नीति या शब्दाचा अर्थ भिन्न भिन्न केलेला आढळतो. त्या सर्व अर्थांचा विचार प्रस्तुत स्थळीं करितां येणें शक्य नाहीं. कारण, स्थलाभाव हें होय. नीति या शब्दाचा सांप्रत जो सहज अर्थ मनांत येतो तेवढ्यापुरताच या पुस्तकांत त्रोटक विचार केला आहे. व याप्रमाणें म्हटलें म्हणजे नीतीनें वागणें म्हणजे व्यवहारांत चांगल्या रीतीनें वागणें हें होय; व तें कसें वागावें हें पुढें या पुस्तकांत दिलेल्या विषयांची उपपत्ति व उदाहरणें यांवरून सहज लक्षांत येईल. अंधारांत मार्ग दाखविण्यास जसा दिव्याचा उपयोग होतो तसा व्यवहारांत नीतीनें वागण्यास सर्व तरुण स्त्री-पुरुषांस विशेषतः विद्यार्थ्यांस या पुस्तकाचा चांगला उपयोग व्हावा असा या पुस्तकाचा मूळ हेतु आहे. म्हणून या पुस्तकाचें नांव " नीतिमार्ग-प्रदीप " असें ठेविलें आहे.

इंग्लिश भाषेंत मॉरल क्लास, स्माइल्स कॅरेक्टर, Young man's own book वगैरे जीं पुस्तकें आहेत त्या धर्तीवर हें पुस्तक लिहिण्याचा प्रयत्न केलेला आहे. व तें तयार करण्याच्या कामीं मजला इंग्लिश, संस्कृत व मराठी यांतील बऱ्याच ग्रंथांचा उपयोग झाला आहे, त्याचप्रमाणें मराठी व इंग्लिश भाषेंत निघणाऱ्या भारदस्त व वजनदार वर्तमान-पत्रांचें व मासिक पुस्तकांचें बरेंच सहाय्य झालें आहे. याजबद्दल सदरहू ग्रंथकर्त्यांचा व संपादकांचा मी अत्यंत ऋणी आहें.

प्रथमतः या पुस्तकांत घालण्याकरितां नीतिपर व बोधप्रद असे बरेच निबंध उपपत्ति व उदाहरणें यांसह तयार केले. ते सर्व जर एकाच पुस्तकांत छापले असते तर पुस्तक बरेंच मोठें होऊन त्याची किंमत बरीच वाढली असती, व यामुळें तें साधारण स्थितींतील विद्यार्थ्यांस घेणें फार जड झालें असतें, व पुस्तककर्त्यावरही लक्ष्मीची कृपा नसल्यामुळें तें छापणें झालें नसतें. म्हणून ते भागशः (प्रत्येक पुस्तक सुमारें सवाशें पानांचें छापण्याचा विचार केला आहे. यापुढील पुस्तकें बाहेर पडणें केवळ लोकाश्रय व राजाश्रय यांवर अवलंबून आहे. यश देणार ईश्वर समर्थ आहे.

तासगांव येथील संस्कृत पाठशाळेचे अध्यापक सदाशिव शास्त्री भिडे, व इतर सद्गृहस्थ यांनीं, हें पुस्तक तयार करीत असतां, आपला अमोलिक वेळ खर्च करून माझी हस्तलिखित प्रत वाचून वेळोवेळीं ज्या सूचना केल्या त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

या पुस्तकासंबंधीं कोणीं उपयुक्त सूचना केल्यास, त्यांचा पुढील पुस्तकें छापते वेळीं व या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे वेळीं अवश्य विचार करण्यांत येईल व पुस्तककर्ता त्यांचा फार आभारी होईल.

मु० विटें, ता० खानापूर,
जि० सातारा.
ता. ९ नोवबर सन १९१२

रंगो रामचंद्र अष्टेकर.

अनुक्रमणिका.

जातसे नीत बडी.

नीतिमार्गप्रदीप.

१ नीति.

प्राणाघातान्निवृत्तिः परधनहरणे संयमः सत्यवाक्यम् ॥
काले शक्त्या प्रदानं युवतिजनकथामूकभावः परेषाम्॥
तृष्णास्रोतो विभंगो गुरुषु च विनयः सर्वभुतानुकंपा ॥
सामान्यः सर्व शास्त्रेष्वनुपहतविधिः श्रेयसामेष पंथाः १

भावार्थ—" प्राणिमात्रांचा घात करूं नये; दुसऱ्याचें द्रव्य हरण करण्याची इच्छा मनांतसुद्धां येऊं देऊं नये. नेहमीं खरें बोलावें. योग्य काळीं आपल्या शक्तीप्रमाणें सत्पात्रीं दानधर्म करीत असावें. परस्त्रीसंबंधाच्या गोष्टींत नेहमीं मौनव्रत धारण करावें. अप्राप्य किंवा अयोग्य वस्तूंचा अभिलाष करूं नये. वडिलांविषयीं अंगीं विनय असावा. अंगीं भूतदया असावी. येणेंप्रमाणें नीतीचे सामान्य नियम सर्व शास्त्रांस संमत आहेत. या नियमानें वागणें फार कल्याणप्रद आहे."

नीतीनें वागणें हें मनुष्यास अत्यंत सुखकारक आहे.

कारण, नीति ही प्राणीमात्रांच्या सुखवर्धनास अत्यंत उपयोगीं आहे. नीतीवांचून इतर सुखसाधनें अगदीं निरुपयोगीं आहेत. नीति हें सर्व उन्नतींचें बीज आहे. तरुणांचें शील उत्कृष्ट बनण्यास नीतीसारखें दुसरें साधन नाहीं. जशी विद्या तशी नीति ही सर्वांस अवश्य आहे. विद्येपेक्षां नीतीची योग्यता मोठी आहे. मनुष्य विद्या शिकून मोठा झाला, पण तो नीतीनें न वागतां जर अनीतीनें वागूं लागेल तर जगांत त्याला कवडीचाही मान मिळत नाहीं.

नीति ही भावी आयुष्यक्रमाचा पाया आहे. हा पाया जितका चांगला व मजबूत असेल, त्या मानानें पुढील आयुष्य सुखांत व समाधानांत जातें, म्हणून मानसिक व शारीरिक शिक्षणाप्रमाणें, किंवा त्यांहीपेक्षां विशेष अधिक काळजीनें विद्यार्थ्यांनीं नीतिशिक्षण संपादन केलें पाहिजे. लहानपणीं जसें मन वळवावें तसें वळतें म्हणून लहानपणापासूनच सर्वांनीं आपलें चित्त सुमार्गाकडे वळविण्याचा प्रयत्न करीत असावा, हें उत्तम.

" जे प्राणिमात्रावर दया करीत नाहींत, त्यांच्यावर परमेश्वर दया करणार नाहीं. प्रत्येक प्राणी परमेश्वराच्या परिवारांत गणला आहे. प्राणिमात्रांचें हित करण्यासाठीं

जो सर्वांपेक्षां अधिक प्रयत्न करतो, तोच ईश्वराचा सर्वांहून प्रिय सेवक होय. तोच त्याचा श्रेष्ठ भक्त होय." असें मुसलमानांचा साधु महंमद पैगंबर म्हणतो.

२ परमेश्वरभक्ति.

कां रे नाठविसी कृपाळू देवासी ॥
पोषितो जगासी एकलाची ॥ १ ॥
फुटे तरुवर उष्णकाळमासीं ॥
जीवन तयासी कोण घाली ॥ २ ॥
कोणें केली बाळा दुग्धाची उत्पत्ती ॥
वाढवी श्रीपती सवें दोन्ही ॥ ३ ॥
तुका म्हणे त्याचें नांव विश्वंभर ॥
करा निरंतर ध्यान त्याचें ॥ ४ ॥

तुकाराम.

जगांत कोणतीही क्रिया किंवा वस्तु कर्त्याशिवाय उत्पन्न होत नाहीं, हें आपण नेहमीं पाहतों. हाच नियम सृष्टीस लागू करण्यास हरकत नाहीं. सूर्याचा उदय व अस्त, चंद्राची वृद्धि व क्षय, समुद्राची भरती व ओहटी, ऋतूंचा क्रमवार बदल, इत्यादि गोष्टी नियमित-

पणें होत असतात, हें रोज आपल्या दृष्टीस पडतें. या सर्व गोष्टी कर्त्याशिवाय कशा होतील? यांस कोणी तरी कर्ता अवश्य असला पाहिजे; व तो सर्वज्ञ व सर्व शक्तिमान् असाच असला पाहिजे; पंचमहाभूतेंही त्याच्या हातांतील खेळण्याचीं बाहुलीं असलीं पाहिजेत; तरच विश्वांतील सर्व गोष्टी आंखल्याप्रमाणें-सुरळीत चालणार आहेत. असा जो अनुमानानें काढलेला सृष्ट पदार्थांचा कर्ता तोच परमेश्वर होय. त्यालाच ईश्वर, देव, जगच्चालक इत्यादि अनंत नांवें आहेत.

चंद्र, सूर्य, तारे इत्यादि ईश्वरानें उत्पन्न केलेले पदार्थ जरी दररोज आपल्या दृष्टीस पडतात, तरी प्रत्यक्ष परमेश्वर कोणास दिसत नाहीं. वसंतऋतूंत आपल्या शरीरास सुखप्रद होणारा शीतळ व मंद वायु आपणांस दिसत नाहीं, म्हणून वायु नाहीं म्हणतां येत नाहीं; कारण, स्पर्शेंद्रियानें वायु आपणांस जाणतां येतो, त्याप्रमाणें ईश्वर आपणांस प्रत्यक्ष न दिसला तरी तो आपणांस विचारशक्तीनें जाणतां येतो.

जेथें सर्वज्ञ, सर्व शक्तिमान् परमेश्वराचें चातुर्य पाहावयास सांपडत नाहीं, अशी तिलमात्रही जागा या अफाट जगांत सांपडावयाची नाहीं. मनुष्य विचारपूर्वक जर सृष्टिरचनेकडे पाहील तर त्यास तींतील चमत्कार व सृष्टिकर्त्याचें

चातुर्य यांचें आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाहीं. ईश्वराची अगाध करणी पाहून ज्याच्या चित्तास समाधान होत नाहीं, असा मनुष्य या भूतलावर सांपडणें फार कठिण आहे. ईश्वरनिर्मित सृष्टिसौंदर्यापासून जो आनंद होतो तो आनंद अनुपमेय आहे.

ईश्वर सर्वज्ञ असून सर्वव्यापी आहे. सर्व प्राणिमात्रांचें संरक्षण तोच करितो. ज्याच्या पोटापाण्याची कांहीं एक सोय देवानें करून ठेविली नाहीं, असा एकही जीव या सृष्टींत सांपडावयाचा नाहीं. त्यानें प्रत्येक प्राण्याच्या पोषणाची केलेली व्यवस्था पाहून त्याच्या दयाळूपणाची साक्ष आपल्या हृदयाशीं पटते. लहान मूल उपजतें तेव्हां उपजल्याबरोबर त्याच्या पोटाला कांहीं तरी पाहिजे, म्हणून मातेच्या स्तनांत परमेश्वर अगोदरच दूध उत्पन्न करून ठेवितो. उत्तरध्रुवाकडे लापलंड नांवाचा एक देश आहे. तेथें अतिशय थंडी असते, धान्य अगदीं पिकत नाहीं, व गाई म्हशी वगैरे जनावेरंही नाहींत; परंतु परमेश्वरानें रेनडिअरनामक प्राणी तेथें उत्पन्न केले आहेत. त्या प्राण्यांच्या योगानें लापलंड देशांतील लोकांस निर्वाहाच्या सर्व वस्तु प्राप्त होतात. हबसी देशांत पर्जन्य मुळींच पडत नाहीं, परंतु तेथें नाइल नांवाच्या नदीस योग्य वेळीं पूर येऊन धान्य पिकावें अशी योजना देवानें

करून ठेविली आहे. सारांश सर्व प्राणिमात्रांच्या पोटाची व्यवस्था परमेश्वरानें करून ठेविली आहे. कधीं कधीं असें मात्र घडतें कीं, देवाची योजना अतर्क्य असल्यामुळें ती मानवी प्राण्याच्या एकाएकीं लक्षांत येत नाहीं, म्हणून देव दीनाची उपेक्षा करितो असें म्हणणें केवळ अज्ञान होय.

परमेश्वराच्या इच्छेशिवाय विश्वांतील एक पानही हालत नाहीं. त्याच्या प्रेरणेवांचून मानवी बुद्धीचे सर्व प्रयत्न निष्फळ होतात. म्हणून मनुष्यानें नेहमीं परमेश्वराची भक्ति केली पाहिजे. परमेश्वराचे सर्व प्राण्यांवर अनंत उपकार आहेत, त्यांतल्या त्यांत मनुष्यप्राण्यावर तर त्याचे फारच उपकार आहेत. कारण कोणत्याही इतर प्राण्यांस न दिलेली अशी एक देणगी त्यानें मनुष्यास दिली आहे. ती देणगी बुद्धि ही होय. क्षणोक्षणीं शेंकडों महा-विपत्ति मनुष्यप्राण्यावर येण्याचा संभव असतो; त्याच्यावर कोठें, केव्हां व कसें संकट प्राप्त होईल याचा नेम नाहीं. ज्यांचा तिलमात्र संभव नाहीं, अशा विपत्ति त्यास अक-स्मात् प्राप्त होतात; कित्येक प्रसंगीं पुढें संकट येणार असें कळलें, तरी मनुष्याचे हातीं त्याचें निवारण कर-ण्याचें सामर्थ्य नसतें. अशा दुर्बल स्थितींत मनुष्य आहे, म्हणून ईश्वरभक्तीशिवाय त्यास दुसरा तरणोपायच नाहीं.

या विश्वरूप खेळाचा सूत्रधार परमेश्वर आहे. त्याच्या इच्छामात्रेंकरून सर्व कांहीं घडतें. जे नीतीनें वागून परमेश्वराची भक्ति करितात, त्यांस तो कधींही विसरत नाहीं. जो परमेश्वराची भक्ति करीत नाहीं, जो परमेश्वरावर भरंवसा ठेवीत नाहीं, त्याचें अंतःकरण सर्वदा चिंताग्रस्त असतें. त्यास कोणत्याही गोष्टींत यश येत नाहीं. ईश्वरावर निष्ठा ठेवणाराचें सर्वदा कल्याण होतें. ईश्वरावर भरंवसा असला म्हणजे मनुष्यास फारशीं संकटें व अडचणी येत नाहींत, आल्याच तर त्या सहज दूर होतात. ईश्वरभक्तीनें अंगीं नम्रता येते. साधुसंत वगैरे परमेश्वराची भक्ति करणारे किती नम्र असतात बरें ? त्यांच्या अंगीं गर्व किंवा ताठा अगदीं नसतो. आपण फार दुर्बल आहों, म्हणून ईश्वराच्या साहाय्याशिवाय आपल्या हातून कोणतेंही सत्कृत्य सिद्धीस जावयाचें नाहीं, म्हणून आपण परमेश्वराची भक्ति अनन्यभावें केली पाहिजे. जो परमेश्वरावर भरंवसा न ठेवितां मी अमुक करीन मी तमुक करीन असें मानितों, त्याच्या अंतःकरणाला कधींही स्वस्थता नसते. तो सदा अस्वस्थ असतो. ईश्वरभक्ति करणारा मनुष्य सर्वदा शांत व आनंदी असतो. ईश्वरभक्ति हें खऱ्या सुखाचें एकच साधन आहे. परमेश्वरी कृपेनें मनुष्याच्या अंगांत आपलें हित करण्याचें सामर्थ्य येतें. एवढेंच

नव्हे, तर सर्व जगाचेंही कल्याण करण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं येतें.

सर्व जगाची उत्पत्ति, स्थिति व लय करणारा परमेश्वर एकच आहे. निरनिराळ्या देशांतील, भिन्नभिन्न धर्माच्या लोकांनीं परमेश्वराला निरनिराळीं नांवें दिलीं आहेत; व ते त्याला अनेक नांवांनीं भजतात. बाकी परमेश्वर मात्र एकच आहे. ज्याप्रमाणें अनेक नद्या, अनेक पर्वतांत उगम पावून, सरळ किंवा वक्रमार्गानें वाहात वाहात अखेर सागरास जाऊन मिळतात, त्याप्रमाणें निरनिराळ्या मनुष्यांनीं आपआपल्या धर्माप्रमाणें जरी भक्तीचे वेगळे वेगळे साधनमार्ग स्वीकारले तरी ते सर्व एकाच परमेश्वराला जाऊन मिळतात. मनुष्य कोणत्याही धर्मास किंवा धर्मपंथास अनुसरणारा असला तरी त्याला ईश्वराची भक्ति ही केलीच पाहिजे. मग ती भक्ति नीतीस अनुसरून कोणत्या पाहिजे त्या स्वरूपाची असली तरी हरकत नाहीं. असो.

ईश्वर आहे, तो दयाळू, सर्वज्ञ व सर्वसाक्षी आहे, त्याला चुकवून आपणाला कोणतीही गोष्ट करतां यावयाची नाहीं; म्हणून नेहमीं परमेश्वराची भीति बाळगून त्याची प्रार्थना करावी व त्यास संतुष्ट ठेवावें हें आपलें पहिलें कर्तव्य होय, व तें करण्यास कोणीही चुकूं नये.

निर्जनवनांत भगवंताचें स्मरण कर. अनाहार हाच तुझा श्रेष्ठ आहार होय. उपासना हीच तुझी श्रेष्ठ विश्रांति होय.

ज्या नमाजांत हृदय नम्र होत नाहीं तो नमाज भगवंताला ग्राह्य नाहीं.

महंमद पैगंबर.

देव आकाशांत वास करीत असतो, त्याप्रमाणें भक्तांच्या हृदयांतही वास करीत असतो. भक्ताच्या हृदयासारखें दुसरें पवित्र देवालय नाहीं.

ध्रुवाची ईश्वरभक्ति.

पूर्वी भरत खंडांत उत्तानपाद नांवाचा एक राजा होऊन गेला. त्याला दोन बायका होत्या. त्यांचीं नांवें सुनीति व सुरुचि अशीं होतीं. सुनीतीला ध्रुव व सुरुचीला उत्तम या नांवांचे पुत्र होते. पुढें कांहीं कारणावरून राजानें सुनीतीचा त्याग केला, व सुरुचीवर तो प्रेम करूं लागला. एके दिवशीं ध्रुवानें आपल्या आईस विचारिलें " माझा बाप कोणता " ? हें ऐकून सुनीतीस फार वाईट वाटलें व तोंडांतून शब्द निघेना, व मुलगा तर बापाचें नांव सांगण्याविषयीं हट्ट घेऊन बसला. तेव्हां नाइलाजास्तव

तिनें सांगितलें कीं, " उत्तानपाद नांवाचा जो सार्वभौम राजा आहे तोच तुझा पिता." हें ऐकून ध्रुव म्हणाला, " मी बापाजींच्याकडे जातो." तेव्हां सुनीति म्हणाली " तेथें तुझी सावत्र आई आहे, ती तुझा फार द्वेष करिते यास्तव तूं तिकडे जाऊं नको." तरी तो गेलाच. त्या वेळेस राजा उत्तमास मांडीवर घेऊन खेळवीत होता, इतक्यांत ध्रुवानें जाऊन बापास साष्टांग नमस्कार घातला व नम्रपणें त्याच्यापुढें हात जोडून उभा राहिला. तेव्हां मुलाचा नम्र स्वभाव व सौंदर्य पाहून राजाचें मन गहिंवरून आलें, व पुत्रप्रेमाचा त्याला उभाळा येऊन त्यानें ध्रुवास उचलून मांडीवर घेतलें. हें सुरुचीस सहन झालें नाहीं. तिनें लाथ मारून ध्रुवास खालीं पाडलें. आणि म्हणाली " या मांडीवर बसण्यास माझ्याच पोटीं आलें पाहिजे." नंतर ध्रुव आईकडे रडत आला व तिला सर्व वर्तमान सांगितलें. तें ऐकून सुनीतीस फारच वाईट वाटलें, आणि ती म्हणाली " बाळा देवाच्या कृपेवांचून राज्य मिळावयाचें नाहीं." तेव्हां तो मुलगा आईचें समाधान करून ईश्वरप्राप्तीसाठीं अरण्यांत गेला. व तेथें त्यानें घोर तपश्चर्या करून ईश्वरास प्रसन्न करून घेतलें. त्यास देवाचें प्रत्यक्ष दर्शन होऊन, त्याला ध्रुवपद मिळालें.

———

अकबराची परमेश्वरनिष्ठा.

अकबर मोठा ईश्वरभक्त होता. ज्या ईश्वराच्या कृपेनें एवढें मोठें राज्यवैभव आपणास लाभलें आहे, त्याच्यापुढें आपली कृतज्ञता दिवसांतून एक वेळ तरी दाखवावी असा त्याचा परिपाठ असे. बहुतेक तो मोठ्या पहांटेस उठे, व उठल्यानंतर चूळ भरून, हात, पाय व तोंड स्वच्छ धुऊन आपल्या महालाजवळच्या एकांत जागीं असलेल्या एका उघड्यां पाषाणावर बसून घटका दोन घटका परमेश्वराचें अगदीं एकाग्र मनानें चिंतन करीत असे. थंडी असो वा पाऊस असो हा त्याचा नियम कधींही चुकत नसे. या वेळीं त्याच्या अंगांत फक्त एक स्वच्छ पांढरी कफनी असे. तो आपल्या प्रार्थनेंत म्हणे कीं " हे परमेश्वरा, हें सर्व राज्य तुझें आहे, व मी तुझा ताबेदार नोकर आहें. मला सांभाळ, व सद्बुद्धि दे. "

ईश्वरनिष्ठा व पतिनिष्ठा.

इ० स० १८७१ सालीं माजी सम्राट् एडवर्ड महाराज यांच्या जिवावरचें दुखणें गेलें त्या वेळेस महाराज्ञी अलेक्झँड्रा यांनीं त्यांची रातंदिवस एकसारखी शुश्रूषा केली. एके दिवशीं रात्रीं त्यांची प्रकृति फारच बिघडली. त्यामुळें सर्व मंडळी अगदीं

घाबरून गेली, व आतां महाराजांचें काय होतें याबद्दल सर्वांस मोठी धास्ती पडली. परंतु दुसरे दिवशीं त्यांना किंचित् बरें वाटलें. त्या दिवशीं रविवार होता. तो दिवस प्रार्थनेचा होता. त्या वेळीं अलेक्झँड्रा महाराणी-साहेबांनीं धर्माध्यक्षांस एक पत्र लिहिलें त्यांतील सारांश खालीं लिहिलेप्रमाणें आहे. "माझे भ्रतार यांस आज किंचित् बरें वाटत आहे, ही परमेश्वराची मजवर मोठी कृपा आहे. मी देवालयांत प्रार्थनेस येत आहें. आपली प्रार्थना व उपदेश संपण्यापूर्वींच मला तेथून महाराजांच्या शुश्रूषेकरितां परत यावें लागेल म्हणून प्रार्थनेच्या पूर्व भागांतच आपण जर महाराजांच्या आरोग्याविषयीं परमेश्वरास प्रार्थना कराल तर मलाही आपणांबरोबर ईशस्तवन करण्यास ठीक पडेल."

या पत्रावरून ईश्वराच्या ठिकाणीं त्यांची भक्ति, व परमेश्वरावर त्यांचा पूर्ण भरंवसा हे दोन गुण दिसून येतात. त्याचप्रमाणें पतिनिष्ठा व उच्च प्रकारची कर्तव्य-दक्षता हींही त्यावरून चांगली व्यक्त होतात.

त्याचप्रमाणें एडवर्ड महाराजांच्या निधनानंतर त्यांनीं स्वतः प्रजाजनांस एक पत्र लिहिलें आहे त्यांत त्या म्हण-तात—"ज्या अर्थी परमेश्वरास हें दुःख आम्हांस देणें बरें वाटलें, त्या अर्थी तें सहन करण्याची शक्तीही

त्यानेंच आम्हांस द्यावी. हें दुःख सर्वांत मोठें आहे. ईश्वरी इच्छा प्रबळ आहे ती कधींही चुकावयाची नाहीं."

"ह्या जगामध्यें मला पुढें जें कांहीं करावें लागेल, किंवा भोगावें लागेल त्यांतून पार पडण्यास मला परमेश्वरानें कृपा करून साह्य करावें, म्हणून तुम्ही परमेश्वराची प्रार्थना करीत असतां त्या वेळीं मजविषयीं नित्य दोन शब्द बोलण्याचें स्मरण ठेवा."

जॉर्ज महाराजांचा मुलांस उपदेश.

इ० स० १९०१ सालीं आपले बादशहा, जॉर्ज महाराज हे युवराज असतां आपल्या एका वसाहतींत प्रवासास गेले होते. त्या वेळीं त्यांनीं एका बक्षीस-समारंभाचे वेळीं मुलांना उद्देशून म्हटलें कीं, "मुलांनो कोणतेंही काम करावयाचें झालें तरी तें आपल्या हातून होईल तितकें चांगलें करण्याचा यत्न करा; आपण सर्व राज्यांतील प्रजा बंधु आहों हें लक्ष्यांत ठेवा; आपल्या मातापितरांची, राजाची व देवाची एकनिष्ठेनें सेवा करा."

केवळ ईश्वरी कृपेमुळें !

एके वेळीं एक गलबत अमेरिकेंतल्या वेस्ट इंडीज

बेटांतून इंग्लंडला यावयास निघालें. बरीच मजल मारल्या-वर, भर समुद्रांत, किनाऱ्यापासून दूर असतां त्याच्या तळास एक मोठें भोंक पडलें, व त्यांतून भराभर पाणी वर येऊं लागलें. तें पाणी भरून काढण्यास खलाशांनीं व गलबतांतील इतर उतारूंनीं पराकाष्ठेचे श्रम केले. परंतु कांहीं केल्या पाणी हटेना. आतां गलबत बुडून सर्वांचा नाश होतो असें वरच्या मंडळीस वाटून ती धाय मोकलून रडूं लागली. सगळ्या गलबतावर जिकडे तिकडे रडारडी सुरू झाली. त्या उतारूंत एक कोट्या-धीश सावकार आपल्या सगळ्या संपत्तीसह व मुलांमाणसां-सह आंत बसला होता. तोही, आपल्या सर्वांचीं शंभर वर्षें भरलीं, आतां आपणांस मेलेंच पाहिजे म्हणून परमे-श्वराचें नांव घेऊन गंभीरपणें मरण्यास तयार झाला.

इतक्यांत एका क्षणांत गलबतांत पाणी येण्याचें आपो-आप बंद होऊन गलबत पुन्हा पूर्ववत् कोरडें ठणठणींत होऊन चालूं लागलें. हें कशानें झालें हें तेव्हां कोणास कळलें नाहीं, यामुळें सर्वांस मोठा अचंबा वाटून मोठा आनंदी आनंद झाला.

पुढें तें गलबत पुढच्या मुक्कामाला जाऊन एका सुर-क्षित बंदरीं लागलें. तेथें गेल्यावर भोंक बंद होण्याचें कारण पाहतात तों एक मोठा थोरला मासा आपण होऊन

आपल्या सुखाकरितां त्या भोंकांत येऊन गच्च बसला होता. यामुळें तें पाणी बंद झालें होतें असें दिसून आलें.

ही ईश्वरी कृपा नव्हे तर दुसरें काय?

पुढें त्या कोट्याधीश सावकारानें या गोष्टीच्या स्मरणार्थ ब्रिस्टोलनामक शहरांत फुकट शिक्षण देण्याकरितां एक शाळा स्थापन केली, व त्या शाळेंतील विद्यार्थ्यांनीं आपल्या छातीवर माशाचा छाप असलेला बिल्ला अडकवावा असें ठरविलें.

३ राजनिष्ठा.

ना विष्णुः पृथिवीपतिः ।

राजा हा देवाचा अंश असतो असें आर्य धर्मांत सांगितलें आहे. देवानें मानवी प्राण्यावर जसे अनंत उपकार करून ठेविले आहेत, तसे राजाचेही त्याच्या प्रजेवर अनंत उपकार झालेले असतात. देवाच्या खालोखाल राजाच सर्व लोकांचें कल्याण करितो.

ज्या देशांत राजा नसतो त्या देशांतील प्रजेची दुर्दशा होते. कारण, राजा नसला म्हणजे दुर्जन व दुष्ट लोकांचें प्राबल्य फार माजतें. ते बलिष्ठ होऊन गोरगरीब लोकांवर

फार जुलूम करितात. ते गरिबांचीं शेतें लुटतात. चोऱ्या करितात, मारामाऱ्या व खून करितात, दुर्बळ लोकांच्या बायका व मुलें पळवून नेतात, व त्यांचे नाना तऱ्हांचे हाल करून त्यांची फार विटंबना करितात. अशा दुष्ट लोकांना कोणी शासन करणारा नसतो म्हणूनच हे दुष्ट लोक अंदाधुंदी करण्यास प्रवृत्त होतात.

ज्या देशांत राजा नसतो त्या देशाला संस्कृत भाषेंत अराजक देश म्हणतात. अशा अराजक देशांत उदीम व व्यापार अगदीं चालत नाहींत; शेतकीस कोणी उत्तेजन देत नाहीं; कलाकौशल्याची वृद्धि होत नाहीं; अशा देशांत पितापुत्र व पतिभार्यादिक संबंध राहात नाहींत. अराजक देशांत उत्सव होत नाहींत. त्याचप्रमाणें सडका तयार करणें, तळीं बांधणें, गांवोगांव शाळा स्थापन करणें वगैरे जीं लोककल्याणाचीं कामें तीं तर मुळींच होत नाहींत. कारण अशीं कामें काढण्यास व त्यांना चिर-स्थायी स्वरूप देण्यास स्वस्थता लागते ती स्वस्थता अराजक देशास मिळत नाहीं. अराजक देशांत हवी ती वस्तु मिळत नाहीं, व मिळाली तर तिचें रक्षण होत नाहीं. अराजक देशांतील लोक नेहमीं अडाणी व रानटी स्थितींतच राहतात. त्यांना खावयास पोटभर अन्न व पांघरावयाला जाडेंभरडें अंगभर वस्त्रही मिळत नाहीं. अशा देशांतील

लोक रानटी जनावरांचें मांस खातात व त्याच जनावरांचीं कातडीं वगैरे पांघरून कसा तरी आपला निर्वाह करितात. त्यांचीं राहण्याचीं घरें चांगलीं नसतात. झाडपाल्यांच्या कशा तरी झोंपड्या बांधून ते थंडीवाऱ्यापासून आपलें रक्षण करितात. त्यांच्यांत विवाहासारखे सामाजिक व नैतिक निर्बंध नसतात. सारांश अशा देशांतील लोकांत व पशूंत फारसा फरक नसतो.

परंतु ज्या देशाला राजा असतो त्या देशाची स्थिति वर लिहिलेल्या देशाच्या अगदीं उलट असते. म्हणजे त्या देशांत जिकडे तिकडे स्वस्थपणा असतो. त्या देशांत चोरी, मारामारी, खून वगैरे अनर्थांच्या गोष्टींचा बंदोबस्त असतो, यामुळें या गोष्टी फार क्वचित् घडतात. व्यापार व उदीम हीं वाढतात. त्या देशांतील लोक नाना तऱ्हांचे कलाकौशल्याचे पदार्थ तयार करितात. शेतकींत सुधारणा होऊन सर्व तऱ्हांचीं धान्यें व फळें उत्पन्न होतात. देशांत पडजमीन फार थोडी राहाते. कारण शेतकरी लोक जमिनींत जी मेहनत करितात त्याचें फळ त्यांस मिळण्याची खातरी असते. म्हणून ते होईल तितकी जमीन लागवडीस आणितात; गांवोगांव शाळा स्थापण्यांत येतात, यामुळें सर्व प्रजा सुशिक्षित होते, तेणेंकरून आपआपलीं कामें चांगल्या तऱ्हेनें करण्याची पात्रता त्यांच्या अंगीं येते.

देशांत आगगाड्या, तारायंत्रें, पोस्ट ऑफिसें, दवाखाने वगैरे लोककल्याणाचीं कामें, ज्यांस स्वस्थपणा पाहिजे तीं सर्व स्थापन होतात, व त्यांस कायमचें स्वरूप प्राप्त होतें. देशांत छापखाने स्थापन होतात, त्यामुळें चांगलीं चांगलीं पुस्तकें सुलभ रीतीनें तयार होतात; देशांत विद्वान् लोकांची संख्या जास्त वाढते, व असे निरनिराळ्या ठिकाणचे विद्वान् लोक एके ठिकाणीं जमून नाना तऱ्हांच्या उपयुक्त विषयांची वाटाघाट करितात, व नवीन नवीन शोध लावितात, त्या योगें मानवी प्राण्यांच्या सुखांत दिवसेंदिवस अधिकाधिक भर पडत जाते. सारांश देशास राजा असला म्हणजे त्या देशाची सर्व बाजूंनीं भरभराट होते. अशा देशांत कोणी कोणावर जुलूम करीत नाहींत; सर्व लोकांस सारखा न्याय मिळतो. कोणी दंगाधोपा केल्यास राजा त्याचा बंदोबस्त करितो, व गरीब रयतेचें दुष्टांपासून संरक्षण करितो.

यावरून असें सिद्ध होतें कीं, राजा ही मानवी देवता आहे, राजा हा इहलोकचा देव आहे, त्याला लोकपाल ही संज्ञा अगदीं यथार्थ आहे. कारण तो नाना तऱ्हांनीं लोकांचें संरक्षण करितो. ज्याप्रमाणें पर्जन्य हा सर्व प्राणी-मात्राचें संरक्षण करण्यास अत्यंत अवश्य आहे, त्याप्रमाणेंच राजाही अवश्य आहे. बाप जसा मुलाचें पालन काळजी-

पूर्वक करून त्याला विद्या शिकवितो त्याप्रमाणें राजा हा प्रजेचें पालन पुत्रवत् करून तिला ज्ञानामृत पाजितो. मूल आजारी पडलें म्हणचे जशी आईबापांना काळजी उत्पन्न होते, तशी काळजी देशांत एखादा रोग उत्पन्न होऊन प्रजा मरूं लागली म्हणजे राजालाही उत्पन्न होते, ज्याला आईबाप नाहींत त्याचे आईबाप राजा होय. वृक्ष जसे वृष्टि व ऊन सोसून आपल्या आश्रयास बसणाऱ्या सर्व प्राण्यांचें संरक्षण करितात तसे राजे अनेक प्रकारच्या काळज्या व जबाबदाऱ्या आपल्या शिरावर घेऊन आपल्या छत्राखालीं असणाऱ्या सर्व प्रजेचें पालन करितात. राजांला प्रजेबद्दल नेहमीं काळजी वहावी लागते, यामुळें त्यांना स्वस्थता कधींही नसते. इंग्लिश भाषेंत अशी एक म्हण आहे कीं " ज्या मस्तकावर मुकुट असतो, तें मस्तक नेहमीं अस्वस्थ असतें." ज्याप्रमाणें परमेश्वर भक्तांसाठीं नाना तऱ्हांचीं संकटें सोसण्यास तयार असतो, त्याप्रमाणें राजाही राजनिष्ठ प्रजेकरितां आपलें सर्वस्व खर्चण्यास तयार असतो.

मनुस्मृतींत असें म्हटलें आहे कीं " अराजक स्थितींत लोकांचें रक्षण करणारा कोणी नसतो, यामुळें सर्वत्र गोंधळ होऊन जातो. ह्या साठीं लोकांच्या सुस्थितीकरितां व रक्षणाकरितां देवानें राजाची उत्पत्ति केली आहे. इंद्र, वायु,

यम, सूर्य, अग्नि, वरुण, चंद्र आणि कुबेर यांच्या अंशांपासून राजाला उत्पन्न केलें आहे. यामुळें तो सर्व जीवांहून श्रेष्ठ आहे. राजाचा कोणीं अपमान करूं नये, व त्याच्या आज्ञेचें उलंघन करूं नये. कारण तो नररूपी देवच आहे. " अशी मनुस्मृतींत आज्ञा आहे व आर्य लोक राजाला देवता असें मानीत आले आहेत. हें पुढें लिहिलेल्या एकाच प्रचलित चालीवरून सिद्ध होतें. ती चाल ही कीं, मुकुट, छत्रचामरें, इत्यादि राजचिन्हें व देवतांचीं चिन्हें सारखींच असतात. लोक देवावर जशीं चवऱ्या व मोरचलें उडवितात, त्याप्रमाणेंच ते राजावरही दरबारच्या वेळीं चवऱ्या व मोरचलें उडवितात.

याप्रमाणें राजावर चवऱ्या व मोरचलें उडवून त्याला देवाप्रमाणें मान देणें हें प्रजेचें आद्य कर्तव्य होय. कारण, राजा हा आपल्या सुखाची पर्वा न करितां प्रजापालनाचें आपलें पवित्र कर्तव्यकर्म नेहमीं बजावीत असतो. म्हणून प्रजनहीं आपल्या हृदयांत कृतज्ञताबुद्धि जागृत ठेवून राजाचे उपकार स्मरले पाहिजेत. त्याला वेळोवेळीं स्वस्थता राखण्याचे कामीं मदत केली पाहिजे. राजा जे जे कायदे करितो ते ते अवश्य पाळले पाहिजेत. कारण, राजाचे कायदे प्रजेच्या हिताकरितांच केलेले असतात. त्यांत त्याचा स्वार्थ कांहींही नसतो. प्रजेचें न्यायानें व व्यवस्थेनें

पालन व्हावें म्हणूनच तो कायदे करितो. राजाच्या हातून अन्याय कधींही घडत नाहीं; हें सर्वांनीं लक्ष्यांत ठेवावें.

एकट्या राजाच्या हातून प्रजापालनाचीं सर्व कामें व्यवस्थेशीर होणें शक्य नसतें, म्हणून तो आपल्या हाताखालीं निरनिराळे अधिकारी नेमितो. ज्याप्रमाणें आपण राजाला मान देतों त्याप्रमाणें त्याच्या अधिकाऱ्यांलाही दिला पाहिजे. कारण राजाचे अधिकारी हे राजपुरुषाचे अवयवच होत. अधिकारीवर्गाचा मान व बोज आपण ठेविला म्हणजे तो राजाचाच मान ठेविल्यासारखें आहे. आपल्या एखाद्या इंद्रियांस इजा झाली म्हणजे जसें आपलें सर्व शरीर अस्वस्थ होतें, तसें एखाद्या अधिकाऱ्याला एखाद्या दुष्ट प्रजाजनाकडून त्रास झाला म्हणजे तो प्रत्यक्ष राजालाच त्रास दिल्यासारखें होतें. ज्याप्रमाणें राजा हा ईश्वराचा अंश असतो त्याप्रमाणें त्याचे अधिकारीही थोड्या-बहुत प्रमाणानें ईश्वरी अंश असतात. कारण, राजा हा त्यांना आपलाच थोडासा अधिकार देऊन प्रजापालनाच्या कामीं त्यांची नेमणूक करितो, म्हणून राजाच्या अधिकाऱ्यांचे हुकूम मानणें हें आपलें कर्तव्यच होय.

आपल्या पूर्वपुण्याईनें आपल्याला विद्याचारसंपन्न असे बादशाह पांचवे जॉर्ज महाराज, व त्यांचे अधिकारी मिळाले

आहेत. इंग्रज सरकार सुधारलेलें आहे, नीतीमान् आहे व त्यांची सदसद्विवेकबुद्धि जागृत आहे. ब्रिटिश सरकारच्या अमलाखालीं आपलें कोटकल्याण झालें आहे, व होणारही आहे. होईल तितकें हिंदुस्थानचें कल्याण करण्याचा इंग्लिश सरकारचा हेतु आहे. ब्रिटिश साम्राज्य झाल्यापासून या देशांतील कोट्यवधि प्रजाजनांत शांतता, समृद्धि, व प्रगति यांची अभिवृद्धि झाली आहे. विद्यावृद्धि तर पुष्कळच झाली आहे. व्यापार वाढला आहे. आगगाड्या, तारायंत्रें, पोष्ट ऑफिसें, कालवे, न्यायाचीं कोर्टें वगैरे अनेक उपयुक्त व नवीन संस्था निर्माण झाल्या आहेत. आपल्या दयाळू महाराणी व्हिक्टोरिया यांच्या कारकीर्दीपासून सुरू झालेल्या व परम पूज्य सातवे एडवर्ड बादशहा यांनीं पोषण केलेल्या प्रत्येक सुधारणेचें पाऊल पुढें पुढें पडत आहे. सर्व प्रजाजनांना सारखें वागविण्यांत येत आहे. सरकारी नोकरी देतांना वर्णाकडे न पाहतां केवळ गुण व परीक्षा यांकडे पाहूनच नोकरी देण्यांत येत असते. यांच्या राज्यांत धर्माबद्दल कोणावरही जुलूम होत नाहीं. प्रत्येकाला आपापल्या धर्माप्रमाणें वागण्याची मुभा आहे. कायद्याच्या दृष्टीनें या देशांतील सर्व लोक सारखे आहेत. असें वेळोवेळीं जाहीर करण्यांत आलें आहे. या राजकर्त्यांनीं आम्हांला ज्ञानामृत पाजून जागृत

केलें आहे. यांच्या राज्यांत पूर्व व पश्चिम यांमधील उत्तमोत्तम गुण एकवटले आहेत. कारण, इंग्लिश राज्य इकडे सुरू झाल्यापासून यूरोप व आशिया यांच्यामधील, व विशेषतः इंग्लंड व हिंदुस्थान यांमधील, दळणवळण फारच वाढलें आहे. सारांश ब्रिटिश राज्यछत्राखालीं हिंदुस्थानचें अपार हित आहे, म्हणून ब्रिटिश तक्ताशीं राजनिष्ठपणें वागणें हें आपलें कर्तव्य कर्म आहे व तें आपण मनोभावानें नित्य बजाविलें पाहिजे.

जगांत सर्वांत अत्युत्तम देखावा कोणता? राज्याभिषेक. कोणत्या गोष्टीसंबंधानें लोक पुष्कळ बोलतात? राज्याभिषेकासंबंधानें. कोणती गोष्ट झाल्यानें अत्यानंद वाटतो? राज्याभिषेक.

वालपोल.

ईश्वर आमच्या राजास दीर्घायु करो.

वीरवराची राजनिष्ठा.

पूर्वीं शूद्रक नांवाचा एक राजा होऊन गेला. एके दिवशीं त्याच्या राज्यांत वीरवर नांवाचा एक राजपुत्र दुसऱ्या एका देशाहून आला आणि राजवाड्यापाशीं

जाऊन द्वारपालास म्हणाला " मला चाकरी पाहिजे आहे, करितां मला राजाकडे नेऊन भेटव." द्वारपालानें त्याला राजाजवळ नेऊन भेटविलें. तेव्हां वीरवर म्हणाला, "महाराज, मला आपल्या पदरीं चाकरीस ठेवा."

शूद्रक—तुला किती वेतन पाहिजे? वीरवर-महाराज, माझें वेतन रोज पांचशें होन आहे.

शूद्रक—तुझ्याजवळ असें साधन तरी काय आहे?

वीरवर—दोन हात व तिसरी तरवार.

शूद्रक—आम्हांला एवढ्या वेतनाचा मनुष्य नको.

हें ऐकून वीरवर जाऊं लागला. तेव्हां प्रधान म्हणाला, "महाराज याला कांहीं दिवस रोजमुरा देऊन ठेवावें, व हा काय पराक्रम करतो तें पहावें. प्रधानाचें भाषण ऐकून राजानें वीरवरास बोलावून आपल्या पदरीं ठेविलें. पांचशें होनांचें वीरवर काय करितो याची चौकशी राजा गुप्तपणें करीत होता. त्या द्रव्यापैकीं वीरवर देवब्राह्मणांस अर्धें देत असे, बाकी राहिलेल्यांतून अर्धें संकटांत पडलेल्या मनुष्यांस देत असे, व बाकी आपल्या खाण्यापिण्याकडे खर्च करीत असे. याप्रमाणें रोज करून अहोरात्र हातांत तलवार घेऊन राजवाड्याच्या देवडीवर बसलेला असे. राजानें आज्ञा दिल्यास आपल्या बिऱ्हाडींही जात असे.

एके वेळीं कृष्णपक्षांत चतुर्दशीचे रात्रीं कोणी रडत आहे असें राजानें ऐकिलें. तेव्हां तो म्हणाला, "पाहऱ्यावर कोण आहे रे?

वीरवर—महाराज, मी वीरवर आहें.

राजा—काण रडतें याचा शोध करून ये.

"आज्ञा महाराज" असें म्हणून वीरवर शोधास गेला. तो गेल्यावर राजास वाटलें ह्या एकट्या राजपुत्रास अशा काळोख्या रात्रीं पाठविलें हें योग्य नाहीं. याकरितां याच्या मागून जाऊन काय आहे तें आपण देखील पहावें. नंतर राजाही तरवार घेऊन त्याच्यामागून शहराच्या बाहेर गला. वीरवर पुढें गेला. त्यानें एक तरुण, रूपवती सर्व अलंकारांनीं भूषित अशी स्त्री पाहिली. तेव्हां त्यानें विचारिलें "तूं कोण? कां रडतेस?"

स्त्री म्हणते—"मी या शूद्रक राजाची राज्यलक्ष्मी आहें. पुष्कळ दिवस सुखानें याजपाशीं राहिलें, आतां दुसरीकडे जाणार."

वीरवर म्हणतो—"जेथें अपाय आहे, तेथें उपायही असेलच. तर येथें आपण कोणत्या उपायानें राहाल?"

लक्ष्मी म्हणते—"जर तूं बत्तीस लक्षणांनीं युक्त असा शक्तिधर नांवाचा तुझा एकुलता एक पुत्र सर्व-

मंगला देवीला बळी देशील तर मी पुनः चिरकाल येथें राहीन."

असें म्हणून ती गुप्त झाली. नंतर वीरवरानें आपल्या बिऱ्हाडीं जाऊन बायको व मुलगा निजला होता, त्यांस जागें केलें. तीं दोघें जागीं होऊन बसल्यावर वीरवरानें त्यांस लक्ष्मीबरोबर झालेलें सर्व भाषण सांगितलें. तें ऐकून शक्तिधर आनंदानें म्हणाला, "मी धन्य आहें. धन्याचे राज्यरक्षणाचे कामीं माझा उपयोग व्हावा हें फार योग्य आहे. तर बाबा आतां उशीर लावूं नका."

शक्तिधराची आई म्हणते—"असें जर न करावें तर एवढें मोठें आपण वेतन घेतों याची फेड दुसऱ्या कोणत्या गोष्टीनें होईल? शिवाय राजाकरितां त्याच्या प्रजाजनांनीं प्रसंगीं आपले प्राणही खर्चीं घालावेत असें शास्त्र आहे."

याप्रमाणें विचार करून तीं सर्व मंगला देवीच्या देवळांत गेलीं. देवीची पूजा करून वीरवर म्हणाला, "हे देवी प्रसन्न हो. शूद्रक महाराजांचा जयजयकार असो. या बळीचा स्वीकार करावा. असें म्हणून त्यानें आपल्या पुत्राचा शिरच्छेद केला. नंतर तो म्हणाला, "राजाचें वेतन घेतलें त्याचा उपकार फेडिला, आतां पुत्राशिवाय मला वांचून तरी काय करावयाचें आहे." असें म्हणून

आपल्या हातानें त्यानें आपलाही शिरच्छेद करून घेतला. त्याच्या मागून त्याच्या पत्नीनेंही आपला आपण शिरच्छेद केला.

हें सर्व पाहून राजास मोठें आश्चर्य वाटलें व असा सेवक नाहींसा झाल्यावर मला राज्याचें तरी काय करावयाचें आहे, असें म्हणून तोही आपला स्वतःचा शिरच्छेद करण्यास उद्युक्त झाला. हें पाहतांच देवी प्रसन्न होऊन म्हणाली, "पुत्रा, तुला मी प्रसन्न झालें आहें. तुझें राज्य जावयाचें नाहीं. राजा साष्टांग नमस्कार घालून म्हणाला, "हे देवी, मला राज्य नको, व माझा जीवही मला नको. मजवर कृपा करणें असेल तर माझें आयुष्य देऊन ह्या राजपुत्रास स्त्रीपुत्रांसह जिवंत कर.

राजाच्या या सेवक वात्सल्यानें देवी संतुष्ट झाली व तिनें राजपुत्रास स्त्रीपुत्रांसहवर्तमान जिवंत केलें.

नंतर राजानें सभा भरवून झालेला वृत्तांत सर्वांस सांगितला, व वीरवराची स्तुति करून त्यास एका प्रांताचें राज्य दिलें.

पोट आणि अवयव.

एके समयीं रूमनामक शहरांत असें झालें कीं, वारंवार युद्ध प्रसंग पडल्यामुळें सरकारास द्रव्याची अडचण

झाली, म्हणून प्रजेवर सरकार देण्याचें ओझें अधिक पडलें. ह्या गोष्टीला कंटाळून, सरकारास पट्टीचा पैसा देऊं नये, असा सर्व प्रजाजनांनीं निश्चय केला. त्या समयीं सरकारानें अग्रिप्पा नांवें कोणी अधिकारी होता त्यास त्या लोकांची समजूत करण्याकरितां पाठविलें. त्यानें पुढील गोष्ट त्यांस सांगून त्यांचा वेडेपणा त्यांच्या पदरीं घातला आणि त्यांस वाटेवर आणिलें. तो म्हणाला, "गड्यांनो, माझी गोष्ट ऐका"!

"कोणे एके काळीं हात, पाय इत्यादि अवयव हे पोटानें केलेल्या कांहीं कामावर रुसले. ते म्हणूं लागले कीं, आम्हा मोठे श्रम करून मिळवावें, आणि ह्या पोटान रिकामें बसून खावें, हें ठीक नाहीं. त्या अवयवांचीं दुःखें जिभेनें मोठ्या युक्तीनें तिखटमीट लावून वर्णिलीं. ती म्हणाली, 'रे, हे हातपाय खपून, श्रम, कष्ट भोगून, जें मिळवितात तें सारें ह्या पोटाकडे जातें. हें पोट कांहींच काम करीत नाहीं, व ह्यापासूनच आम्हांला कांहींच लाभ नाहीं; असें असतां, आम्हींच सर्वदा ह्यांची भर करावी, हा मोठा आम्हांवर जुलूम आहे.' हें भाषण एकून सर्व अवयवांनीं वाहवा केली. हात लागलेच म्हणाले, 'इतःपर पोटाकरितां आम्ही कोणत्याही कामास बोट लावणार नाहीं; पाय म्हणाले, 'या पोटाचें ओझें

आजपर्यंत आम्ही वाहत आलों तें आतां वाहणार नाहीं. ' दांत म्हणाले, ' त्याच्याकरितां यापुढें आम्ही एक दाणाही चावणार नाहीं. ' हें त्यांचें बोलणें ऐकून पोट म्हणालें, ' बाबांनो, तुम्ही हें वेडेपण करूं नका ! जें करणें तें विचारपूर्वक करा ! तुम्हीं मला जें काय आणून देतां तें मीच मात्र भोगतों असें नाहीं. तुमच्या सर्वांच्या पोषणासाठीं मी जिकडे तिकडे तें वांटून देतों. अशी पोटानें जी समजूत केली, ती फुकट गेली. कां तर, काम-क्रोधादिकांचे आवेशापुढें बुद्धीचें कांहीं चालत नाहीं. शेवटीं, अवयवांकडून पोटास कांहीं मिळेनासें झाल्यामुळें पोट अगदीं शुष्क होऊन अस्थिपंजर मात्र उरला. मग पोटाकडून अवयवांचें पोषण न झाल्यामुळें तेही अशक्त झाले. अशी जेव्हां त्यांची अवस्था झाली, तेव्हां त्यांस पश्चात्ताप होऊन पूर्ववत् पोटाकरितां आपआपलीं कामें करण्यास राजी झाले, परंतु कांहीं उपाय राहिला नाहीं. ह्या अविचारामुळें शेवटीं मरण येऊन सर्व शरीराचा नाश झाला. " ही गोष्ट सांगून आग्रिप्पा म्हणाला, " मित्रहो, मीं सांगितलेल्या गोष्टीचें तात्पर्य असें आहे कीं—

प्रजेनें सरकास पट्टीचा पैसा देण्याविषयीं अनुमान करावें हें मोठें वेडेपण होय. प्रजेनें सरकास पैसा जर न दिला, तर राजापासून प्रजेचें संरक्षण कसें होईल ?

पुंडावे माजतील, चोर दिवसा दरवडे घालतील, कोणी कोणाचें ऐकणार नाहीं; असें होऊन राजा आणि प्रजा ह्यांचा एकदांच नाश होईल."

अग्रिप्पाचें हें भाषण ऐकून त्या लोकांची समजूत झाली, व सरकारास कर द्यावयाचा नाहीं असा जो त्यांचा बेत होता तो त्यांनीं सोडून दिला.

---

४ मातृपितृभक्ति.

मायबाप केवळ काशी । तेणें न जावें तीर्थासी ॥१॥
पुंडलिकें काय केलें । परब्रह्म उभें ठेलें ॥ २ ॥
तैसा होई सावधान । हृदयीं धरीं नारायण ॥ ३ ॥
तुका म्हणे मायबापें । अवघीं देवाचीं स्वरूपें ॥४॥

तुकाराम.

मातेचें म्हणजे आईचें आपल्या मुलांवर जें प्रेम असतें तें अगदीं निर्भेळ व सात्विक असतें. आई जें आपल्या मुलांवर प्रेम करिते तें कोणत्याही मोबदल्याच्या इच्छेनें करीत नाहीं. आईचा आपल्या मुलांवर प्रेम करण्याचा उद्देश मुलांचें कल्याण व्हावें एवढाच असतो. मुलें कितीही असलीं तरी सर्व मुलांवर आईचें प्रेम सारखें असतें.

आईचे आपल्या मुलांवर अनंत उपकार झालेले असतात; त्या उपकारांची फेड सर्वस्वीं मुलांच्या हातून होणें शक्य नाहीं. आईचे मुलावर उपकार मूल जन्माला आल्यापासूनच असतात असें नाहीं, तर मूल गर्भामध्यें असल्यापासूनच आईच्या उपकाराला सुरवात होते. आईला मुलाकरितां नाना प्रकारचे हाल सोसावे लागतात. जेव्हां मूल लहान असतें, तेव्हां त्याच्याबद्दल आईला किती श्रम व कष्ट घ्यावे लागतात हें नेहमीं सर्वांच्या नजरेस पडतेंच. अज्ञानावस्थेंत आईसारखें काळजीपूर्वक शरीराचें पोषण दुसरें कोणीच करीत नाहीं. शास्त्रकारांनीं तर माता ही "स्वर्गादपि गरीयसी" म्हणजे स्वर्गापेक्षांही श्रेष्ठ आहे असें म्हटलें आहे. हे शास्त्रकारांचे उद्गार केवळ उच्च कल्पनाच दाखवितात असें नाहीं, तर ते खरोखर पवित्र व सत्य असेच आहेत. माता ही आपल्या अपत्याच्या कल्याणाकरितां किती कष्ट सोशीत असते याची कल्पना सर्वांस सहज होण्यासारखी आहे. आपण जे आज या सृष्टींत विहार करीत आहोंत, नाना प्रकारचीं सुखें अनुभवीत आहोंत यांचें मुख्य कारण तर आपली मातुःश्रीच होय. जॉर्ज हर्बर्ट यानें म्हटलें आहे कीं, सुशिक्षण देण्याच्या कामीं एक चांगली आई जितकी उपयोगीं पडते तितके चांगले शंभर शिक्षकही उपयोगीं पडत नाहींत.

आपल्याला शक्ति नसतांना, आपण लहानपणीं दुर्बल स्थितींत असतांना, ज्या आईनें आपल्याला कडेवर घेऊन आपलें लालनपालन केलें, आपणांस झोंप न आल्यास जिनें गाणें म्हणून आपणांस निजविलें, आपण पाळण्यांत निजलों असतां जिनें वरचेवर डोकावून पाहून कृमिकीटकांपासून आपलें रक्षण केलें, आपण आजारी पडलों असतां आपण मरूं या भीतीनें जिनें आंतल्या आंत रडून आपले डोळे सुजवून घेतले, जिनें आपणांस आंगडें, टोपडें घालून आपलें उष्णता व थंडी यांपासून रक्षण केलें, अशी जी आपल्या जीविताची आधारभूत जननी तिच्या प्रेमाचें वर्णन करावें तितकें थोडेंच.

मातृप्रेम तें मातृप्रेमच. त्याला दुसरी कसलीही उपमा शोभत नाहीं. त्या प्रेमाची दुसऱ्या कोणत्याही प्रेमाशीं तुलना करतां येत नाहीं. श्रीशंकराचार्य यांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, " कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति. " म्हणजे वाईट मुलगे उपजूं शकतील, परंतु वाईट माता मात्र केव्हांही जन्मावयाची नाहीं. हें अगदीं खरें आहे. कारण, आईचे हाल करणारे, आईचा छल करणारे, व आईस विनाकारण गांजणारे दुष्ट पुत्र पुष्कळ आढळतात; परंतु मलाच हाल करणारी आई जगताच्या पाठीवर कोठेंही आढळावयाची नाहीं. मुलाचें दुःख व कष्ट

पाहून जिचें अंतःकरण तिळतिळ तुटलें नाहीं अशी माताच आजपर्यंत जगांत उत्पन्न झालेली नाहीं, व पुढेंही होणार नाहीं. मुलावर प्रेम करतांना आई त्याच्या गुणांकडे बिलकूल लक्ष देत नाहीं. नेहमीं असें पाहण्यांत येतें कीं, जितकें मूल दुबळें असेल तितकी त्या मुलावर मातेची माया जास्त असते, जितकें मूल दुर्गुणी जास्त तितकी जास्त काळजी आईला लागते, व या दुर्गुणी मुलाचें पुढें कसें होईल म्हणून रात्रंदिवस तिला चैन पडत नाहीं. "सबसे जीव प्यारा" म्हणतात, पण जिवाहून देखील आईला आपलें मूल अधिक प्यारें वाटतें. मुलांचा जीव वांचविण्यासाठीं शेंकडों मातांनीं आपल्या प्राणांच्या आहुति दिल्या आहेत. मुलाचे अपराध आई जितके लवकर विसरते, तितके लवकर दुसरें कोणीही विसरत नाहीं. मुलाचा पर्वताएवढा मोठा अपराध आईस राईपेक्षांही लहान वाटतो, व मुलाचा राईएवढा जरी गुण असला तरी तो पवतापेक्षां मोठा वाटतो. मुलाच्या सुखाकरितां केवढेंही संकट असलें तरी आई तें संतोषानें सोसते. सारांश, कसलेंही संकट व हाल मुलाकरितां सोसण्यास आई तयार होते.

ह्यावरून शास्त्रकारांनीं "न मातुः पर दैवतं" म्हणजे मातेसारखें दुसरें दैवत नाहीं असें म्हटलें आहे व त्यांनीच

आपणां सर्वांस अशी आज्ञा आहे कीं, "मातृ देवो भव" म्हणजे आईला देव मानणारा हो. मातेचें मुलावरील प्रेम पाहूनच ही शास्त्रकारांनीं आज्ञा केलेली आहे. ती शिरसा मान्य करणें आपलें कर्तव्य आहे. कारण आईचे उपकार लक्षांत घेतां ही आज्ञा म्हणजे कांहींच नव्हे असं वाटतें. म्हणून आपल्या मातेची सेवाचाकरी मनोभावें करून तिला सुख देणें हें आपलें अत्यंत पवित्र कर्तव्यकर्म होय.

लॉर्ड लांगदेल ह्यानें आपल्या आईविषयीं म्हटलें आहे कीं, "तराजूच्या एका पारड्यांत सर्व जग घातलें, व दुसऱ्या पारड्यांत माझ्या आईला बसविलें, तर माझ्या आईचें पारडें खालीं राहून जगाचें पारडें वर जाईल." खरें आहे.

मातेच्या संबंधानें केलेल्या आज्ञेपुढेंच "पितृ देवो भव" तूं बापाला देव मानणारा हो अशी शास्त्रकारांची आज्ञा आहे. कारण, मुलाचें रक्षण लहानपणीं जसें आईला करावें लागतें, तसेंच मूल थोडेंसें मोठें झाल्यावर बापाला करावें लागतें. मातेनें जरी शरीराचें संरक्षण उत्तम केलें तरी तेवढ्यानें मुलाचा सर्व कार्यभाग संपला असें नाहीं. बाप जें कार्य करितो तें तसेंच महत्त्वाचें किंबहुना थोडेंसें जास्त महत्त्वाचें असतें. कारण, मुलाचें पुढील

कल्याण होण्याकरितां बापाला तन मन धन हीं खर्च करावीं लागतात. पैसे खर्च करून बाप मुलांना शिक्षण देतो. कोणत्या त्र्हेचें शिक्षण दिलें असतां मुलाचें कल्याण होईल हें तो विचारपूर्वक ठरवून त्याप्रमाणें मुलास शिक्षण देण्याची तजवीज करितो. बाप गरीब असला तरी आपण स्वतः हालांत दिवस काढून मुलाच्या शिक्षणास लागणारा पैसा तो पुरवितो. आपल्या मुलाचें आयुष्य सुखांत जावें म्हणून बाप नानाप्रकारें श्रम करून स्थावर व जंगम इस्टेट जमवीत असतां प्रसंगविशेषीं तो आपल्या जिवाची सुद्धां पर्वा करीत नाहीं. सारांश मुलाच्या कल्याणाकरितां बापालाही मानसिक व शारीरिक श्रम पुष्कळ करावे लागतात. तेव्हां बापाचे मुलावरील उपकार मातेच्या उपकाराच्या तोलाचेच असतात. यावरून "पिता आकाशापेक्षांही थोर आहे" असें एका संस्कृत कवीनें म्हटलें आहे तें खरें आहे.

मुलें सुशिक्षित व आज्ञाधारक असलीं म्हणजे आईबापांना पराकाष्ठेचा आनंद होतो. त्यांच्या चित्तास मोठें समाधान वाटतें. प्रत्येक आईबापाला असें वाटत असतें कीं, आपल्या मुलांनीं कीर्ति व सन्मान मिळवावा व त्यांच्या हातून सत्कृत्यें घडावींत. मुलें नांवलौकिकास चढविण्याकरितां पुष्कळ आईबापें अतिशय श्रम घेतात.

इतके श्रम घेऊन त्यांचें जर चीज झालें नाहीं तर आई-बापांचीं मनें खट्टू होऊन त्यांना मनस्वी दुःख होतें. सालोमन नांवाचा एक साधु म्हणतो "शहाण्या पुत्राच्या योगानें पिता हर्ष पावतो" व एका संस्कृत कवीनें म्हटलें आहे "सुपुत्रासारखें आईस दुसरें भूषण नाहीं." खरें आहे.

मुलांनीं आपल्या आळसामुळें व मूर्खपणामुळें आई-बापांना भारभूत होऊं नये, व त्यांच्या मनाला दुःख होईल अशी कोणतीही गोष्ट करूं नये. आईबापांना त्रास दिला म्हणजे तो देवाला त्रास दिल्यासारखें आहे. आई-बापें हीं चालतीं बोलतीं देवाचीं स्वरूपें आहेत. फक्त आईबापांचीच सेवा करून मोक्षपदाला गेलेल्या पुत्रांचीं बरींच उदाहरणें पुराणांतरीं सांपडतात. त्याचप्रमाणें आई-बापांच्या आज्ञेचें उल्लंघन करून स्वैर वर्तन केल्यामुळें नाश पावलेल्या पुत्रांचीं उदाहरणेंही इतिहासांत थोडीं नाहींत.

मनुस्मृतींत म्हटलें आहे—" मुलांच्या कल्याणाविषयीं मातापितरें जे श्रम घेतात, त्यांचे उपकार शंभर वर्षांनींही फिटणार नाहींत. माता, पिता व गुरु यांचें सर्वदा प्रिय करावें. हीं तिघें संतुष्ट झालीं असतां सर्व तपांचें फल प्राप्त होतें. मातापितरांची सेवा हेंच मोठें तप होय. त्यांची आज्ञा घेतल्याशिवाय कोणतेंही कृत्य करूं नये."

त्याचप्रमाणें स्वामी विवेकानंद म्हणतात:—" माता पिता ह्या साक्षात् परमेश्वराच्या मूर्ति आहेत. हें मनांत ठेवून प्रत्येक मनुष्यानें सर्वतोपरी व सदा सर्वकाल त्यांस संतुष्ट ठेविलें पाहिजे. ज्या मनुष्यावर आईबाप प्रसन्न असतात, त्यावर ईश्वरही प्रसन्न असतो. आई आणि बाप हीं ह्या देहोत्पत्तीस कारण आहेत. याकरितां त्यांचें बरें करण्याकरितां हजारों संकटें आलीं तरी मनुष्यानें तीं सोसलीं पाहिजेत. "

मुसलमान लोकांचा साधु महंमद पैगंबर म्हणतो:— " पिता किंवा माता यांनीं मुलांचें अहितसाधन जरी केलें असलें, तरी त्यांची सेवा करणें हेंच मुलांचें कर्तव्य होय. पित्याच्या संतोषानें परमेश्वर संतुष्ट होतो. पित्याच्या असंतोषानें परमेश्वराचा क्रोधाग्नि जास्त भडकतो. स्वर्गलोकामध्यें जो महाद्वारानें प्रवेश करूं इच्छितो, त्यानें आपल्या आईबापांना संतुष्ट केलें पाहिजे. "

सारांश, आईबाप हींच मुलांस गंगा आदिकरून तीर्थें व तींच देवाचीं स्वरूपें आहेत. म्हणून मातृपितृभक्ति हें मोठें कर्तव्य व पुण्यसाधन आहे. आईबापांनीं आपलें बाळपणापासून संगोपन केलेलें असतें म्हणून त्यांवर प्रीति करणें व त्यांना मान देऊन सदा सर्वदा त्यांची शुश्रूषा करणें हें मोठें पुण्य आहे व तें घरीं बसल्या आपोआप मिळणारें आहे. तें सर्वांनीं अवश्य मिळवावें.

मुलांनो, आईबापांची आज्ञा पाळा, त्यांना योग्य मान द्या, म्हातारपणीं त्यांस जपा, तुम्हीं असें केलें म्हणजे तुमचीं मुलेंही तुम्हांस वृद्धापकाळीं तसेंच करतील.

पित्याकरितां स्वार्थत्याग !

पूर्वी हस्तिनापुर, ज्यास हल्लीं दिल्ली असें म्हणतात, येथें शंतनुनामक महापराक्रमी व सत्यनिष्ठ असा एक राजा होऊन गेला. हा राजा, महाभगवद्भक्त, व आमरणान्त ब्रह्मचर्य व्रत पाळणारे, सत्य प्रतिज्ञ भीष्माचार्य यांचा पिता होय. या शंतनु राजानें आपल्या एकुलत्या एक व सर्व गुणसंपन्न पुत्रास, म्हणजे भीष्मास यौवराज्याभिषेक करून त्याच्याबरोबर आनंदांत चार वर्षें घालविलीं.

पुढें एके दिवशीं तो शंतनु राजा यमुना नदीचे काठीं वनांत फिरत असतां, त्यानें अतिशय सुंदर अशी एक धीवराची तरुण मुलगी पाहिली. तिचें सौंदर्य पाहून राजा अगदीं मोहित झाला. तो तेथून निघाला तो थेट तिच्या बापाकडे गेला; आणि आपणा स्वतांकरितां त्यानें तिच्या संबंधानें त्याच्यापाशीं मागणी केली.

तेव्हां धीवर म्हणाला " राजा हिच्यापासून तुला जो मुलगा होईल, त्यालाच तुझ्या राज्याचा मालक करशील तर तुला मी आपली कन्या देतों. "

धीवराचें हें बोलणें शंतनु राजाला मान्य झालें नाहीं. कारण भीष्मावर त्याची अत्यंत प्रीति होती; शिवाय सर्वगुणसंपन्न अशा वडील पुत्राचा राज्यावरचा हक्क, आपल्या सुखाकरितां नष्ट करणें हें त्याला प्रशस्त वाटलें नाहीं; म्हणून मदनाच्या तापामुळें त्याचें शरीर आंतून जळत असतांही तो तसाच हस्तिनापुरास परत गेला.

परंतु घरीं आला तरी त्याच्या मनाची तळमळ राहीना. त्याच्या मनांत एकसारखी ती धीवरकन्या घोळूं लागली. यामुळें तो नेहमीं खिन्न असे. पुढें कांहीं दिवसांनीं आपल्या पित्याच्या खिन्नतेचें कारण भीष्मास कळलें, तेव्हां तो स्वतः धीवराकडे गेला, आणि आपल्या पित्यासाठीं त्याच्या मुलीबद्दल त्याजवळ त्यानें मागणी केली. त्यावर धीवरानें राजास जी अट घातली होती तीच अट त्यानें भीष्मास घातली. तेव्हां भीष्म म्हणाला:—

" हे धीवरा, एवढेंच जर तुझें म्हणणें असेल, तर, जशा प्रकारची प्रतिज्ञा पूर्वीं जन्मास आलेल्या कोणत्याही पुरुषानें केली नाहीं, किंवा पुढें जन्मास येणारा कोणताही पुरुष करणार नाहीं अशी प्रतिज्ञा करून तुला सांगतों कीं तुझ्या इच्छेप्रमाणेंच सर्व गोष्टी होतील म्हणजे तुझ्या कन्येला जो पुत्र होईल तोच पुढें माझ्या पित्याच्या राज्याचा सर्वस्वीं अधिकारी होईल. "

याप्रमाणें भीष्मानें प्रतिज्ञा केली तरीही त्या धीवराचें समाधान झालें नाहीं. आणि राज्यलोभामुळें तो आणखी म्हणाला: —

" तुझ्यापासून जरी माझ्या मुलीच्या संततीला अपाय झाला नाहीं तरी तुझ्या संततीपासून होण्याचा संभव आहेच " !

भीष्म म्हणाला:—" धीवरा, तुझ्या मनांत जी दुसरी शंका आली, तिचेंही निरसन होण्याकरितां व माझ्या पित्याचा हेतु साध्य होण्याकरितां मी पुनः अशी प्रतिज्ञा करितों कीं, मी मुळींच विवाह करणार नाहीं. नेहमीं ब्रह्मचर्य व्रतानें राहून आपलें आयुष्य घालवीन व तुझ्या मुलीच्या संततीचें राज्य रक्षण करण्याकरितां प्रसंगीं मी आपले प्राणही खर्ची घालीन. धीवरा, राज्यावर मीं पूर्वीच पाणी सोडलें आहे, आणि या दुसऱ्या प्रतिज्ञेनें मला संतति होण्याचीही भीति राहिलेली नाहीं, तर, आतां तूं आपली कन्या निर्धास्तपणें माझ्या पित्याला दे."

ही प्रतिज्ञा ऐकून धीवराला परमानंद झाला, व तो म्हणाला " मी आपली मुलगी शंतनु राजास देतों. " नंतर भीष्म त्या धीवरकन्येला म्हणतो " मातुःश्री या, आणि रथावर बसा म्हणजे आपण आपल्या घरीं जाऊं. " असें म्हणून त्यानें त्या कन्येला रथांत बसविलें आणि तिला

घेऊन तो हास्तिनापुरास परत आला, व तिला त्यानें आपल्या पित्याच्या स्वाधीन केलें.

हा भीष्माचा अद्वितीय स्वार्थत्याग व पितृभक्ति पाहून शंतनु राजाचें अंतःकरण प्रेमानें ओतप्रत भरून आलें व त्यानें त्या महात्म्या पुण्यशील पितृभक्त अशा आपल्या पुत्रास " भीष्मा तूं इच्छामरणी होशील " असा वर दिला.

केवढी ही पितृभक्ति ! !

जॉर्ज वाशिंगटन् याची मातृभक्ति.

प्रख्यात सेनापति जॉर्ज वाशिंगटन् यानें आरंभीं समुद्रावर नोकरी करण्याचा विचार केला होता. त्या संबंधानें सर्व व्यवस्था होऊन वाशिंगटन् हा मोठ्या आनंदानें निघण्याच्या तयारींत होता. जाते वेळीं तो आपल्या आईकडे निरोप घेण्याकरितां गेला. त्या वेळीं तिच्या डोळ्यांत अश्रु आलेले त्याच्या नजरेस पडले. ती त्याला जाऊं नको वगैरे कांहीं बोलली नाहीं. परंतु आपल्या जाण्यामुळें तिला फार दुःख होत आहे हें वाशिंगटनच्या तेव्हांच लक्षांत आलें, व त्यानें तात्काळ आपल्या जाण्याचा बेत रहित केला, आणि नोकरास सांगितलें " नावाड्याला जाऊन सांग कीं, मी आज येत नाहीं.

ज्या कृत्यापासून माझ्या आईच्या अंतःकरणास दुःख होईल, तें कृत्य मी कदापि करणार नाहीं."

हा त्याचा निर्धार पाहून त्याच्या आईस मोठें कौतुक वाटलें, व ती म्हणाली "बाळा, जीं मुलें आईबापांस मान देतात, परमेश्वर त्यांचें कल्याण करितो, म्हणून मी म्हणतें कीं, ज्या अर्थीं माझ्याठायीं तुझी एवढी पूज्य-बुद्धि आहे, त्या अर्थीं तूं त्या जगदीशाच्या कृपेनें सर्व कामांत यशस्वी होशील अशी माझी खात्री आहे."

आपल्या आईच्या या आशिर्वादानेंच वाशिंगटन् पुढें मोठा झाला यांत संशय नाहीं.

पित्याकरितां वनवास.

पूर्वीं अयोध्या नगरींत दशरथ नांवाचा एक महापरा-क्रमी सार्वभौम राजा होऊन गेला. त्याला कौसल्या, सुमित्रा, आणि कैकेयी अशा तिघी स्त्रिया होत्या. त्या तिघींस मिळून राजाच्या उतार वयांत चार पुत्र झाले. त्यांचीं नांवें राम, लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न अशीं होतीं. या सर्वांत राम वडील असून त्यावर राजा दश-रथाचें फार प्रेम होतें. त्यानें बापाचें वचन खरें करण्या-साठीं राज्याचा त्याग केला एवढेंच नव्हे, तर आपली

सुकुमार स्त्री सीता इजसह चवदा वर्षें फार कष्टदायक असा वनवास भोगला.

आईबापांचा शब्द राखण्याकरितां वनवास भोगणाऱ्या पुत्रांचे आईबाप फार धन्य होत.

आईबापांकरितां जीव धोक्यांत घालणाऱ्या मुलीची गोष्ट.

सुमारें दीडशें वर्षांपूर्वीं एका रशियन कामगारावर झारची गैरमर्जी झाली, सबब झारच्या हुकुमावरून त्या कामगारास सैबीरिआनामक जंगली व डोंगराळ प्रदेशांत हद्दपार करण्यांत आलें होतें. तेव्हां त्याची बायकोही आपल्या एकुलत्या एक इलिझाबेथ नांवाच्या लहान मुली-सह त्याजबरोबर सैबीरिआ देशांत गेली. मुलीला सैबा-रिआखेरीज दुसऱ्या ठिकाणचें स्मरण नव्हतें, सबब तिला तेथेंच सौख्य वाटून तिचें बालपण आनंदानें गेलें. पण पुढें ती पंधरा वर्षांची झाल्यावर आपल्या मातापितरांवर दुर्दैवानें गुदरलेल्या संकटाची हकीकत तिला कळून आली, व त्याबद्दल तिला परमावधीचें दुःख झालें. त्या वेळीं जरी ती केवळ पंधरा वर्षांची होती, तरी बादशाहाची म्हणजे झारची भेट घेऊन त्याजकडून आपल्या बापाची सुटका करून घेण्याविषयीं होईल तितका प्रयत्न करण्याचा

तिनें निश्चय केला. तिनें हा विचार आपल्या आईबापांस कळविला, तेव्हां त्यांना ही गोष्ट वाऱ्याची मोट बांधण्या-इतकी अशक्य वाटली, व त्यांनीं तिला तिच्या मार्गांतील नाना तऱ्हेच्या अडचणी सांगितल्या. ते म्हणाले " बाद शाहाचें राहण्याचें ठिकाण येथून सातआठशें कोस लांब आहे, मार्गांत मोठमोठीं अरण्यें असून त्यांत भयंकर श्वापदें आहेत. वाटेंत कित्येक मैलपर्यंत वस्ती मुळींच नाहीं. तेव्हां इतक्या अडचणीच्या प्रदेशांतून तूं एकटी कसा प्रवास करणार हें आम्हांस कळत नाहीं. शिवाय तूं इतका त्रास सोसून जिवाकडे न पाहतां जरी इतक्या लांबीचा प्रवास केलास तरी तुझी व बादशाहाची भेट होणें मुळींच शक्य नाहीं." इतकें जरी त्यांनीं तीस सांगितलें तरी ती मुलगी आपल्या पवित्र निश्चयापासून यत्किंचित्‌ही ढळली नाहीं.

पुढें थोडे दिवसांच्या आंतच तिनें सरकारी अधिकाऱ्यां-कडून सैबिरिआंतून रशियांत जाण्याचा परवाना मिळविला व आईबापांचा निरोप घेऊन ती आपल्या पवित्र कार्यास निघाली. अगोदर एकुलतें एक मूल, त्यांतून मुलीची जात; आणि अशा तरुण व सुकुमार आवडत्या मुलीस, अशा बिकट संकटांतून प्रवास करण्यास परवानगी देण्याचें त्या आईबापांच्या किती जिवावर आलें असेल याची कल्पनाच

करणें बरें ! असो. त्यांनीं त्या मुलीस आपल्या दुःखाश्रूनें न्हावूं घालून मोठ्या कष्टानें निरुपायास्तव निरोप दिला.

मग ती मुलगी ओसाड रानांतून, जंगलांतून, डोंगरांतून, व बर्फमय प्रदेशांतून कित्येक महिने प्रवास करून मोठ्या कष्टानें रशियाची राजधानी सेन्टपीटर्सबर्ग येथें शेवटीं जाऊन पोंचली. पण पुढें बादशहाच्या भेटीची मोठी अडचण तिजपुढें उभी राहिली. परंतु परमेश्वरकृपेनें तीही तिची अडचण लवकरच दूर झाली. कारण त्या मुलीची सर्व हकीकत त्या दरबारच्या एका उमरावाच्या बायकोस कळली व तिनें तिचें काम मनावर घेतलें. तिनें राणीची गांठ घेऊन त्या मुलीचें सर्व वर्तमान राणीस सांगितलें. तें ऐकून राणीस मोठा चमत्कार वाटला, व तिनें त्या मुलीस आपल्या समक्ष बोलावून आणिलें. तिच्या तोंडून राणीनें सर्व गोष्ट समजावून घेतली व बादशहापाशीं तिजकरितां भीड खर्चण्याचा तिनें निश्चय केला, व त्याप्रमाणें तिनें बादशहाच्या कानावर त्या मुलीची सर्व हकीकत घातली. तें ऐकून बादशहास फार आश्चर्य वाटलें व त्यानें तात्काळ त्या मुलीच्या बापाची सुटका करण्याविषयीं हुकूम दिला. इतकेंच नव्हे तर त्या सबंध कुटुंबाचा जाण्यायेण्याचा खर्च सरकारी तिजोरींतून देवविला.

मुलांकरितां एका मातेचा आत्मयज्ञ.

कांहीं वर्षांपूर्वीं, लंडन शहरांत एका तेलाच्या दुकानास व घरास आग लागली होती. घर फक्त आठच खण होतें. तरी त्यांत बरींच बिऱ्हाडें रहात होतीं, त्यांपैकीं एक दोन मुलांबाळांचीं कुटुंबें होतीं. ती वेळ मध्यरात्रीची असून घरांतील सर्व मंडळी सामसूम होऊन गाढ निद्रेंत निमग्न होती. बाहेर लोक जमा होऊन मोठमोठ्यानें आरडत ओरडत होते. त्यांच्या हाका ऐकून घरांतील मंडळी जागी झाली. आग विझविण्याच्या बंबाला वर्दी गेलीच होती. बंब येण्यापूर्वींच लोकांनीं दरवाजा फोडला.

ज्या शूर मातेची ही गोष्ट आहे ती आणि तिचीं दोन मुलें अगदीं वरच्या मजल्यावर रहात होतीं. खालची आरडाओरड ऐकून ती आई जागी झाली. तिनें विचार करण्यांत एक क्षणही न घालवितां, आपल्या त्या दोन मुलांपैकीं एका मुलाला अंथरुणांतून निजलेलाच ओढून आणि आपल्या पोटाशीं गच्च धरून धुरांतून आणि आगीच्या उष्णतेंतून ती जिन्यावरून धांवत खालीं आली आणि आपलें मूल तिनें रस्त्यांतील एका इसमाच्या स्वाधीन केलें.

लागलेंच तिनें दुकानाकडे पुनः धांव घेतली आणि आपल्या खोलीकडे जाण्यासाठीं ती जलदीनें जिना चढून वर गेली. प्रसंग केवढा आहे, आपल्या जिवाचें काय

होईल, ही गोष्ट तिच्या मनाला शिवलीसुद्धां नाहीं. जिना चढून धांवत जात असतांच तिचा जीव गुदमरून गेला होता, म्हणून थोडीशी मोकळी हवा घेण्याकरितां तिनें बाजूची खिडकी मात्र थोडीशी उघडली. ती आपल्या मुलापाशीं जाऊन पोंचली. तिनें तें उचलून घेतलें, आणि बाहेर येण्याचा ती प्रयत्न करूं लागली. पण हा त्या माउलीचा प्रयत्न सफल झाला नाहीं. तिला पुढें जातांच आलें नाहीं. इतक्यांत आगीच्या बंबावरचे लोक तेथें येऊन पोंहचलेच. ते भराभर वर चढले. ते वर गेल्यावर त्या मातेचें प्रेम त्यांना आढळून आलें. तिनें आपलें मूल पोटाशीं जसें घट्ट आवळून धरलें होतें तसें होतें. आणि आपल्या प्राणांपेक्षांही प्यार अशा त्या पोटच्या गोळ्याला आगीचा स्पर्श होऊं नये म्हणून आगीकडे पाठ करून आणि आपल्या कपड्याचें आणि हाताचें अच्छादन करून ती तशीच उभी होती. ती गतप्राण होऊन थोडींच सेकंदें झालीं असावींत असें त्या बंबवाल्या लोकांना दिसून आलें !

धन्य ! धन्य ! आहे मातृप्रेमाची.

म्हणूनि म्हणती भले ‘ न ऋण जन्मदेचें फिटे ’ ॥

मोरोपंत.

५ सत्य.

सत्यापरता नाहीं धर्म ! सत्य तेंचि परब्रह्म ॥
सत्यापाशीं पुरुषोत्तम । सर्वकाळ तिष्ठत ॥ १ ॥
असत्य तेंचि पैं पातक । असत्य तोचि महानरक ॥
असत्याचेनीं संगें दुःख । अनंत जन्म भोगिती ॥ २॥

मुक्तेश्वर.

प्रत्येकानें सदा खरें बोलावें. कारण खरें बोलणें हें सर्व धर्मांत श्रेष्ठ मानिलें आहे. खरें बोलण्यानें मनास मोठी शांति वाटते. सत्य वागण्यानें मनुष्य जगांत मोठेपणा पावतो. सत्य राखण्याकरितां आजपर्यंत हजारों थोर पुरुषांनीं नाना प्रकारचीं संकटें सोसलीं आहेत. हरिश्चंद्र राजानें स्वप्नांत दिलेलें वचन पाळण्याकरितां नाना तऱ्हेचे हाल सोसले व शेवटीं आपणास डोंबासही विकून घेतलें. दशरथ राजानें आपलें वचन राखण्याकरितां रामासारख्या परम प्रिय पुत्रास चवदा वर्षें वनवासास पाठविलें. रामाच्या वियोगाचें दुःख त्याला इतकें असह्य झालें कीं, शेवटीं तो थोड्याच वेळांत 'हे रामा, हे रामा' म्हणत मृत्यु पावला. या सत्य-निष्ठेमुळेंच वर लिहिलेल्या विभूतींची कीर्ति आज हजारों वर्षें जगाच्या पाठीवर दुमदुमत आहे. अंगावर आकाश

कोसळलें तरी हरकत नाहीं, परंतु मनुष्यानें खरेपणा सोडूं नये. सत्यानें वागणाऱ्या मनुष्यास प्रथमतः जरी पुष्कळ अडचणी सोसाव्या लागल्या तरी शेवटीं त्याच्या सर्व अडचणी आपोआप दूर होऊन त्याला सुख लाभतें. सत्याचाच शेवटीं विजय होतो. ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. असत्यपणें वागणाराची कांहीं दिवस भरभराट झाल्यासारखी दिसते, परंतु शेवटीं असत्याचें घर खालींच बसतें.

सत्य हें कोणत्याही राष्ट्राचा व समाजाचा पायाच आहे. ज्या राष्ट्रांत व ज्या समाजांत सत्य नाहीं तें राष्ट्र व तो समाज थोड्याच कालांत नष्ट होतो. ज्या कुटुंबांत सत्य नाहीं तें कुटुंबही लवकरच रसातळास पोंचतें. ही गोष्ट व्यक्तीलाही लागू आहे. जो माणूस खोटें बोलतो तो केव्हांही ऊर्जितावस्थेला यावयाचा नाहीं.

सत्य हें नीतिमत्तेचा प्राण आहे. असत्य भाषण करणें म्हणजे नीतीचा खून करण्यासारखें आहे. सत्याची बरोबरी दुसऱ्या कोणत्याही गुणानें केली जात नाहीं. सत्य हें सर्व सद्गुणांचा कळस आहे. एका ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं " हजारों अश्वमेध व सत्य यांची तुलना केली तर हजारों अश्वमेधांपेक्षां सत्याचेंच पारडें वजनदार होईल" म्हणून सत्य बोलणें म्हणजे हजारों अश्वमेधांचें पुण्य गांठीं बांधण्यासारखेंच आहे. सर्व बाह्य गोष्टी जरी

नाश पावल्या तरी सत्य कायमच रहातें, म्हणून सत्याची आवड धरावी हें इष्ट आहे. सत्य वागणें म्हणजेच धर्मानें वागणें होय, कारण सत्यानें धर्माचें रक्षण होतें. ज्या धर्मात सत्य नाहीं तो धर्मच नव्हे. विदुर नीतींत असें सांगितलें आहे कीं " समुद्र तरून जाण्यास जसें नौका हें एकच साधन आहे तसें संसार तरून जाण्यास सत्य हें एकच साधन आहे. धर्मराजा हा सर्वदा सत्य बोलणारा होता, म्हणून तो मानवी देहासह स्वर्गास गेला. आपल्या आयुष्यांत तो एकदां खोटें बोलला होता. तेवढ्यानेंच पुढें स्वर्गास जाते वेळीं त्याच्या पायाचा एक अंगठा गळून पडला. असें महाभारतांत लिहिलें आहे.

मनुस्मृतींत सांगितलें आहेः—सत्य बोलावें; गोड असून खोटें असेल तर बोलूं नये, हा सनातन म्हणजे सर्वकालीं सर्वांस मान्य असा धर्म होय. आपली स्थिति एक असून सज्जनास दुसऱ्या प्रकारची आहे असें कळवितो तो जगांत मोठा पापी आत्मचौर्य करणारा चोर होय. वाणीनें सर्व व्यवहारांचें नियमन होतें. सर्व व्यवहार उत्पन्न होण्यास कारण वाणी आहे. वाणीच्या योगानें सर्व व्यवहार चालतात अशा वाणीला जो चोरतो, म्हणजे खोटें बोलतो, तो सर्व वस्तु चोरणारा चोर होय. "

या वचनांवरून असें सिद्ध होतें कीं, खोटें बोलणें

हें महत् पाप आहे, म्हणून मनुष्यानें नेहमीं सत्य बोलावें. सत्य भाषणानें मनुष्याचें फार हित होतें. असत्य भाषणानें मनुष्याचा फार तोटा होतो. एकदां मनुष्याचा खोटेंपणा बाहेर आला म्हणजे पुनः त्यावर कोणीही विश्वास ठेवीत नाहीं. असत्य भाषण करण्यांत मनुष्याचा उद्देश नफा व्हावा हा असतो. खरी स्थिति सांगितली असतां तत्काळ जें कांहीं नुकसान होईल, तें टाळावें म्हणून मनुष्य खोटें बोलतो, परंतु त्या खोटें बोलण्यापासून पुढें आपलें किती अहित आहे, हें त्या वेळीं त्या बिचाऱ्याच्या लक्षांत येत नाहीं. खोटें बोलणाराची लबाडी जरी कांहीं दिवस उघडकीस आली नाहीं तरी ती पुढें केव्हांना केव्हां तरी बाहेर पडतेच. एकदां मनुष्याची लबाडी बाहेर पडल्यावर पुढें त्याच्या खरें बोलण्यावर सुद्धां लोक भरंवसा ठेवीत नाहींत. एकदां मनुष्य खोटें बोलला म्हणजे तें छपविण्याकरितां त्याला पुष्कळ वेळां खोटें बोलावें लागतें. बहुधा अपराध छपविण्याकरितां मनुष्य खोटें बोलतो, परंतु अशा खोटें बोलण्यानें अपराध तर छपत नाहींतच, परंतु ते त्याच्याच विसंगत बोलण्यानें जास्त शाबीत होतात. खरें बोलून होणारा तोटा सोसण्याचें नीतिधैर्य अंगीं नसलें म्हणजे मनुष्य खोटें बोलतो, करितां सत्य बोलण्यानें होणारा तोटा सोसण्याचें नीतिधैर्य अंगीं आणण्याचा प्रयत्न मुलांनीं लहानपणापासूनच करावा हें चांगलें.

असत्य बोलण्याचे अनेक प्रकार आहेत. त्या प्रकारांपैकीं कोणताही प्रकार क्षम्य नाहीं, हें सर्वांनीं लक्षांत ठेवावें. त्या प्रकारांपैकीं कांहीं प्रकार येथें सांगतों. दुट्टपी बोलणें हें खोटें बोलण्याइतकेंच वाईट आहे. कारण त्या बोलण्याचा उद्देश लोकांना फसविणें हाच असतो. द्व्यर्थी शब्द घालून मनांत एक अर्थ असतां दुसऱ्यास भलताच अर्थ भासविणें हें खोटें बोलण्याइतकेंच पाप आहे. कधीं कधीं नुसतें गप्प बसण्यानें, हूं म्हणण्यानें अथवा मान हलविण्यानेंसुद्धां खोटें बोलण्याचें पाप पदरीं येतें. एखाद्यास एखादें वचन देऊन तें न पाळणें म्हणजे खोटें बोलणेंच होय, व यास विश्वासघात म्हणण्यास हरकत नाहीं. एखाद्याची, त्याच्या अंगीं नसत्या गुणांची स्तुति करणें म्हणजे खोटें बोलणेंच होय. याला तोंडपुजेपणा म्हणतात. हे व दुसरे अनेक खोटे बोलण्याचे प्रकार आहेत. ते सारखेच विघातक असून ते बोलणारास काळिमा आणणारे आहेत. म्हणून ते सर्व प्रकार अवश्य टाळावे हें फार चांगलें आहे.

आपला जसा प्रामाणिकपणें समज झाला असेल तसें सांगणें हेंच सत्य बोलणें होय. आपल्या समजाच्या विरुद्ध बोलणें याला असत्य भाषण म्हणतात. आपण आपल्या समजाप्रमाणें एखादी गोष्ट सत्य आहे म्हणून सांगितली, व ती आपल्या सांगण्याच्या अगदीं उलट आहे असें पुढें

दिसून आलें, तरी खोटें बोलण्याचा दोष आपल्या पदरीं येत नाहीं. उदाहरणार्थ एखाद्यानें तुम्हांस विचारिलें " कायहो तो फलाणा मनुष्य प्रामाणिक आहे काय? " यावर तुम्हीं जर आपल्या माहितीप्रमाणें व समजुतीप्रमाणें तो फलाणा मनुष्य प्रामाणिक आहे म्हणून सांगितलें; व पुढें तो मनुष्य लबाड आहे असें ठरलें, तरी तुमच्या पदरीं खोटें बोलण्याचा दोष येऊं शकत नाहीं.

सत्यनिष्ठेनें मनुष्याच्या अंगांत प्रामाणिकपणा उत्पन्न होतो. प्रामाणिपणा हा सत्याचाच भाग असून तो मोठा सद्गुण आहे. तो संपादण्यास फारसा अभ्यास करावा लागत नाहीं व मोठे श्रमही पडत नाहींत. प्रामाणिकपणा अंगांत असला म्हणजे मोठ्या संकटांतही मनुष्यास साह्य मिळतें. प्रामाणिकपणाची गरज प्रत्येक व्यवहारांत आहे. तो अमक्या मनुष्यास व अमक्या धंद्यांतच लागतो असें नाहीं. तो सर्व मनुष्यांस व सर्व धंद्यांत लागतो. तो राज्यकारभारांत लागतो व तो मोठ्या अंमलदारापासून तो तहत कामाठ्यापर्यंत असावा लागतो.

त्याचप्रमाणें व्यापारांत प्रामाणिकपणा असणें ही तर अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. जो दुकानदार अप्रामाणिक असतो, तो केव्हांही भरभराटीस येत नाहीं. पहिल्याप्रथम कांहीं दिवस जरी त्याचें दुकान भरभराटींत आहे असें दिसलें तरी थोडक्याच दिवसांत त्याची लबाडी उघडकीस

येऊन तो अगदीं रसातळास पोंचतो. पुन्हा त्याच्या दुकानाकडे कोणी ढुंकून सुद्धां पाहात नाहींत. परंतु प्रामाणिक व्यापाऱ्याची गोष्ट याच्या अगदीं उलट असते प्रथमतः कांहीं दिवस त्याला हालांत काढावें लागतात, परंतु पुढें त्याचा प्रामाणिकपणा लोकांच्या नजरेस आला म्हणजे मग त्याची सारखी भरभराट होत जाते व तो प्रामाणिक म्हणून सर्व लोक त्याला मान देतात, व त्याजवर विश्वास टाकतात. त्याला त्याचे शत्रुसुद्धां वेळेला मदत करितात. म्हणून सर्वांनीं प्रामाणिक होण्याचा प्रयत्न करावा.

इंग्लिश राष्ट्रांत जे अनेक सद्गुण आहेत त्यांत प्रामाणिकपणा हा त्यांचा मोठा सद्गुण आहे. त्यांच्या प्रामाणिकपणावर हिंदी लोकांचा मोठा विश्वास आहे, म्हणूनच पोस्टाचे सेविंग बँकेंत हिंदी लोकांचे सोळा कोट रुपये आहेत, व ते ज्याचे त्यास वाटेल तेव्हां मिळूं शकतात.

परमेश्वर असत्याचा तिरस्कार करतो, व सत्यानें तो संतुष्ट होतो.

खोटें बोलणारा अधोगतीस जातो.

इंग्लीश म्हणी.

दादोजी कोंडदेवाचा प्रामाणिकपणा.

शिवाजी महाराजांचे गुरु दादोजी कोंडदेव हे फार प्रामाणिक होते. यांच्या प्रामाणिकपणाविषयीं अशी एक गोष्ट आहे कीं:—

एके दिवशीं ते शिवाजीमहाराजांस बरोबर घेऊन त्यांचे वडील, शहाजीराजे, यांच्या एका बागेंतून चालले होते. जातां जातां एका ते आंब्याच्या झाडाखालीं आले. त्या झाडाच्या फांद्या खालपर्यंत आलेल्या होत्या; व ते दिवस आंब्याचे असल्यामुळें तें झाड फळांनीं अगदीं गजबजून गेलें होतें. तेव्हां बोलतां बोलतां दादोजींनीं सहज एक पाडाचा आंबा आपल्या हातानें तोडला. पण लागलेंच त्यांच्या मनांत आलें कीं, मालकाच्या परवानगीशिवाय त्याच्या झाडाचें फळ तोडलें हें कृत्य आपण बरोबर केलें नाहीं, व याबद्दल आपणास कांहीं तरी शासन असावें. असें त्यांच्या मनांत येतांच ते जवळच्या चाकरास म्हणाले, " ह्या माझ्या उजव्या हातानें आंबा तोडला आहे, तर माझा हा उजवा हात तोडून काढ. " तेव्हां शिवाजी-महाराज त्यांस म्हणाले " हें आपलें करणें बरोबर नाहीं. या बागेची लावण आपणच केली आहे. त्या अर्थीं आपण इचे मालकच आहां. " हें ऐकून दादोजींनीं आपला हात तोडण्याचा बेत रहीत केला. परंतु अशी चूक

आपल्या हातून पुनः होऊं नये म्हणून आठवणीकरितां त्यांनीं आपल्या आंगरख्याची एक अस्तनी लांडी केली. व अशा लांड्या अस्तनीचा आंगरखा ते आमरण वापरीत असत.

ड्यूक ऑफ वेलिंगटन् याची सत्यनिष्ठा.

सुप्रसिद्ध सेनापति डशूक ऑाफ वेलिंगटन् हा फार सत्यप्रिय होता. त्याच्या सत्य प्रियतेबद्दलची एक गोष्ट खालीं देत आहें.

एके वेळीं त्याच्या कानाला थोडासा बधिरपणा आला, म्हणून त्यानें एका तज्ञ डॉक्तरला बोलावून आणून आपला कान त्यास दाखविला. त्या डॉक्तरेंन त्याचा कान बरा होण्याबद्दल पुष्कळ खटपट केली, परंतु त्यास त्यांत यश येण्याचा रंग दिसेना. शेवटीं त्या डॉक्तरनें त्याच्या कानांत एक झणझणीत व तीव्र औषध ओतण्याचा निश्चय केला; व त्यानें तो अमलांतही आणिला. त्या योगानें सेनापति साहेबांचा कान बरा तर झाला नाहींच, पण तो उलटा अतिशय बिघडला, व कानांत सारखा ठणका सुरूं झाला. वेलिंगटन् यानें त्या सर्व वेदना निमूटपणें सहन केल्या. पुढें थोड्याच दिवसांत त्यांचा नेहमींचा डॉक्तर त्यांच्या घरीं आला, त्या वेळीं त्यानें सेनापतिसाहेबांस तपासलें, तेव्हां त्यांची प्रकृति फार बिघडत चालली आहे असें त्यांच्या

डोळ्यांवरून व इतर चिन्हांवरून त्यास दिसून आलें. तेव्हां त्यानें ड्यूकसाहेबांस कान पुढें करण्याची विनंति केली व त्यानें त्यांचा कान तपासला, तेव्हां तो कान अत्यंत बिघडला असून, थोडक्या वेळांत त्यावर जर कांहीं उपाय केला नाहीं, तर तें दुखणें मेंदूला जाऊन भिडेल व त्यानें सेनापतिसाहेबांच्या जिवाला अपाय होईल, अशी त्याची पक्की खातरी झाली; म्हणून त्यानें लागलेच त्यावर रामबाण उपाय योजून त्यांच्या कानाचा ठणका बंद केला. त्या योगें कानाचा फक्त ठणका बंद झाला; परंतु ड्यूकसाहेब जन्माचे बधिर झाले. ही सर्व हकीकत जेव्हां पहिल्या डॉक्तरला कळली, तेव्हां तो त्यांच्या वाड्याकडे धांवत गेला, व आपल्या चुकीबद्दल पदर पसरून त्यांची माफी मागितली व फार दिलगिरी प्रदर्शित केली. त्यावर ड्यूकसाहेब त्यास म्हणाले " याबद्दल तुम्ही पुनः एक अवाक्षरसुद्धां काढूं नका, झाली ती गोष्ट होऊन गेली. तुम्हीं जो उपाय योजिला होता तो माझ्या बऱ्याकरितांच योजिला होता. " यावर डॉक्तर पुनः म्हणाला " महाराज आपल्या या सर्व दुःखाचें कारण मी आहें, असें जर लोकांना कळलें तर माझ्या धंद्याला कमीपणा येऊन माझें सर्वस्वीं नुकसान होईल. " तेव्हां ड्यूकसाहेब म्हणाले " ही गोष्ट दुसऱ्या कोणाला कळण्याचें कारण नाहीं. तुम्ही आपला धंदा या पुढें काळजीपूर्वक

चालू ठेवा. झाल्या गोष्टीबद्दल मी कोणाजवळ एक चकार शब्दसुद्धां बोलणार नाहीं. " यावर डाक्तर म्हणाला " तर मग पूर्वींप्रमाणें मला आपला डॉक्तर म्हणून आपल्या घरीं येण्याची परवानगी असावी; आपण मला अशी परवानगी दिली म्हणजे माझ्यावरचा आपला विश्वास उडाला आहे असें लोकांस वाटणार नाहीं." तेव्हां ड्यूकसाहेब मोठ्या आवेशानें पण दयाळूपणानें म्हणाले, " नाहीं, नाहीं, असें मी करूं इच्छित नाहीं, कारण असें करणें म्हणजे लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकून त्यांना फसविणें होय."

मधमाशा, वनमाशा आणि गांधीलमाशा.

कांहीं वनमाशा मधमाशांच्या पोळ्यांत येऊन म्हणूं लागल्या कीं, हा मध आमचा आहे. मग त्यांचें ह्यांचें भांडण लागून, उभयतां गांधीलमाशीपाशीं न्याय करावयास गेल्या. तिनें सांगितलें, जर तुम्ही कोडतांतल्या रीतीनें वाद सांगाल, तर तुम्हांस खर्च पुष्कळ लागेल, आणि निवाडाही लवकर होणार नाहीं; तर तुम्ही उभयतांही माझे मित्र, मी तुमचें कल्याण इच्छितें, म्हणून तुम्हांस सांगतें कीं, तुम्हीं उभयतां मिळून मला राजिनामा लिहून द्या, म्हणजे मी तुमचा खटला मनास आणून योग्य तो न्याय देईन. त्या गोष्टीस त्या दोघीही राजी झाल्या. मग त्या

गांधील माशीनें त्या उभय पक्षांस सांगितलें " तुम्ही उभयतांही सारख्या दिसतां, म्हणून खऱ्याखोट्याचा निवाडा करणें मला अमळ अवघड दिसतें. ह्यासाठीं मधमाशांनो, तुम्हीं असें करा कीं, एक रिकामें पोळें घ्या; आणि वनमाशांनो, तुम्हींही तसेंच एक घ्या; आणि त्यांत मध करून उभयतां मजपाशीं आणा; म्हणजे मी तुमच्या मधाचा स्वाद व रंग पाहून ह्या पोळ्यांतील मध कोणाचा तें सांगेन." मधमाशा ह्या गोष्टीस लागलीच मान्य झाल्या; परंतु वनमाशा कांकूं करूं लागल्या; तें पाहून गांधिलीनें वनमाशांस सांगितलें कीं, तुम्ही खोट्या आहां आणि मधमाशा खऱ्या आहेत.

तात्पर्य.

जे लबाड आहेत, ते आपली लबाडी ज्या गोष्टींत उघडी पडेल तेथें आढेवेढे फार घेऊन, वाद लांबवून, भल्या मनुष्यास उगीच श्रमांत घालितात. त्यांच्या मनांत असतें कीं, न्यायाधीशाची दृष्टि चुकवून समयीं आपलें काम झालें तर झालें; आणि ज्याचा पक्ष खरा आहे, तो कोणत्याही गोष्टीविषयीं अडचण घालीत नाहीं.

६ कालव्यय.

वाया जावो नेदी क्षण । हेंचि भाग्याचें लक्षण ॥

तुकाराम.

आपणांस या जन्मांत ज्या कांहीं महत्त्वाच्या गोष्टी शिकावयाच्या आहेत, त्यांपैकीं " वेळेची काटकसर करून तिचा सदुपयोग कसा करावा " ही एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. मनुष्याला एकदां जर आळशी-पणाची, सुस्तपणाची, कामाची चालढकल करण्याची व वेळ व्यर्थ घालविण्याची वाईट संवय लागली, तर ती संवय घालविणें फार जड जातें. ज्यास इहपरलोकीं सुख पाहिजे असेल त्यानें व्यर्थ वेळ न दवडण्याविषयीं फार काळजी घेतली पाहिजे. वेळ व्यर्थ घालविणें यासारखी दुसरी कोणतीच हानि नाहीं. कारण गमाविलेली संपत्ति पुनः उद्योगानें मिळवितां येते; विसरलेला अभ्यास पुनः उजळणी केली म्हणजे तरतरीत होतो, गेलेली शरीरसंपत्ति सुद्धां नेमस्तपणा व औषधोपचार यांनीं भरून येणें शक्य असतें. परंतु व्यर्थ गमावलेली वेळ मात्र पुनः कशानेंही भरून मिळत नाहीं. यावरून " वेळ संपत्तीपेक्षांही अधिक मौल्यवान् आहे " अशी इंग्लिश भाषेंत एक म्हण आहे

ती अगदीं यथार्थ आहे. एक प्रसिद्ध इटालियन नेहमीं म्हणत असे कीं “ वेळ हीं माझी मालमत्ता आहे. ” आणि हें त्याचें म्हणणें खरें आहे. कारण वेळेचा जर सदुपयोग केला तर वाटेल तेवढी मालमत्ताच काय, पण स्वर्ग सुद्धां मिळवितां येईल. पुष्कळ बुद्धिवान् लोक वेळेची किंमत न समजल्यामुळें मोठमोठ्या पदवींस चढण्याऐवजीं नुसते खरडेघाशी करीत पडलेले आहेत.

पुष्कळ लोकांची नेहमीं अशी एक तक्रार असते कीं, कोणतीही चांगली गोष्ट करण्यास आपणांस फुरसतच मिळत नाहीं. परंतु त्यांच्या या तक्रारींत कांहींच तथ्य नसतें. कारण कोणत्याही समाजांत जाऊन पहा म्हणजे तुम्हांला असें आढळून येईल कीं, ज्यांना पुष्कळ फुरसत व मुबलक पैसा आहे त्यांच्या हातून चांगली गोष्ट फार क्वचितच घडलेली आहे. कारण अशा लोकांपैकीं बहुतेकांचा वेळ दुर्व्यसनांत व आळसांत जातो. वेळ सांपडत नाहीं ही तक्रार आळशी माणसाची आहे, उद्योगी मनुष्याला वेळेची कमतरता नसते. एखाद्या उद्योगी माणसास एखादें मोठें पत्र लिहिण्यास दहा मिनिटें असलीं तरी बस्स होतात; तेवढ्या वेळांत पत्र लिहून तो चट्दिशीं मोकळा होतो. परंतु तेवढेंच पत्र लिहिण्यास एखाद्या आळशी माणसांस सांगितलें तर दहा दिवसांतही तेवढें पत्र व्यवस्थे-

शीर लिहून त्याच्या हातून पुरें होणार नाहीं. ज्या पुरुषांनीं आजपर्यंत प्रचंड कामें केलीं आहेत, तीं त्यांनीं घिमेपणानें सतत उद्योगानें व एक क्षणही फुकट न घालवितां केलीं आहेत. " थेंबें थेंबें तळें सांचें " अशी एक म्हण आहे. थोडें पण नियमित काम केल्यानें पुष्कळच काम होतें. ताजमहालासारखी मोठी व प्रेक्षणीय इमारत लहान मोठे दगड एकमेकांवर ठेवून उभारलेली आहे व ती रोज थोडी थोडी बांधूनच बावीस वर्षांच्या अवधींत पुरी केलेली आहे. मोठमोठे प्रचंड ग्रंथही रोज थोडथोडे पण नियमितपणें लिहूनच पुरे केलेले असतात.

' तुम्ही मिनिटें फुकट घालवूं नका म्हणजे तुमचे तास वाया जाणार नाहींत ' असें एका उद्योगी पुरुषानें म्हटलें आहे. त्याचप्रमाणें एका संस्कृत कवीनें म्हटलें आहे. " क्षणशः कणशश्चैव विद्यामर्थं च साधयेत् " याचा अर्थ असा कीं प्रत्येक क्षणाचा संग्रह करून विद्या संपादन करावी आणि प्रत्येक कणास जपून धन मिळवावें. हा चरण मोठा सुंदर आहे. या छोट्याशा चरणांत पुष्कळ अर्थ भरलेला आहे. विद्या कशी मिळवावी आणि द्रव्य कसें संपादन करावें हें त्यांत सांगितलें आहे. एक क्षणही फुकट न घालवितां जो विद्याभ्यास करील तोच पुढें मोठा विद्वान् होईल. आजपर्यंत जे मोठमोठे विद्वान् झाले ते

वेळ फुकट न घालविल्यामुळेंच झाले. लहानपणापासून त्यांनीं आपला वेळ जेव्हां विद्या मिळविण्यांत, लिहिण्यांत, वाचण्यांत व शिकण्यांत घालविला तेव्हांच त्यांच्यापाशीं ज्ञानाचा सांठा जमला आणि लोक त्यांना विद्वान् म्हणून मान देऊं लागले.

वेळ व्यर्थ न जाऊं देण्याची संवय लहानपणापासूनच लावून घेतली पाहिजे. ही संवय लागण्यास कालाची किंमत किती आहे हें लहानपणींच मनांत ठसलें पाहिजे. जे लोक व्यर्थ वेळ घालवितात त्यांना काळाची योग्यता बरोबर समजत नाहीं. पुष्कळ क्षुद्र वस्तूंचा माणसांस लोभ असतो, परंतु काळासारख्या अमोलिक वस्तूचा त्यांच्या ठिकाणीं लोभ नसावा ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. एक पैसा सत्कर्मीं खर्च करण्याचें ज्यांच्या जिवावर येतें असे लोक शुष्क गप्पा मारून वर्षांचीं वर्षें दवडीत असतात. पण ही गोष्ट त्यांच्या गांवींही नसते.

लहानपणीं आळसांत वेळ दवडून विद्याभ्यासादिक अवश्य कर्तव्यें केलीं नाहींत, तर तारुण्य फटफजींत व दुःखांत जातें. ज्यानें तारुण्य फुकट घालविलें त्याचें वृद्धपण कष्टांत व हालांत जातें, म्हणून लहानपण व तारुण्य हीं आळसांत दवडूं नयेत. प्रत्येक गोष्ट वेळच्या वेळीं करण्याची संवय ठेविली पाहिजे. वेळच्या वेळीं

कोणतीही गोष्ट करण्यांत जो फायदा व हित आहे तें अवेळीं करण्यांत नाहीं. " वेळेवर दिलेला एक टांका अवेळीं दिलेल्या दहा टांक्यांचें काम करितों, " अशा अर्थाची इंग्लिश भाषेंत म्हण आहे, व ती अगदीं खरी आहे. कारण आपला कपडा कोठें तरी प्रथम एवढासाच फाटतो, फाटल्याबरोबर जर तो आपण शिवला तर तो जास्त फाटत नाहीं, याचा अनुभव बहुतेकांस थोडाफार असतोच. कोणतेंही काम करण्याची गोष्ट अशीच आहे. वेळच्या वेळीं, आल्याबरोबर, आपलें काम केलें म्हणजे कामांत गोंधळ माजत नाहीं, व त्यांत चुका होण्याचा संभव फार कमी असतो. कांहीं चूक झालीच तर ती ताबडतोब आपल्या नजरेला येऊन दुरस्त केली जाते. पटापट कामें उरकण्याचें सामर्थ्य अंगीं असून जो तीं उरकत नाहीं, व आतां करूं मग करूं म्हणून आळसांत वेळ घालवितो तो वेळेचा दुरुपयोग करीत आहे असें समजावें. आटपशीरपणा हा एक चांगला गुण आहे. त्याचा व्यवहारांत व उद्योगधंद्यांत फार उपयोग होतो. कोणत्याही गोष्टीचा फार पाल्हाळ लावून ती गोष्ट करण्याचें दिरंगाईवर टाकणें म्हणजे वेळेचा दुरुपयोग करणेंच होय. म्हणून कोणतेंही काम होईल तितकें आटपशीर व चांगलें करण्याची हातोटी साधण्याची

पहिल्यापासूनच खटपट ठेवावी, म्हणजे थोडक्या वेळांत पुष्कळ व चांगलें काम होऊन बराच वेळ शिल्लक राहूं शकतो. असा राहिलेला वेळ दुसऱ्या उपयुक्त व मनोरंजक कामाकडे अगर खेळणें, व्यायाम करणें, मोकळ्या हवेंत सहल करणें वगैरे शरीरवर्धक गोष्टींकडे लावितां येतो. कित्येक विद्यार्थ्यांची अशी समजूत असते कीं, पुष्कळ वेळ अभ्यास केला म्हणजे चांगला अभ्यास होतो. म्हणून ते अंगीं उत्साहशक्ति किंवा अभ्यास करण्याची मनाची तयारी नसतां उगीच कांहीं तरी घोकीत बसतात. यामुळें त्यांचा अभ्यास तर चांगला होतच नाहीं, परंतु त्यांच्या उत्साहशक्तीचा मात्र अपव्यय होतो. म्हणून प्रत्येक विद्यार्थ्यानें उत्साहशक्ति व अभ्यास करण्याची मनाची तरतरी कायम आहे तोंपर्यंतच अभ्यास करावा. म्हणजे थोडक्या वेळांत पुष्कळ व चांगला अभ्यास होतो. व असा मन लावून चार तास केलेला अभ्यास कंटाळवाण्या केलेल्या आठ तास अभ्यासापेक्षां चांगला होय. प्रत्येक कर्तव्याला वेळ नेमून द्यावी व तें कर्तव्य त्या वेळांतच करावें. वेळच्या वेळीं काम न केल्यानें कोणतेंच काम घड होत नाहीं. त्याचप्रमाणें घरांतील प्रत्येक वस्तु ठेवण्याची जागा नेमलेली असावी व त्या ठरविलेल्या जागेवरच ती वस्तु ठेवावी, म्हणजे कोणत्याही वस्तूची जरूर लागली

म्हणजे ती हुडकण्यांत वेळ व्यर्थ जाणार नाहीं. एक वेळेची व्यवस्था नसेल, तर सर्व गोष्टींची अव्यवस्था होते. जो वेळ व्यर्थ घालवीत नाहीं, त्याचा काळ आनंदांत जातो. भूतकाळ चांगला घालविला असल्यास वर्तमानकाळ आनंदांत जातो, व भविष्यकाळाविषयीं काळजी रहात नाहीं. प्रत्येक घडीपासून कांहीं तरी चांगलें काम करून घेतलें पाहिजे.

इंग्लंडचा राजा सहावा जेम्स यानें थामस हॅमिल्टन यास एकदां विचारिलें कीं, " तुम्हीं एवढी मोठी संपत्ति कशी संपादन केली. " त्यानें उत्तर केलें " महाराज, जें काम मला आज करितां येण्यासारखें असतें तें मी कधींही उद्यांवर टाकीत नाहीं, आणि जें काम मला स्वतः करतां येण्यासारखें असतें तें कधीं मी दुसऱ्यावर सोंपवीत नाहीं. "

महाराणी मेरीसाहेब.

आपल्या हल्लींच्या महाराणी मेरीसाहेब या आपला एक क्षणही फुकट घालवीत नाहींत. त्यांना लिहिण्या-वाचण्याचा फार नाद असून देवादिकांचीं भक्तिपर स्तोत्रें व पदें म्हणण्याची त्यांना फार आवड आहे. लिहिणें, वाचणें व देवाची स्तुति करणें यांला त्यांनीं दिवसापैकीं

बरेच तास नेमून दिले आहेत. त्या कोणाशीं रिकाम्या गप्पा छाटण्यांत एक पळही फुकट घालवीत नाहींत. कोणी जवळ गोष्टी बोलूं लागलें कीं त्या लगेच उठतात व कांहीं तरी शिवणकाम अगर विणकाम हातांत घेऊन तें करीत बसतात, व तें करतां करतां गोष्टी ऐकतात. अशा वेळांत आपण स्वतः शिवलेलीं आंगडीं टोपडीं, गोरगरिबांस व त्यांच्या मुलांबाळांस नेहमीं त्या वांटून देतात. त्या आपल्या मुलांना स्वतः शिक्षण देतात व त्यांची शुश्रूषा व देखरेख स्वतः करितात. इतकें करून त्या नियमानें व्यायाम करितात.

पहा ! उद्योग व वेळेचा सदुपयोग करण्याची केवढी हौस !

बेन्जामिन् फ्रांकलिन्.

हा सुप्रसिद्ध पुरुष अमेरिका खंडांतील बोस्तननामक शहरीं इ० स० १७०६ त जन्मला. त्याचा बाप अगदीं गरीब स्थितींत होता. तो साबणे आणि मेणबत्या करून आपला निर्वाह करी. बेन्जामिन् याला लहानपणापासूनच पुस्तकें वाचण्याचें फार व्यसन होतें. त्याला जितका पैसा मिळे तितका तो पुस्तकें विकत घेण्याकडे लावी. जीं

पुस्तकें विकत घेण्याचें त्यास सामर्थ्य नव्हतें तीं तो भाड्यानें आणीत असे. त्याला दिवसास फार कष्ट करावे लागत असत तरी तो मध्यरात्रपर्यंत जागून अभ्यास करीत असे. याप्रमाणें बेन्जामिन् हा स्वतः पुस्तकें वाचून मोठा विद्वान् झाला. आणि केवळ आपल्या उद्योगानें मोठी प्रतिष्ठा पावला. पुढें तो मोठा संपत्तिमान् झाला. तो फ्रान्स देशाच्या दरबारीं कितीएक वर्षेंपर्यंत अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानांच्या तर्फें वकील होता. तो इ०स० १७९० त निवर्तला. आपल्या उत्कर्षाची हकीकत त्यानें स्वहस्तें लिहून ठेविली आहे. तींत एके ठिकाणीं त्यानें असें म्हटलें आहे:—

"संपत्तिमान् होण्याचीं मुख्य साधनें दोन आहेत, एक उद्योग आणि दुसरें हात राखून खर्च करणें, म्हणजे आपला पैसा आणि आपला वेळ हीं कधीं व्यर्थ जाऊं न देतां आपल्याकडून होईल तितका त्यांचा चांगला उपयोग करावा. ह्या दोन गुणांच्या खालोखाल, मनुष्याचा उदय होण्यास वेळच्या वेळीं काम करणें आणि सर्वदा न्यायानें वागणें हे गुण फार उपयोगीं पडतात. उद्योग, खर्चाचा बातबेत, वेळेचा सदुपयोग आणि तारतम्य ह्या गोष्टी जरी उत्तम आहेत, तरी केवळ त्याजवरच अवलंबून राहूं नये, कारण परमेश्वरी कृपेवांचून त्या सर्व व्यर्थ होत."

या अत्यल्प चारित्रावरून असें दिसून येईल कीं जगांत प्रतिष्ठा, मान व संपत्ति मिळविण्यास जे गुण लागतात त्यांपैकीं " वेळच्या वेळीं कामें करणें व वेळ व्यर्थ जाऊं न देणें " हे दोन गुण अवश्य अंगीं असले पाहिजेत. हे दोन गुण जर अंगीं नसतील तर मनुष्य जगांत पुढें येऊं शकणार नाहीं.

---

७ आरोग्य.

शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्.

प्राणीमात्रास प्रथम सुख म्हटलें म्हणजे आरोग्य हें होय. प्रकृति निरोगी असली म्हणजे सर्व सुखांचा खरा अनुभव व उपभोग त्यास घेतां येतो. रोगानें पीडलेल्या मनुष्यास कशांतच सुख वाटत नाहीं, हा अनुभव प्रत्येकास थोडाबहुत असतो. एक दिवस ताप येऊन तोंडास अरुचि आली म्हणजे पदार्थ कितीही गोड व मधुर असला तरी, तो त्यास बेचव लागून, तो खाण्यास तो कंटाळतो. ज्यास आरोग्य नाहीं त्याच्या हातून स्वहित सुद्धां व्हावयाचें नाहीं, मग परहिताची वार्ता कशास पाहिजे. मनुष्य कितीही बुद्धिवान् असला, व जर तो अशक्त आहे तर त्याच्या हातून विद्या व्हावयाची नाहीं,

सुखाचीं साधनें त्यास अनुकूल असलीं तरी त्यास सौख्य व्हावयाचें नाहीं. म्हणून सर्व संपत्तींत शरीर संपत्ति श्रेष्ठ होय. याकरितां शरीर निरोगी ठेवण्याकडे मनुष्यमात्राचें लक्ष असणें अगदीं अवश्य आहे. तें तसें ठेवण्याकरितां नेहमीं दोन गोष्टींकडे लक्ष पुरविलें पाहिजे. एक नियमितपणानें वागून रोग न होऊं देण्याविषयीं काळजी घेणें, व दुसरी रोग झाला असतां तो वाढूं न देतां दूर करण्याची योजना तत्काळ करणें. त्यांपैकीं पहिल्या गोष्टीसंबंधाचेंच दिग्दर्शन येथें थोडक्यांत केलें आहे. त्याप्रमाणें वागलें म्हणजे दुसऱ्या गोष्टीची आवश्यकता फारच क्वचित् भासेल, नाहींच म्हटलें तरी चालेल.

आरोग्य राहण्याकरितां खाण्यापिण्यांत नियमितपणा ठेविला पाहिजे. कारण, अजीर्ण हें सर्व रोगांचें मूळ आहे. तें न होऊं दिलें म्हणजे प्रकृति सहसा बिघडावयाची नाहीं. एखादा पदार्थ आवडत असून, तो प्रकृतीस मानत नसेल तर तो खाऊं नये. जे पदार्थ आपल्या प्रकृतीस मानतील त्यांचेंच सेवन करावें. मुलांस समजत नसतें तेव्हां आईबापांनीं त्यांस नियमित राखण्याविषयीं काळजी घ्यावी, व समजूं लागल्यावर ती ज्याची त्यानें घ्यावी. एखादा पदार्थ फार आवडतो म्हणून तो अजीर्ण होण्याइतका खाऊं नये. अवश्य तेवढीच झोंप

घ्यावी. दिवसा कधींही निजूं नये व रात्रीं दहाच्या पुढें जागूं नये. दिवसा निजणें व रात्रीं जागणें म्हणजे रोगांस आमंत्रण करण्यासारखेंच आहे. वेळच्या वेळीं निजावें व पाहांटे लवकर उठावें. विद्यार्थ्यांनीं तर रात्रीं नऊ वाजण्याच्या पुढें जागूं नये, व पाहांटे चार वाजण्याच्या आंत उठावें. परमेश्वराचा हेतु असा दिसतो कीं, सर्वांनीं पहाटेस उठून आपआपल्या कामधंद्यास लागावें. ह्यास उदाहरण पक्षी व लहान मुलें यांचें होय. मुलें व पक्षी स्वाभाविकच पहांटे उठतात. व्रतस्थ राहूं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांस प्रातःकाळची वेळ फार महत्त्वाची आहे. सकाळीं जागें होण्याबरोबर अंथरूण सोडण्याची संवय प्रत्येकानें ठेवावी. हा नियम पाळण्यानें अनेक अनिष्ट परिणाम टळतात. सकाळीं उशिरां निजून उठण्याची संवय घातुक आहे. ह्या वाईट संवयीनें शरीरप्रकृतीवर फार वाईट परिमाण घडतात, त्या योगानें नानातऱ्हेचे रोग जडतात. जो उशिरां निजून उठतो त्याच्या अंगीं काम करण्याची उत्साह शक्ति फार कमी असते. दिवसभर काम केलें तरी त्याच्यानें काम उरकत नाहीं; म्हणून सकाळीं लवकर उठण्याची संवय प्रत्येकानें लावून घ्यावी हें फार हितावह आहे.

प्रातःकाळीं उठल्याबरोबर नित्यक्रमाला लागण्यापूर्वीं

मलमूत्रविसर्जन करून स्नान करावें. थंड पाण्याचें स्नान सोसल्यास फारच उत्तम आहे. तें न सोसल्यास ऊन पाण्यानें स्नान करावें. कपडे आपल्या हवेला व प्रकृतीला साजतील असेच असावेत. उगीच फॅशनला बळी पडून आपल्याला सहन न होतील इतके उबदार व आवळ कपडे घालूं नयेत.

शरीरांतल्या व्याधि नाहींशा व्हाव्या, अंगांत ताकद येऊन रोज नवा दम यावा, उत्साह वाटावा, अंगीकृत-कार्य उत्तम तऱ्हेनें तडीस जावें, अशी ज्याची इच्छा असेल त्यानें नित्य व नियमित व्यायाम करावा. शरीर प्रकृति उत्तम रहावयाला व उत्तम आरोग्याचा उपभोग घेत दीर्घायु होण्याला ईश्वरानें व्यायाम हेंच उत्तम औषध निर्माण करून ठेविलें आहे. व्यायाम हें उत्तम औषध आहे. तें घेण्याला कवडीचाही खर्च लागत नाहीं. हें औषध सर्वांना जरी फुकट मिळण्यासारखें आहे तरी त्याची योग्यता फार आहे. लाखों रुपयांच्या औषधाहूनही हें अधिक गुणकारी आहे. परंतु जी गोष्ट मनुष्यांस फुकट किंवा थोड्या श्रमानें मिळते त्याची किंमत त्यांस कळत नाहीं. म्हणून बहुतेक मनुष्यें व्यायाम घेण्याची टाळाटाळ करितात. वयमानाप्रमाणें जर नित्य नेमानें व्यायाम केला तर मनुष्याला रोग आणि व्याधि हीं

फारच थोडीं होतील, मुळींच होणार नाहींत म्हटलें तरी अतिशयोक्ति होणार नाहीं. जो मनुष्य व्यायाम करीत नाहीं, व्यायामाला कस्पटासमान लेखतो, तो आपण होऊनच आपल्या पायावर कुऱ्हाड मारून घेतो, असें समजावें. बहुतेकांना व्यायामापेक्षां पैसा जास्त वाटतो, ते व्यायामापेक्षां तात्कालिक सुखांना जास्त भुलतात, परंतु ही त्यांची मोठी चूक आहे. त्याचप्रमाणें कित्येक विद्याव्यासंगी लोकांना व्यायामांत वेळ खर्च करणें म्हणजे तो व्यर्थ दवडणें असें वाटतें. म्हणून ते व्यायामाकडे दुर्लक्ष करितात. परंतु जितके तास ते व्यायाम कमी घेतात तितके महिने त्यांचें आयुष्य कमी होत असतें, हें त्या बिचाऱ्यांच्या लक्षांत येत नाहीं.

स्नायु निकोप व सुदृढ होण्यास योग्य प्रकारें व्यायाम करणें अवश्य आहे. परंतु हा व्यायाम सतत व नियमानें केला पाहिजे. कधीं केला, कधीं नाहीं असें उपयोगाचें नाहीं. पुष्कळ दिवस स्वस्थ बसून रहावयाचें व मग कांहीं दिवस सडकून व्यायाम करावयाचा अशी कित्येकांची चाल असते. परंतु त्यापासून कार्यसिद्धि न होतां उलट हानि मात्र होते. याकरितां असें न करितां जो कांहीं व्यायाम करणें तो नित्य व नियमितपणें करावा. कोणत्या प्रकारचा व्यायाम करणें तो ज्याचा त्यानें

आपल्या प्रकृतीच्या मानानें ठरवावा. व्यायाम करण्याच्या अनेक तऱ्हा आहेत. त्यांची माहिती करून घेऊन त्यांपैकीं ज्याला जो मानेल किंवा आवडेल त्यानें तो करावा. मात्र शरिराच्या सर्व भागांतील स्नायूंची सारखी वाढ करण्याकडे विशेष लक्ष पुरवावें. नाहीं तर कांहीं भाग पुष्ट व बळकट होऊन कांहीं तसाच कमजोर राहील. असें झाल्यास शरीर बेढब दिसूं लागेल आणि आरोग्यही असावें तसें राहणार नाहीं. म्हणून प्रत्येक मनुष्यानें व्यायाम केला पाहिजे, व तो नियमित असून आपल्या प्रकृतीस मानेल असा असावा. उघड्या हवेंत व्यायाम करणें हें फार चांगलें आहे. प्रत्येक मनुष्यानें मोकळ्या हवेंत निदान तीन तास तरी व्यायाम करावा. उघड्या हवेंत व्यायाम करण्यास पर्जन्यामुळें अथवा दुसऱ्या कांहीं नडींमुळें कचित् प्रसंगीं व्यत्यय आल्यास घरांतच पुष्कळ प्रकाश व चांगली हवा येत असेल अशा ठिकाणीं व्यायाम करावा. व्यायाम करणें तो शरीर थकून जाईपर्यंत मात्र करूं नये. व्यायामाचा अतिरेक झाला म्हणजे शरिरांतील मुख्य यंत्र जें काळीज तें बिघडतें, व तें बिघडलें म्हणजे शरिरास फार अपाय होतो, म्हणून व्यायामाचा अतिरेक होऊं देऊं नये.

आरोग्य राहण्यास व्यायाम हें जसें एक फुकटचें

औषध आहे, तसेंच शुद्ध व मोकळी हवा हेंही एक फुक-टचें औषध आहे. मोकळ्या हवेची योग्यता व्यायामा-इतकीच आहे. मोकळी हवा घेणें म्हणजे अमृताचे घुटके घेण्यासारखेंच आहे. म्हणून जितकी ताजी हवा पोटांत घेणें शक्य असेल, तितकी प्रत्येक मनुष्यानें अवश्य घ्यावी. ताज्या व शुद्ध हवेंत फिरलें असतां मनाला एक प्रकारची विलक्षण हुषारी वाटते. याचा अनुभव पुष्कळांना असे-लच. मनुष्य कितीही खिन्न व मलूल असूं द्या; ताज्या व शुद्ध हवेचे थोडेसे घुटके त्याच्या पोटांत जातांच, त्याची खिन्नता व मलूलपणा हीं तेव्हांच नाहींशीं होतात, व त्याला हुषारी व आनंद वाटूं लागतो. याचें कारण असें कीं, नुकत्याच पोटांत गेलेल्या ताज्या हवेमुळें त्याचा मेंदु व मज्जातंतु हे तरतरीत होतात व यामुळें त्याला हुषारी वाटते. दूषित हवा हें एक प्रकारचें वीषच आहे. तें वीष प्रकृतीस फार अपाय करितें, म्हणून दूषित हवेंत केव्हांही राहूं नये. नेहमीं हवाशीर घरांत रहावें. हवाशीर घरांत राहिल्यानें प्रकृति उत्तम रहाते. घराच्या सर्व खिडक्या दिवसभर उघड्या टाकाव्यात, म्हणजे सर्व घरांत शुद्ध व मोकळी हवा खेळेल. घर व वस्त्रप्रावरणें हीं नेहमीं स्वच्छ ठेवावींत. स्वच्छतेचा व आरोग्याचा निकट संबंध आहे. स्वच्छतेच्या अभावीं आरोग्य राहणें शक्य नाहीं.

शरीर आरोग्यसंपन्न असलें म्हणजे मनही खंबीर होतें. इच्छाशक्ति आणि आत्मसंयमन यांचा पूर्ण आरोग्य संपादन करण्याचे कामीं अत्यंत उपयोग होतो. याकरितां परिश्रम करून तीं कमाविलीं पाहिजेत. पुष्कळ लोकांवर त्यांच्या मनोवृत्तींचा व कल्पनांचाच अंमल जास्त असतो. ते सर्वस्वीं त्यांच्या अगदीं कह्यांत असतात. त्यांचे बहुतेक आजार किंवा विकार त्यांच्या कल्पनेमुळेंच उत्पन्न झालेले असतात. कारण त्यांना आपले विचार, विकार व भावना यांचेवर दाब ठेवितां येत नाहीं. यामुळें त्यांचा विकार किंवा आजार बलिष्ठ होऊन विकोपास जातो. भीति, क्रोध, संताप, त्रास, चिंता, शोक यांमुळें अपस्मार, फेंपरें अपचन वगैरे अनेक विकार उत्पन्न होतात. सबब मनोवृत्तीवर दाब ठेवून भीति वगैरे मनोविकार न उद्भवतील याबद्दल पूर्ण खबरदारी घ्यावी. इच्छाशक्ति व मनोवृत्ति ह्या ताब्यांत ठेविल्यानें शारीरिक मानसिक व नैतिक आरोग्याचा लाभ सहज होतो. शारीरिक सामर्थ्य जसें व्यायामानें वाढवितां येतें, तसें मानसिक सामर्थ्यही प्राणायामानें वाढवितां येतें. मनामध्यें येणाऱ्या प्रत्येक विचाराचे परिणाम शरीरावर घडून येतात. जर ते विचार शुद्ध सात्विक आणि पवित्र असतील तर शरीराचें आरोग्य व सामर्थ्य हीं सहज वाढतील. सारांश चांगली प्रकृति

राहण्यास मनाच्या प्रसन्नतेची फार जरूर आहे. म्हणून नेहमीं आनंदी व हंसतमुख असावें.

सारांश आरोग्य राहण्यास शरीर व मन हीं दोन्ही चांगल्या स्थितींत पाहिजेत, म्हणून तीं दोन्ही नियमित व्यायाम घेऊन, सुस्थितींत ठेवावींत; हें उत्तम.

सुप्रसिद्ध व्यायामशास्त्रज्ञ बरनार मॅकफेडन म्हणतात:—

" प्रत्येक मनुष्यानें रोगमुक्त होण्याकरितां नैसर्गिक नियमांचें अवलंबन करावें; नेहमीं औषधें घेत गेल्यानें दिवसेंदिवस अनेक रोग जडतात.

महाराणी आलेक्झांड्रा.

आपले परमपूज्य बादशहा पांचवे जॉर्जमहाराज, यांच्या मातोश्री आलेक्झांड्रा यांची प्रकृति अगदीं निकोप आहे. व वयाच्या मानानें त्या अद्याप पुष्कळ तरुण व सुंदर दिसतात. याचें मुख्य कारण त्यांची साधी रहाणी व भोजनपद्धति हें होय. ह्या आपल्या माजी महाराणी-साहेब पहिल्यापासूनच खालील पद्धतीनें राहत आल्या आहेत.

कोणत्याही एका वेळीं त्या जास्त अन्न खात नाहींत. दर एक जेवणाच्या वेळीं एका घासाची भूक राखून त्या जेवतात. विशेष श्रम करावयाचे असले तरी त्या जास्त अन्न खात नाहींत. फार झालें तर एखादा दुसरा पेला

दूध त्या श्रम करण्यापूर्वी घेतात. त्या चहा, कॉफी व दारू वगैरे पेयांस शिवतसुद्धां नाहींत. दूध व संत्रीं वगैरे फळांचा रस हींच त्यांचीं चैनीचीं पेयें आहेत. त्या मांस फारसें खात नाहींत. क्वचित् हलकें मांस खातात. रोटी, बिस्कुटें, लोणी वगैरे पदार्थच बहुतेक रोज त्या खातात. फळें, फळभाज्या व पालेभाज्या हीं त्यांचीं तोंडीलावणीं होत. तळकट, आंबट व मसाल्याचे पदार्थ त्या खात नाहींत.

त्या न्याहरीच्या वेळीं बहुतकरून फळें व रोटी खातात; मध हेंच त्यांचें गोड खाद्य आहे. मेवामिठाई अथवा जड पक्वानें त्या फारशा खात नाहींत. तिसऱ्या प्रहरीं चहा न घेतां त्या गरम दूध घेतात व संध्याकाळीं दोनप्रहरच्या जेवणाप्रमाणेंच साधें अन्न खातात.

नुसत्या जेवणाच्या टापटिपीनेंच पूर्ण आरोग्य लाभतें असें नाहीं. आरोग्यसंपादनास ताजी हवा व व्यायाम यांची जरूर आहे हें तत्त्वही त्यांना मान्य आहे. त्या रोज नियमानें नियमित व्यायाम करितात व खुल्या हवेंत सहल करावयास जातात. मनाचे शरीरावर परिणाम घडतात ही गोष्ट त्यांना मान्य आहे, म्हणून मन नेहमीं सुप्रसन्न व सुविचारसंपन्न ठेवण्याचा त्या दीर्घ प्रयत्न करितात. यामुळें त्यांचें आरोग्य व तारुण्य यांचा अद्याप भंग झालेला नाहीं.

महाराणीसाहेबांची ही साधी राहणी सर्वांनीं लक्षांत ठेवण्यासारखी आहे. इंग्लंडचें साम्राज्य केवढें मोठें आहे हें सर्वांस महशूर आहेच. एवढ्या मोठ्या प्रचंड साम्राज्याच्या साम्राज्ञीनें ऐषआरामाचा मोह दूर सारून साधी व निरलस राहणी ठेवणें हें केवढें आश्चर्य आहे बरें ! अशा थोर विभूति इंग्लंडांतील राजघराण्यांत आहेत म्हणूनच इंग्लंड हें ' कधींही सूर्य न मावळणाऱ्या प्रचंड प्रदेशावर राजसत्ता गाजवीत आहे. ईशकृपेनें आपल्या हिंदुस्थानाला असले राजे लाभले आहेत हें हिंदुस्थानचें महद् भाग्यच होय.

या आपल्या महाराणीसाहेबांप्रमाणेंच मोंगल साम्राज्याचा अधिपति औरंगजेब बादशहा याची राहणीही अगदीं साधी होती. तो रोज दहा मैल पायांनीं चालून व्यायाम घेत असे. यामुळें तो सशक्त, निरोगी व दीर्घायु होता.

एका वर्तमान पत्राच्या संपादकाची दिनचर्या.

अमेरिकेंत मिस्तर ब्रायंट या नांवाचा एक मोठा विद्वान् दीर्घोद्योगी व जबर विद्याव्यासंगी पुरुष होऊन गेला. हा गृहस्थ न्यूयॉर्क शहरांतील " इव्हिनिंग पोस्ट " पत्राचा संपादक होता. हा पुष्कळ वृद्ध होऊन व उत्तम आरोग्य उपभोगून मरण पावला. त्यानें आपली दिनचर्या एके

ठिकाणीं लिहिली आहे. त्यापासून सर्वांनीं बोध घेण्यासारखा आहे, म्हणून ती देण्यांत येत आहे.

मिस्तर ब्रायंट लिहितातः—“मी बराच वृद्ध झालों आहें. पण म्हातारपणीं येणारी कोणतीही अशक्तता मला भासत नाहीं. माझी शक्ति, तरतरी व उत्साह हीं जशीं असावींत तशीं उत्तम आहेत. मी पाहांटेस निजून उठतों. हिंवाळ्यांत सुमारें साडेपांच वांजतां उठतों, उन्हाळ्यांत याच्याही पूर्वीं तास अगर अर्धा तास उठतों. नंतर बेताचे कपडे अंगावर घालून निरनिराळ्या प्रकारचा व्यायाम करितों. ह्या व्यायामाचा मुख्य कटाक्ष छातीं रुंद होण्याकडे असतो. इतर सर्व अवयवांस व स्नायूंस व्यायाम होईल याकडेही माझें लक्ष असतें. याप्रमाणें तासभर व्यायाम केल्यावर मी स्नान करतों. मी खेड्यांत असलों म्हणजे खोलींतल्या खोलींत व्यायाम करण्याचेऐवजीं मी शेतांत वगैरे जातों व त्या ठिकाणीं चांगला व्यायाम होईल असें कांहीं काम करतों. नंतर स्नान झाल्यावर न्याहारीची तयारी नसल्यास ती तयारी होईपर्यंत मी माझा अभ्यास करतों. “नंतर न्याहारी झाल्यावर थोडा वेळ वाचनांत घालवून शहरांत असलों म्हणजे ‘इव्हिनिंग पोस्टाच्या आफिसांत तीन मैल पायीं चालत जातों, व त्या ठिकाणीं सुमारें तीन तास सारखें काम केल्यावर परत पायीं चालत

घरीं येतों. पाऊस असो, वारा असो, अगर रस्त्यांत कितीही चिखल झालेला असो, त्याचा विचार मी मनांत आणीत नाहीं. खेड्यांत असलों म्हणजे माझ्या लायब्ररींत अभ्यासांत मी मग्न झालेला असतों. कंटाळा आला म्हणजे शेतांत अगर बागेंत जाऊन झाडांना पाणी घालणें, त्यांना भर घालणें वगैरे कामें करतों, आणि कांहीं वेळानें माझीं पुस्तकें मी वाचीत बसतों. गाडींतून मीं क्वचित् फिरतों. होतां होई तों पायीं चालणेंच मला फार आवडतें. ''

ग्लॅडस्टनसाहेबांचा व्यायाम.

इंग्लडांत, ग्लॅडस्टन साहेब म्हणून एक सुप्रसिद्ध मुत्सद्दी होऊन गेले. ते नेहमीं दोन तास चालण्याचा व्यायाम करीत. मरेपर्यंत हा त्यांचा नियम एक दिवसही चुकला नाहीं. ज्या दिवसांत त्यांच्यावर कामाचा बोजा अतोनात पडे, अशा दिवसांत सुद्धां त्यांचा हा नियम चुकला नाहीं. जेव्हां ते मुख्य प्रधान होते, तेव्हां त्यांस रोजीं सोळा तास काम पडे, तरी इतकें काम करूनही ते आपला व्यायाम घेतल्याखेरीज रहात नसत. हवा वाईट पडली असली, पाऊस पडत असला तरी ते नियमानें दोन तास चालून यावयाचेच. त्यांनीं स्वतः एका गृहस्थास सांगितलें कीं, '' मला माझा रोजचा व्यायाम घेण्यास

दिवसा सवड झाली नाहीं तर तो मी रात्रीचा घेतों. ज्या दिवसांत पार्लमेंट सभा पहाटे तीन तीन चार चार वाजेपर्यंत चाले तरी तेथले काम संपवून नंतर ते आपला व्यायाम घेण्यास जात असत. त्या वेळीं पाऊस पडत असला तरी ते जावयाचेच; शिवाय सवडीप्रमाणें लांकडें फोडण्याचाही व्यायाम ते घेत असत. याचें कारण त्यांची अशी पक्की समजूत होती कीं, शरीर निरोगी व निरलस राहण्यास व्यायामाची जरुरी आहे.

प्रोफेसर राममूर्त्तीं नायडू.

या नांवाचे प्रचंड मल्ल सध्यां हिंदुस्थानांत आहेत. यांस आधुनिक भीमसेन असें म्हणतात. यांचा जन्म मद्रास इलाख्यांतील विजयानगरजवळ असणाऱ्या एका खेड्यांत इ० स० १८७३ या वर्षीं झाला. राममूर्त्तींचे आईबाप फार धिप्पाड व सशक्त नव्हते. ते सामान्य मनुष्याप्रमाणेंच होते. लहानपणीं राममूर्त्तीं फार अशक्त होते; प्रथम प्रथम तर ते आजारी असून त्यांस दम्याची व्यथा जडलेली होती. परंतु पुढें त्यांना तालीम करण्याचा नाद लागला, यामुळें हळूहळू त्यांचे सर्व रोग मागें हटत गेले. लहानपणीं ते फक्त देशी तालीम म्हणजे दंड, बैठका, जोडी, लेजीम, त्याचप्रमाणें मलखांब, दोरी

फळी वगैरे करीत, आणखीं थोडेसे मोठे झाल्यावर ते डंबेल्स, बार वगैरे तालीमबाजींतही मोठे प्रवीण झाले. ते पहाटे तीन वाजतां उठून सहल करावयास जात, व एका दमानें बारा मैलपर्यंत पळत. नंतर एक तासपर्यंत ते पोहण्याचा व्यायाम करून नऊ वाजेपर्यंत कुस्त्या खेळत. यांना लहानपणापासूनच पुराणांतील मारुती व भीम यांच्या कथा ऐकण्याचा फार नाद आहे. त्यांची शक्ति इतकी वाढलेली आहे कीं, ते आपल्या छातीवर व दंडा-वर मोटार गाडी व खटार गाडी सहज घेऊं शकतात. ते बऱ्याच जाडीचे साखळदंड तोडतात. एवढें प्रचंड सामर्थ्य त्यांनीं केवळ शारीरिक व मानसिक व्यायामानेंच मिळविलें आहे. शारीरिक व्यायामाप्रमाणेंच ते मानसिक व्यायामही करितात. ते मानसिक व्यायामाचें महत्त्व जास्त समजतात. मानसिक व्यायाम करण्यास ते कधींही चुकत नाहींत, सकाळीं निजून उठल्यावर आपलें पेय प्राशन केलें कीं, ते प्राणायामाला बसतात. त्यांची अशी खात्री आहे कीं, मनोजयानेंच मनुष्याला शरीरसामर्थ्य संपादन करतां येतें. पूर्ण ब्रह्मचर्यव्रत पाळलें म्हणजे शरीरसामर्थ्य वाढतें. असा त्यांचा अनुभव आहे. ते अद्याप ब्रह्मचारीच आहेत.

सांप्रत राममूर्ती जरी मोठ्या कीर्तीला व वैभवाला पोंचले आहेत तरी ते अगदीं साधेपणानें व काटकसरीनें वागतात,

त्यांना कोणतेंही दुर्व्यसन नाहीं, त्यांना पुष्कळ पसा मिळतो व त्यांपैकीं पुष्कळसा पैसा ते परोपकारांतच खर्च करितात. त्यांचा पोषाख अगदीं साधा असतो. खाण्यापिण्यांतही ते फार नेमस्त आहेत. ते फक्त वनस्पति आहारच करितात. ते मांस व अंडीं अगदीं खात नाहींत. त्यांची रहाणी अगदीं साधी असून विचार फार उच्च आहेत.

प्रो. राममूर्तींच्या वर दिलेल्या अगदीं त्रोटक चरित्रावरून आपणांस असें दिसून येईल कीं, अगदीं अशक्त मनुष्यास सुद्धां मानसिक व शारीरिक व्यायामानें प्रचंड शक्ति कमावितां येते.

---

८ उद्योग.

उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीः ।
उद्योग्याचे घरीं रिद्धी सिद्धी पाणी भरी.

ईश्वरानें मनुष्यास हात, पाय, डोळे इत्यादि इंद्रियें दिलीं आहेत, तीं उगीच शोभेसाठीं दिलीं नाहींत. काहीं तरी चांगला उद्योग करून त्यांचा उपयोग करावा या साठींच तीं दिलीं आहेत. मनुष्यासाठीं सर्व पदार्थ देवानें उत्पन्न करून ठेविले आहेत, परंतु ते केवळ मनुष्याच्या

उशाशीं ठेविले नाहींत. ते मनुष्यानें उद्योग करून मिळविले पाहिजेत, असा ईश्वराचा उद्देश आहे. पहा; धान्य पेरावें लागतें, पुढें तें कापून मळून घरीं आणावें लागतें, नंतर तें वाळवून दळावें व त्याच्या भाजून भाकरी कराव्या, तेव्हां त्या मनुष्याला खावयाला मिळतात. ही भाकरी मिळेपर्यंत किती श्रम व उद्योग करावा लागतो पहा. खाणीच्या पोटांत नानाप्रकारचे मौल्यवान् व उपयुक्त धातु व रत्नें हीं ठेविलीं आहेत, तीं खणून बाहेर काढिलीं पाहिजेत, नंतर त्यांवर पुष्कळ मेहनत करून त्यांचे नानाप्रकारचे अलंकार, भांडीं, शेतीचीं आउतें वगैरे बनविलीं पाहिजेत. तेव्हां तीं मनुष्याच्या उपयोगीं पडतात. कापूस, लोंकर वगैरे पदार्थांचेंही असेंच आहे. त्यांचीं वस्त्रप्रावरणें वगैरे तयार करून तीं मनुष्याच्या अंगावर पडेपर्यंत मनुष्यास अत्यंत श्रम करावे लागतात. त्याचप्रमाणें उंच झाडांवर नानातऱ्हेचीं रसभरित फळें उपजविलीं आहेत, तीं वर चढून काढिलीं पाहिजेत. गुलाबासारखीं सुवासिक फुलें निर्माण केलीं आहेत परंतु हाताला कांटे बोचल्याशिवाय, तीं मनुष्याला प्राप्त होत नाहींत. बाकीच्या बहुतेक सर्व पदार्थांचें असेंच आहे.

उद्योग करणें हें मनुष्याचें मुख्य कर्तव्य होय. उद्योगावांचून कोणतेंच कार्य सिद्ध होत नाहीं. उद्योग हा आपला

बंधु व आळस हा आपला शत्रु आहे. उद्योगावांचून प्रतिष्ठा मिळत नाहीं. उद्योगानें पाहिजे तो पदार्थ मिळवितां येतो. उद्योगी मनुष्याला पुष्कळ मित्र असतात. उद्योगानें शरीरप्रकृति सुदृढ व चांगली रहाते. उद्योगानें धन प्राप्त होतें. उद्योगानें विद्या येते. उद्योगानें ईश्वरीज्ञान प्राप्त होतें. सारांश, उद्योग ही कामधेनु आहे. कामधेनु जवळ असली म्हणजे जसे इच्छिलेले सर्व पदार्थ मिळतात, तशी उद्योगानें आपणांस हवी ती वस्तु प्राप्त करून घेतां येते. जे लोक उद्योगी असतात, त्यांची स्थिति सर्व प्रकारें चांगली असते. जो उद्योग करितो त्याला बहुधा कशाचीही वाण पडत नाहीं. उद्योगाशिवाय मनुष्य सुखी असूं शकत नाहीं. मनुष्याला कांहीं तरी शारीरिक व मानसिक श्रम असल्यावांचून त्याची प्रकृति निरोगी रहात नाहीं.

एका विद्वानानें म्हटलें आहे:—

" उद्योग हा मोठ्या नदीसारखा गंभीर व खोल असतो त्याच्या प्रवाहामुळें सर्व प्राण्यांस जीवन मिळतें, शेतें हिरवींगार रहातात, व बागा फळांफुलांनीं शोभिवंत होतात. आळस हा कोंडलेल्या पाण्यानें झालेल्या दलदलीप्रमाणें आहे. त्यांतून विषारी वाफा मात्र निघतात. उद्योगानें बागांत फळें व फुलें मात्र निघतात. आळसानें त्याच बागेंत

गवत उगवतें. झाडें वाळून जातात. उद्योगानें धातूंस घांसणी मिळून त्या चकचकीत राहतात, आणि आळसानें त्यांवर गंज चढून त्या क्षीण होतात."

उद्योगाच्या योगानें मनुष्य स्वावलंबी होतो. त्यास होतां होईल तों दुसऱ्यावर अवलंबून रहावें लागत नाहीं. दुसऱ्यावर अवलंबून न राहतां स्वतःच्या श्रमानेंच जो उदयास येतो, त्याची थोरवी इतरांपेक्षां जास्त असते. खऱ्या यशाचें व जयाचें मुख्य कारण दीर्घोद्योग हेंच आहे. एक वेळ उद्योग करून फलप्राप्ति झाली नाहीं, म्हणून आपण अभागी आहों असें समजूं नये. जयाविषयीं एका औद्योगिक थोर पुरुषानें म्हटलें आहे:—

"जय मिळविण्यास सतत उद्योग करण्यासारखा दुसरा चांगला उपायच नाहीं. दैव हेंही जय मिळण्याचें एक कारण असतें, पण तें जय मिळण्याचें मुख्य व खात्री-लायक साधन नव्हे. दैवानें व प्रारब्धानें जय मिळण्या-सारखी सुसंधि प्राप्त होते. दैव आणि आळस यांची मैत्री केव्हांही जमावयाची नाहीं. जो मनुष्य आलेल्या संधीचा फायदा करून घेऊन आपले प्रयत्न फलद्रूप करून घेतो तोच नांवलौकिकास चढतो. संधि मनुष्याला शोधीत येत नाहीं, पण मनुष्यानें डोळ्यांत तेल घालून सुसंधीची वाट पहात बसलें पाहिजे. ज्या मनुष्यांत काम करण्याची शक्ति

आहे, व जो मनुष्यें आपलें काम करतांना संतोष दाखवितात, त्यांस अपजय येण्याची कधींच भीति नसते. वेळेच्या व मिळणाऱ्या पगाराच्या अनुरोधानें जो आपलें काम करितो, त्यानें आपल्या कामांत जय मिळण्याची आशा मुळींच बाळगूं नये. परंतु जो आपलें काम होईल तितकें चांगलें करून दाखविण्याचा प्रयत्न करितो त्यास माळ घालण्यास जयश्री नेहमीं तयार असते. "

यावरून जय मिळणें किंवा अपजय मिळणें हें पुष्कळ अंशीं आपल्या हातीं आहे असें दिसून येईल. चांगला हेतु धरून ईश्वर मला यश देईलच अशा दृढ भावनेनें जर चांगला उद्योग केला, तर यश मिळणारच यांत संशय नाहीं. आजपर्यंत या जगांत विद्या, शौर्य वगैरे चांगल्या गुणांनीं जे पुरुष उदयास आले, त्यांच्या प्रसिद्धीचें मुख्य कारण अव्याहत उद्योग हेंच होय. उद्योगाशिवाय दुसरीं कारणें असलीं तरी तीं गौणच होत.

आपल्या उद्योगाची दिशा नेहमीं व्यापक ठेविली पाहिजे; केवळ स्वहितापुरताच मनुष्याचा उद्योग असतां कामा नये. जो आपल्या पुरताच उद्योग करितो त्याच्या उद्योगापासून इतरांला प्रत्यक्ष फायदा होत नाहीं. त्याचा उद्योग मांजराच्या दुग्धप्राप्तीच्या उद्योगाप्रमाणेंच होय. प्रामाणिकपणानें आपला निर्वाह करून जो थोडा तरी परोपयोगी

उद्योग करितो तोच खरा उद्योगी होय. ज्या देशांत असे परोपकारासाठीं उद्योग करणारे महात्मे पुरुष पुष्कळ असतात, तोच देश ऊर्जितावस्थेला येतो; अशा देशाची कीर्ति चोहोंकडे पसरते; तो देश संपत्तीचें माहेरघर आणि विद्येचें विलासमंदीर बनतो त्या देशापुढें इतर सर्व देश मान वांकवितात. त्या देशांतील लोकांस कशाचीही ददात वाटत नाहीं.

आजकाल केवळ उद्योगानें पुढें आलेलीं जीं राष्ट्रें आहेत, त्यांत इंग्लंडची गणना प्रमुखत्वानें करण्यांत येते. इंग्लंडदेश आजकाल पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांत अत्यंत वैभवसंपन्न व बलाढ्य आहे. इंग्लिश लोक आज दिगंत पसरले आहेत. हिमाच्छादित उत्तर आणि दक्षिण ध्रुवावर पाहा, आफ्रिकेच्या मध्य भागच्या दाट अरण्यांत हिंस्र श्वापदांच्या वसतिस्थानांत पाहा, सहाराच्या किंवा मध्य एशिआच्या उन्हानें तप्त झालेल्या वालुकामय प्रदेशांत पाहा, आस्ट्रेलियाच्या हिरव्याचार सुपीक मैदानांत पाहा, इंग्रजांचा संचार नाहीं, आणि इंग्रजी कला धाडस व इंग्रजी कौशल्य यांची साक्ष पटत नाहीं असें एकही स्थळ, आज ज्ञात असलेल्या पृथ्वीच्या पाठीवर सांपडावयाचें नाहीं. अत्यंत खोल समुद्रापासून अतिउंच पर्वत शिखरापर्यंत त्यांचा प्रवेश नाहीं असें एकही स्थान नाहीं. अफाट समुद्रावर त्यांची जहाजें इतस्ततः

संचार करीत आहेत. पक्ष्यांनाही अगम्य अशा उंच वातावरणांत त्यांचीं विमानें अलीकडे फडकूं लागलीं आहेत. हा सर्व प्रभाव कशाचा ? तर सतत उद्योगाचा. इंग्रज लोकांच्या उद्योगामुळें इंग्लंडांतील सुखाचें पीक कधींही बुडत नाहीं. त्या देशांत अनीतीचीं अभ्रें कधींही येत नाहींत; यामुळें ब्रिटिश साम्राज्यावर सत्याचा सूर्य सदा प्रकश पाडीत असतो.

आमच्या सत्यप्रिय व उद्योगप्रिय सार्वभौम प्रभूंचे आम्हीं सर्व राजनिष्ठ हिंदी प्रजाजन इंग्लिश लोकांसारखेच उद्योगप्रिय होऊं या, म्हणजे आपणां सर्वांना स्वर्गीचें निरुपम सुख या लोकींच मिळेल.

चीन देशाचा एक बादशाहा असें म्हणत असे कीं, " राज्यामध्यें एक मनुष्य जर निरुद्योगी असला तर दाहा मनुष्यें क्षुधेनें किंवा थंडीनें पीडित असलीं पाहिजेत." खरें आहे, कारण जगांत जितकीं माणसें आहेत तितकीं जर सर्व उद्योग करतील, तर कोणत्याही माणसास अवश्य लागणाऱ्या वस्तूंची ददात पडणार नाहीं.

शेतकरी आणि त्याचे लेंक.

कोणी एक शेतकरी मरावयास टेंकला होता; त्याच्या

मनांत होतें कीं, आपण आजपर्यंत धंदा चालविला आहे, तसाच आपल्यामागें सदोदित आपल्या मुलांनीं चालवावा. तेव्हां त्यानें ही युक्ति केली. अवघ्या मुलांस खाटेजवळ बोलावून सांगितलें, मुलांनो, माझें सर्व द्रव्य ह्या शेतांमध्यें हातभर भुईखालीं पुरलेलें आहे; म्हणून हीं शेतें तुम्ही दुसऱ्या कोणाच्या हातीं लागूं देऊं नका. तें ऐकून पुत्रांनीं निश्चय केला कीं, म्हाताऱ्यानें ठेवलेलें द्रव्य शेतांतून उकरून काढावें. मग तो शेतकरी वारल्यानंतर त्यानीं शेतें खणून पाहिलीं त्यांत त्यांस ठेवा सांपडला नाहीं. परंतु शेतें खणून निघालीं यामुळें त्यांना दसपट पीक आलें, आणि बहुत द्रव्य मिळालें. त्या मुलांपैकीं एक शहाणा होता तो म्हणाला, " शेतांमध्यें द्रव्य आहे म्हणून जें बापानें सांगितलें होतें, तें हेंच द्रव्य.

तात्पर्य.

जेथें उद्योग तेथें द्रव्यलाभ हा आहेच. उद्योगांत शेतकीसारखा दुसरा उद्योग नाहीं. जे स्वतः शेतींत कष्ट करितात त्यांस द्रव्यलाभाबरोबर आरोग्याचाही लाभ आपोआप होतो. शेतांतील श्रम केव्हांही फुकट जात नाहींत. केव्हांना केव्हां तरी त्यांचा मोबदला सव्याज परत मिळतोच.

मुंगी आणि माशी.

एके दिवशीं मुंगी आणि माशी ह्यांचा आपआपल्यांत थोरपणाविषयीं मोठा वाद झाला. माशी मुंगीस म्हणाली, अगे, माझ्या थोरपणाबद्दल तर कोणास शंकाच नाहीं. कारण यज्ञयागादि कर्मांमध्यें जे जे पदार्थ असतात, ते सर्व मी अगोदर चाखितें, नंतर ते देवास प्राप्त होतात. देवळामध्यें उंच ठिकाण तें माझें. मी देवळांत असतें इतकें कोणी असत नाहीं. मला राजाच्या सभेंत जाण्यास अडथळा नाहीं. मी राजाच्या खांद्यावर बसतें, याप्रमाणें मला जें जं पाहिजे तें तें मी श्रम केल्यावांचून खातें, पितें, आणि भोगितें. अशी जी मी त्या मजशीं तूं क्षुद्र बरोबरी कशी बरें करशील ? मुंगीनें उत्तर केलें, अगे, ऐकतेस ? थोरामोठ्यांच्या घरीं जाऊन जेवणें यांत प्रतिष्ठा आहे खरी, पण बोलावणें असेल तर. तुला तर, लोक हांकीत असतात, तरी तूं निलाजरेपणीं पानावरून उठत नाहींस. तूं म्हणतेस कीं, मी देवळांत फार वेळ असते. पण तुला घर ना दार, ना कांहीं उद्योग म्हणून तुझा वेळ जात नाहीं, व त्यामुळें तूं देवळांत राहून आपला वेळ घालवितेस. तूं आम्हांसारखे श्रम करून दाण्याचा संग्रह करीत नाहींस, म्हणूनच तुला थंडीच्या दिवसांत उपाशीं मरावें लागतें; आणि आम्हीं उद्योग करितों म्हणून त्या दिवसांमध्यें खाऊन पिऊन उबाऱ्याच्या घरांत आम्हीं सुखी असतों.

तात्पर्य.

ज्यास आपल्या घरीं कोंड्याचीही भाकर मिळेना, त्यास थोरांच्या पंक्तीस मिष्टान्नें जेवावयास मिळालीं तरी त्यांत थोरपणा नाहीं. जो उद्योगी, जो आपण मिळविलेल्या संपत्तीचें सुख घेतो त्यासच थोर म्हणावा. असल्या पुरुषास थोर ही पदवी नसली तरी तो सर्वमान्य समजावा.

देव आणि गाडेकरी.

एक अडाणी गाडेकरी गाडा हांकून नेत होता. तो एके ठिकाणीं चिखलांत रुतून अडकला. तो बाहेर काढण्यास बैलांचा कांहींही उपाय चालेना. तेव्हां त्यानें देवाचा धांवा आरंभिला ! " हे देवा, मी दीन आहें, ह्यासाठीं तूं मला मदत कर." तें ऐकून देवानें वरून खालीं पाहिलें, तों गाडेकरी उगाच बसून करुणा भाकतो आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां देव त्यास म्हणतो " रे मूर्खा, तूं आळशासारखा स्वस्थ बसून राहूं नको; तं ऊठ आणि बैलास उत्तेजन देऊन चाकांस आपल्या खांद्याचा नेट दे, म्हणजे मी तुला सहाय्य होईन." गाडेकऱ्यानें तसें केलें. तेव्हां गाडा बाहेर निघाला.

तात्पर्य.

उद्योग करून जो देवाकडे साहाय्य मागतो, त्यास देव सहाय्य करतो. निरुद्योगास तें प्राप्त होत नाहीं.

धंदा ही एक दौलत आहे. उद्योगानें प्रतिष्ठा व पैसा दोन्ही मिळतात. उद्योगी नांगऱ्या निरुद्योगी सरदारापेक्षां श्रेष्ठ होय.

फ्रांक्लीन्.

पडलेलें लोखंड कीट खात असतें, आणि निरुद्योगी माणसाचें शरीर जीर्ण होत असतें.

घड्याळाकडे पाहूं नका, कामाकडे पाहा. नुसती तासाची जो भरती करील त्याचा खिसा भरणार नाहीं.

धैर्यानें केलेला प्रयत्न म्हणजे अर्धा विजयच होय.

---

९ मितव्यय.

न्यायें धन मिळवावें त्याचा न्यायेंचि खर्चहि करावा ॥
वित्ताचा लोभ मनीं अन्यायानें कदापि न धरावा ॥१॥

मनुष्याच्या शहाणपणाची पारख त्याच्या खर्चाच्या बातावेतावरून तेव्हांच करतां येते. योग्य मार्गानें पैसा मिळविणें व योग्य काटकसरीनें तो खर्च करणें ही एक अत्यंत

महत्त्वाची गोष्ट आहे. एका प्रसिद्ध आंग्ल ग्रंथकारानें म्हटलें आहे कीं:—" पैसा मिळविणें, राखून ठेवणें, खर्च करणें, दुसऱ्यास देणें, व दुसऱ्यापासून घेणें, उसनें आणणें व उसनें देणें यांत जो योग्य मार्गाचें अवलंबन करितो तो मनुष्य व्यवहारपटु व चतुर समजावा. अनीतीचें अवलंबन न करितां पैसा मिळविणें व तो सत्कृत्यांमध्यें खर्च करणें, हें खरें शहाणपण होय."

मनुष्यानें वाटेल तितका उद्योग करून हवेंतितकें धन संपादन केलें, परंतु खर्च कसा करावा हें जर त्यास कळलें नाहीं, तर उद्योगाचा फारसा उपयोग नाहीं. त्यांतूनही त्यानें आद्यापेक्षां खर्च जास्त ठेविल्यास त्याचा उद्योग निरर्थक समजावा. अशा अव्यवस्थेनें त्याच्या डोक्यावर कर्जाचा बोजा चढतो, आणि एकदां मनुष्याचें कर्ज वाढून तें त्याच्या आहाराबाहेर गेलें म्हणजे त्याचे हाल कुत्रासुद्धां खात नाहीं. याकरितां मनुष्यानें पहिल्यापासूनच आपला खर्च आपल्या प्राप्तीच्या आंत ठेवण्याची तजवीज करावी. प्रत्येकानें खर्च करतांना आपली प्राप्ति किती व आपण खर्च करितों किती याचा विचार करून आपलें खर्चाचें मान ठेवावें. लग्नें, मुंजी यांसारखीं कार्यें व आजारीपणा-सारख्या अपरिहार्य अडचणी यांस लागणाऱ्या जादा खर्चाची तरतूद अगोदरपासूनच दूरदर्शीपणानें थोडी

थोडी करीत असावी, म्हणजे ऐन प्रसंगीं दुसऱ्याच्या मदतीची गरज लागणार नाहीं.

ज्याला स्वतंत्र बाण्यानें वागावयाचें आहे, त्याला तर मितव्ययाकरितां फार झटलें पाहिजे. कारण दुसऱ्याच्या घरीं उसनवारीकरितां वारंवार जाणें म्हणजे एक प्रकारचा कमीपणाच आहे. दुसऱ्याकडून कोणतीही वस्तु उसनवार आणली म्हणजे आपण तेवढ्यापुरते त्याचे मिंधे बनतों. मिंध्या मनुष्याच्या अंगीं निस्पृहपणा मुळींच नसतो, असला तर त्यास कृतघ्न म्हणतात. काटकसर करण्यास मोठें उच्च प्रतीचें मनोधैर्य लागतें, अशांतला प्रकार नाहीं. अगदीं साधारण मनुष्यांस सुद्धां हा गुण थोड्याशा प्रयत्नानें अंगीं सहज आणतां येतो. व्यवस्थेनें खर्च करणें म्हणजेच आपल्या घरगुती कामाची सुव्यवस्था ठेवणें होय.

मितव्यय किंवा काटकसर हीं कृपणपणापासून अगदीं भिन्न आहेत. काटकसरीचा व कृपणपणाचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं. अयोग्य कामांत निरर्थक पैसा न उधळणें याचा अर्थ काटकसर, व योग्य कामांत योग्य वेळीं पैसा न खर्च करणें याचा अर्थ कृपणपणा असें ठोकळ मानानें मानण्यास कांहीं हरकत नाहीं. कृपण मनुष्य द्रव्य हें आपलें आदिदैवत समजतो, व मितव्ययी मनुष्य पैसा हा आपला हरकामी व उपयोगी अडत्या अगर मुनीम

आहे असें समजतो. मितव्यय ही दूरदर्शीपणाची मुलगी, नेमस्तपणाची बहीण व स्वतंत्र बाण्याची जननी आहे असें एका ग्रंथकारानें म्हटलें आहे. मितव्ययानें गृहसौख्यांत भर पडते, व समाजांत पत वाढते. मितव्यय हा एक सद्गुण आहे. तो प्रत्येकाच्या अंगीं असणें हें फार चांगलें.

प्रत्येकानें आदा पाहून खर्च करावा. आपल्या प्राप्तीच्या बाहेर एक पैही त्यानें खर्च करूं नये. कारण मितव्यय ही प्रामाणिकपणाची जननी आहे, व उधळेपणा हा अप्रामाणिकपणाचा पिता आहे. कारण जो मनुष्य आपल्या प्राप्तीच्या आंत आपला खर्च ठेवीत नाहीं, तो हटकून दुसऱ्या कोणाशीं तरी लबाडी करून आपला आयाबाहेर गेलेला खर्च चालवीत असतो, यांत शंका नाहीं. ज्यांना आयाबाहेर खर्च करून आपली चैन चालविण्याची संवय लागली ते दुसऱ्याला नेहमीं बुडवण्यास पाहणारच. असे उधळे मनुष्य अंतःकरणाचे जरा उदार असतात खरे, परंतु शेवटीं पैसा नसला म्हणजे ते वाटेल तें करण्यास तयार होतात. ते पैशाप्रमाणेंच आपल्या वेळेचाही दुरुपयोग करितात. ते आपणाला पुढें अमुक कामांत अमुक इतका नफा होईल, तेव्हां आतां या वेळीं अमुक इतका खर्च करण्यास कांहीं हरकत नाहीं, असें म्हणून पुढील पैसे हातीं येण्याच्या आंतच अवाचे सवा खर्च करितात, व

कर्जाचें लोढणें आपल्या गळ्यांत अडकवून घेतात. अशा प्रकारें खर्च करणारीं माणसें आपलीं आपणच शत्रु बनतात. जे स्वतःच स्वतःचे शत्रु बनतात, त्यांना दुसरे कोण मित्र मिळणार आहेत. बेताच्या प्राप्तीचीं, परंतु व्यवस्थेनें वागणारीं कांहीं माणसें, आपला खर्च टापटिपीनें करून दुसऱ्यास मदत करण्याच्या सद्‌बुद्धीनें कांहीं तरी मार्गे टाकितात; परंतु उधळे व अस्ताव्यस्त खर्च करणारे जे असतात, त्यांना दुसऱ्यांना अडीअडचणीच्या वेळीं सुद्धां मदत करण्यास सवड होत नाहीं.

" रिकामें पोतें केव्हांही उभें रहात नाहीं " अशी इंग्रजींत एक म्हण आहे. त्याचप्रमाणें कर्जांत बुडालेल्या माणसालाही ताठ उभें राहतां येत नाहीं. तो सदा चिंता व काळजी यांनीं विळ्यासारखा वांकलेला असतो. कर्जबाजारी मनुष्याला सत्यपणानें वागणें फार जड जातें. कारण त्याला, वेळोवेळीं सावकाराच्या तगाददाराला खोट्यानाट्या सबबी सांगून तूर्तातूर्त तरी तगादा उठवावा लागतो. यावरून " खोटें बोलणें कर्जावरील घोडेस्वार आहे " अशा अर्थाची इंग्रजींत एक म्हण पडली आहे. सावकाराच्या घराची कर्ज काढण्याकरितां पहिली पायरी चढणें म्हणजे भावी असत्यरूपी इमारतीच्या पायाचा पहिला दगड बसविण्यासारखेंच आहे. हेडन् नांवाचा एक प्रख्यात चित-

कार होऊन गेला; त्यानें असें लिहून ठेविलें आहे कीं, "ज्या दिवशीं मी प्रथमतः कर्ज काढलें, त्याच दिवशीं माझ्या ऱ्हासाला आरंभ झाला." त्यानें तरुण मनुष्यांस असा उपदेश केला आहे कीं "दुसऱ्याचें कर्ज न काढतां जर तुम्हांला एखादा चैनीचा पदार्थ विकत घेतां येत नसेल, तर तो तुम्ही घेऊं नका; कर्ज केव्हांही काढूं नका; कारण तें ऱ्हासाचा पाया आहे. तुम्हांला स्वतःला जर कर्ज असेल, तर तें फिटण्यापूर्वी तुम्ही दुसऱ्याला उसनवार रकमा देऊं नका; व अशा स्थितींत कर्ज तर बिलकूल काढूं नका." हा उपदेश प्रत्येकानें मनन करण्यासारखा आहे.

कोंवळ्या झाडाला कीड लागली म्हणजे तें जसें जोरानें फुटत नाहीं, त्याप्रमाणें पूर्ववयांत कर्ज झालेला मनुष्य केव्हांही ऊर्जितावस्थेला येत नाहीं. म्हणून मनुष्यानें पहिल्यापासूनच काटकसरीनें राहण्यास शिकलें पाहिजे. एक पैसाही व्यर्थ जाऊं देतां कामा नये. कारण ज्याप्रमाणें सेकंदें व मिनिटें यांचेच तास होतात, त्याप्रमाणेंच पै व पैसा यांचेच रुपये व मोहरा होतात. कित्येकांना एक पैसा म्हणजे कांहींच वाटत नाहीं. परंतु एक पैसा म्हणजे देखील क्षुल्लक नव्हे. ज्यांच्या हातांत रुपये आणि गिनी खेळतात, त्यांना एक पैशाचें कांहींच मोल वाटत नसेल, पण एखाद्या उपाशीं मरणाऱ्या गरिबाला तो एक पैसा दहा गिनीं-

सारखा आहे. एखाद्या श्रीमंताला दहा मोहरा मिळाल्या तरी आनंद वाटणार नाहीं. पण एखाद्या अत्यंत गरिबाला एक पैसा मिळाला तर केवढें तरी समाधान वाटतें आणि तो देवाचे किती तरी आभार मानतो. एक पैसा झाला तरी तो मिळविण्यासाठीं कांहींना कांहींतरी रक्त आटवावें लागतेंच. एक पैशाविषयींच नव्हे तर एक पैविषयीं सुद्धां आपण जपूं तितकें थोडेंच आहे. मराठींत एक म्हण आहे कीं, " पैपासून जोडावें आणि लाखापासून मोडावें." खरें आहे. जो पैला जतन करील तोच लक्षाधीश होईल, व लक्षाधीश आहे तोच वेळप्रसंगीं लाखों रुपये खर्च करील. जो धान्याच्या एका कणाला जपतो त्याच्याच घरीं धान्यांचीं मोठमोठालीं कोठारें जमतात. अनेक कण एकत्र झाले म्हणजेच एक कोठार होतें. पण कणास क्षुल्लक मानून जो त्याकडे दुर्लक्ष करील त्याजपाशीं संपत्तीचा सांठा केव्हांही होणार नाहीं.

उद्योगानें संपत्ति मिळवितां येते, पण ती राखण्यास मितव्यय हा अवश्य पाहिजे. जें कांहीं आपणास थोडें-बहुत मिळेल त्यांतून थोडीतरी शिल्लक मागें टाकावी. कारण मनुष्याच्या हातून सारा जन्म एकसारखा उद्योग होणें शक्य नाहीं. तेव्हां अडचणीच्या प्रसंगाकरितां दूर-दर्शीपणानें कांहीं तरी तजवीज करून ठेवणें हा मोठा

शहाणपणा होय. मुंग्यांसारखे अज्ञप्राणी सुद्धां जर पावसाळ्याकरितां, आठ महिने सारखें खपून, धान्याचा संग्रह करून ठेवितात, तर मनुष्यासारख्या ज्ञानाची व बुद्धीची घमेंड मारणाऱ्या प्राण्यानें पुढें येणाऱ्या अडचणींची तरतूद अगोदर न करणें म्हणजे माशांसारख्या क्षुद्र जंतूंच्या पंक्तींत आपणांस बसवून घेण्यासारखें आहे.

ड्यूक ऑफ वेलिंगटन् हा लोकांचें देणें आपणाकडे न ठेवण्याविषयीं फार जपत असे. तो एकदां एका स्नेह्याजवळ म्हणाला कीं, " लोकांचें देणें आहे, तें मी स्वतः देतों. दुसऱ्यावर सोंपवीत नाहीं. आणि प्रत्येक माणसानें असें करावें असें माझें सांगणें आहे. कर्ज हें मनुष्यास गुलाम करितें. मला पैशाच्या अडचणी कित्येक प्रसंगीं आल्या होत्या, पण मीं कधीं आहाराबाहेर कर्ज काढिलें नाहीं. "

प्रत्येक मनुष्यानें हें उदाहरण पुढें ठेवून त्याप्रमाणें वागावें.

महाराणी व्हिक्टोरिया.

आपले परमपूज्य बादशहा जॉर्ज महाराज, यांच्या आजी भाग्यशाली महाराणी व्हिक्टोरिया या लहान असतां एकदां एका जत्रेस गेल्या होत्या. तेथें त्यांनीं बरेच जिन्नस

खरेदी केले. नंतर एक वाजविण्याची पेटी विकत घ्यावी असें त्यांना वाटलें. आपल्या मनाप्रमाणें त्यांनीं एक पेटी पसंत केली, व ती उचलली. इतक्यांत बरोबरच्या दाईनें त्यांना म्हटलें, "बरोबर आणलेले सर्व पैसे संपले आहेत." हें ऐकून दुकानदार म्हणाला, " कांहीं हरकत नाहीं. पेटी आपण घेऊन जा. पैसे मागाहून पाठविले तरी चालतील. " महाराणीसाहेबांना हें बोलणें आवडलें नाहीं. कारण जिन्नस उधार घेणें ही गोष्ट त्यांना बिलकुल पसंत वाटत नव्हती. त्यांनीं ती पेटी घेतली नाहीं. पेटीचा मोह तोडून त्या तशाच घरीं परत गेल्या.

मुलांनो, महाराणीसाहेबांचा हा कित्ता समोर ठेवा, व उधार जिन्नस घेण्याच्या मोहाला बळी पडूं नका.

अडक्यास हत्ती.

एका श्रीमंत गृहस्थाकडे एक हत्ती विकावयास आला व हत्तीवाला त्यास म्हणाला " मी एका अडक्यास हा हत्ती देतों " हें ऐकून त्या गृहस्थाच्या मुलानें आग्रह केला कीं, " बाबा हा हत्ती घ्याच. " तेव्हां तो गृहस्थ म्हणाला, " मुला, हा आपणांस हत्ती नको. कारण तूर्त आपणांस त्याची गरज नाहीं.गरज लागल्यावर घेतां येईल."

पुढें कांहीं काळानें त्या गृहस्थास हत्ती ठेवण्याची आवश्यकता वाटली, तेव्हां त्यानें एका हत्तीवाल्यास एक हत्ती आणण्यास सांगितला. या हत्तीवाल्यानें त्याची किंमत सातहजार रुपये सांगितली. तेव्हां तो गृहस्थ आपल्या मुलास म्हणाला " मुला, आतां हा हत्ती घे. " तेव्हां मुलगा म्हणाला " बाबा, अडक्यास हत्ती मिळत होता त्या वेळेस तो तुम्हीं घेतला नाहीं, व आतां हा इतक्या महागाईचा हत्ती कशास घेतां ? " तेव्हां बाप म्हणाला " मुला त्या वेळीं आपल्यास हत्तीची गरज नव्हती, सबब घेतला नाहीं. आज गरज लागली सबब तो मी घेतों. "

आणखी तो म्हणाला " मुला मी तुला सांगतों कीं, ज्या वस्तूची तुला आज गरज नाहीं, ती वस्तु कितीही स्वस्त मिळाली, तरी तूं घेऊं नको. "

मुंग्या आणि टोळ.

उन्हाळ्यामध्यें कोणे एके समयीं कांहीं मुंग्या आपल्या बिळाजवळ दाण्याच्या राशि घालून उन्हांत सुकवावयाच्या उद्योगांत होत्या. इतक्यांत भुकेनें व्याकुळ झालेला असा एक टोळ तेथें आला. तो दीनवाणें तोंड करून याचना करूं लागला कीं, बायांनो एक तरी तांदुळाचा दाणा देऊन

माझा प्राण वांचवा, तुम्हांस फार पुण्य लागेल. त्यासमयीं त्यांतील एक मुंगी त्यास विचारते " अरे, सुगींमध्यें आम्हीं दाण्याचा संग्रह केला, तसा त्वां कां केला नाहीं ? " तो बोलला, सुगींमध्यें माझा काळ खातां, पितां, नाचतां, आणि आनंद करितां गेला; त्या वेळीं पुढची काळजी एक वेळही माझ्या मनांत आली नाहीं; तें ऐकून ती म्हणाली, बाबा असें आहे कीं, जे पुढची सोय न पाहतां खातात, पितात आणि मौजा मारितात, ते शेवटीं उपाशीं मरतात, यास कोणीं काय करावें ? "

तात्पर्य.

तरुणपणीं जो सावध होऊन द्रव्य जोडून ठेवितो, तो पुढें म्हातारपणीं दुःख पावत नाहीं. कित्येक असे असतात कीं, तरुणपणीं जेवढें मिळवितात, तेवढें तेव्हांच उधळून टाकतात, ते म्हातारपणीं दुःख पावतात. जरी लेंक, भाऊ किंवा दुसरे सोयरे यांनीं आपणांस म्हातारपणीं पोशिलें तरी तें धर्माचेंच. व ते खात्रीनें पोसतील असें नाहीं. म्हणून तरुणपणींच द्रव्य जोडून ठेविलें पाहिजे.

गाढव आणि त्याचा धनी.

कोणा एका कुंभाराचा एक गाढव होता. त्याचा धनी त्याजवर त्याच्या जिवापलीकडे ओझें नित्य लादीत असे.

आणि त्यास खावयास तर अगदीं थोडें देत असे. म्हणून त्या गाढवाची शक्ति अगदीं क्षीण झाली. तो गाढव म्हातारा झाल्यावर एके दिवशीं असें झालें कीं, नित्यापेक्षां त्याच्या धन्यानें मडक्यांचें ओझें फारच जड घातलें. त्या गाढवाची शक्ति अगोदरच क्षीण झाली होती. त्यांत रस्ता उंच सखल व खडबडीत होता यामुळें त्यास ठोकर लागून त्याचा झोंक गेला. तो त्यास सांवरतां न आल्यामुळें, तो खालीं पडला. तेणें करून पाठीवरचीं सर्व मडकीं फुटून गेलीं. त्यासमयीं त्याच्या धन्यास मोठा राग येऊन तो त्यास सोडग्यानें निर्दयपणें बडवूं लागला. तेव्हां, बिचारा गाढव, वर मान उचलून, त्यास म्हणतो, रे निर्दया, जें नुकसान झालें त्याचा दोष तूं मजवर नाहक ठेवितोस, ह्याचा दोष म्हटला तर तुजवरच आहे. कारण कीं, कृपण-पणानें माझें खाणें त्वां तोडिलें आणि मजवर शक्तीपेक्षां अधिक ओझें लादलें, म्हणूनच मी पडलों.

तात्पर्य.

जे कृपण आहेत ते आपलें धन वांचविण्याकरितां जे उपाय योजितात, त्याच उपायांनीं बहुतकरून त्यांच्या धनाचा नाश होतो.

१० सत्संगति.

सुसंगति सदा घडो सुजनवाक्य कानीं पडो ॥

मोरोपंत.

इंग्रजी भाषेंत अशी एक म्हण आहे कीं, " मनुष्याची पारख त्याच्या मित्रांवरून होते. " खरें आहे, कारण ज्याचा जसा स्वभाव असेल तो त्याप्रमाणें आपले मित्र शोधून काढतो. विरुद्ध स्वभावांच्या माणसांची मैत्री कधींही जमावयाची नाहीं. ज्याला दारू पिण्याचा तिट्कारा असेल, तो दारूबाज मनुष्याच्या वाऱ्यासही उभा रहात नाहीं, मग त्यांची आपसांत मैत्री जमण्याचें नांव कशास पाहिजे; जो विद्याव्यासंगी आहे, तो विद्याव्यासंगी मनुष्याची मैत्री करील. ज्याला तालमीचा नाद आहे तो तालमीचेच आखाडे शोधून काढून त्यांतील लोकांची मैत्री जोडील. यावरून डॅनिश भाषेंत पुढील अर्थाची म्हण पडली आहे. ती ही " तुमचे स्नेहीसोबती कोण आहेत तें मला सांगा, म्हणजे तुम्ही कोण व कसे आहां तें मी सांगतों. " पण ही प्रौढ बुद्धीच्या माणसांची गोष्ट झाली. परंतु लहान मुलें व अपरिपक्व बुद्धीचे तरुण यांची गोष्ट याहून फार निराळी आहे. कारण त्यांना बरें, वाईट फार थोडें कळतें.

कोणाची मैत्री जोडली म्हणजे आपलें कल्याण होईल हें ठरविण्याची त्यांच्या अंगीं पात्रता नसते. मनुष्याचा पंधरा ते पंचवीस वर्षांचा काळ म्हणजे ऐन तारुण्याचा काळ. हा फार महत्त्वाचा आहे. या वयाच्या मनुष्यास जशी संगति मिळेल तसा त्याचा स्वभाव बनतो. संगति व शिक्षण हीं जशीं चांगलीं किंवा वाईट असतील त्याप्रमाणें त्याच्या अंगच्या सद्गुणांचा किंवा दुर्गुणांचा विकास होतो. अपरिपक्व बुद्धीचीं माणसें वाईट पुस्तकें वाचण्यानें जशीं बिघडतात तशींच किंवा त्याहून जास्त तीं वाईट संगतीनें बिघडतात. वास्तविक मनुष्य जन्मतः चांगला किंवा वाईट असूं शकत नाहीं. जन्मास येण्यापूर्वीं कोणीही द्वाड नसतो. मनुष्य जन्मतो तेव्हां तो ऊन केलेल्या लाखेप्रमाणें अगदीं मऊ असतो. मऊ लाख ज्या सांचांत ओतावी त्याप्रमाणें तिची आकृति बनते. तसेंच मनुष्याला जशी संगति मिळेल तसा तो बनतो. ह्यासाठीं मुलांस शिक्षकांनीं व पालकांनीं चांगल्याची मैत्री जोडून दिली पाहिजे. मुलांचा स्वभाव निर्मळ पाण्यासारखा असतो. स्वच्छ पाण्यांत जसा रंग मिसळावा तसा त्या पाण्याचा रंग बनतो. स्वच्छ पाण्याचा प्रवाह ज्या ज्या प्रांतांतून वाहात येतो त्या त्या प्रांतांतील खनिज द्रव्यें त्यांत मिसळतात. व जशीं चांगलीं किंवा वाईट द्रव्यें त्यांत मिसळलीं असतील त्याप्रमाणें तें पाणी चांगलें किंवा वाईट

पथ्यकर किंवा कुपथ्यकर असें बनतें. जें पाणी विषारी झाडींतून वाहात आलें असेल, तें पाणी विषारीच बनतें व तें प्राणिमात्राला अगदीं निरुपयोगी ठरतें; तसें अपरिपक्व बुद्धीच्या माणसाला व लहान मुलांना जर वाईट संगति लागली तर तीं बिघडतात, व कुचकामाचीं ठरतात. वाइटाच्या संगतीनें मनुष्याची नुसती वागणूकच बदलून रहात नाहीं, तर त्याच्या सद्गुणालाही धक्का बसतो, इतकेंच नव्हे तर प्रसंगविशेषीं त्याचें जीवित्वसुद्धां धोक्यांत येतें. या गोष्टीची प्रचीति दंगेधोपे, कट व मारामाऱ्या यांत हमेष येते. दंग्याधोप्याचे वेळीं एखाद्याचें त्यांत बिलकूल अंग किंवा संमति नसतां, इतकेंच नव्हे तर तो त्या विरुद्ध असतांना सुद्धां, केवळ तो दंगेखोर मंडळींतला आहे, दंगेखोर मंडळीशीं त्याची मैत्री आहे, येवढें जरी आढळून आलें, तरी त्याला शिक्षा होते. खरें आहे. " वाळलेल्याबरोबर ओलें जळतें, " असें म्हणतात. त्याप्रमाणें वाईट व चांगला हे एका कचाटांत सांपडले म्हणजे अपराधी कोण व निरपराधी कोण हें न कळून दोघांसही सारखा दंड होतो. कलालाच्या दुकानांत बसून एखादा मनुष्य गाईचें उत्तम दूध जरी प्याला तरी लोक त्याला दारूच प्याला म्हणणार. कांटेरी झाडांच्या रानांतून जर तुम्ही फिरलां, तर तुम्हांला कांटे हे बोचणारच, मग तुम्ही कांटे

न बोचण्याविषयीं कितीही काळजी घ्या कांटेरी रान आपला गुण करणारच. तसें वाईट माणसाच्या संगतीपासून दुर्गुण न लागण्याबद्दल तुम्हीं कितीही खबरदारी घेतली तरी दु:संगति ही आपला दुर्गुण तुम्हांला दाखवीलच दाखवील. येवढ्याकरितां जे व्यसनी व दुर्गुणी असतील त्यांची संगत बिलकूल धरूं नये. जीं मुलें उनाड असतील त्यांच्या थाऱ्यासही उभें राहूं नये. सदा उद्योगी व अभ्यासी मुलांची संगत धरावी.

भतृहरीनें नीति शतकांत असें म्हटलें आहे कीं "सत्सं-गति हीं मनुष्यास काय बरें देणार नाहीं." सर्व कांही देईल हेंच त्याचें उत्तर आहे. चांगल्यांच्या संगतीनें तुम्हीं सदुद्योगी, ईश्वर भक्त व राजनिष्ठ असेच व्हाल. अज्ञानानें बुद्धीला आलेलें मांद्य चांगल्याच्या सहवासानें जातें. मनु-ष्यास नेहमीं मोह पडून, खोटें बोलावें, दुसऱ्याच्या द्रव्याचा अपहार करावा, वगैरे नाना तऱ्हेचीं वाईट कर्में करण्याची बुद्धि होते. परंतु नित्य सज्जनांचा सहवास असेल तर मनुष्य अशा मोहाला सहसा बळी पडत नाहीं. तो वाईट गोष्टींपासून तेव्हांच पराङ्मुख होतो, खोट्यांचा तिरस्कार करूं लागतो व पापमार्गाचें अवलंबन तो केव्हांही करीत नाहीं. सुसंगतीपासून मनुष्याचें अंत:करण नेहमीं शुद्ध व प्रसन्न रहातें. सुगंधि पुष्पांच्या बागेंतून व नयनमनोहर

पथ्यकर किंवा कुपथ्यकर असें बनतें. जें पाणी विषारी झाडींतून वाहात आलें असेल, तें पाणी विषारीच बनतें व तें प्राणिमात्राला अगदीं निरुपयोगी ठरतें; तसें अपरिपक्क बुद्धीच्या माणसाला व लहान मुलांना जर वाईट संगति लागली तर तीं बिघडतात, व कुचकामाचीं ठरतात. वाइ-टाच्या संगतीनें मनुष्याची नुसती वागणूकच बदलून रहात नाहीं, तर त्याच्या सद्गुणालाही धक्का बसतो, इतकेंच नव्हे तर प्रसंगविशेषीं त्याचें जीवित्वसुद्धां धोक्यांत येतें. या गोष्टीची प्रचीति दंगेधोपे, कट व मारामाऱ्या यांत हमेष येते. दंग्याधोप्याचे वेळीं एखाद्याचें त्यांत बिलकूल अंग किंवा संमति नसतां, इतकेंच नव्हे तर तो त्या विरुद्ध असतांना सुद्धां, केवळ तो दंगेखोर मंडळींतला आहे, दंगे-खोर मंडळींशीं त्याची मैत्री आहे, येवढें जरी आढळून आलें, तरी त्याला शिक्षा होते. खरें आहे. " वाळलेल्या-बरोबर ओलें जळतें, " असें म्हणतात. त्याप्रमाणें वाईट व चांगला हे एका कचाटांत सांपडले म्हणज अपराधी कोण व निरपराधी कोण हें न कळून दोघांसही सारखा दंड होतो. कलालाच्या दुकानांत बसून एखादा मनुष्य गाईचें उत्तम दूध जरी प्याला तरी लोक त्याला दारूच प्याला म्हणणार. कांटेरी झाडांच्या रानांतून जर तुम्ही फिरलां, तर तुम्हांला कांटे हे बोचणारच, मग तुम्ही कांटे

न बोचण्याविषयीं कितीही काळजी घ्या कांटेरी रान आपला गुण करणारच. तसें वाईट माणसाच्या संगतीपासून दुर्गुण न लागण्याबद्दल तुम्हीं कितीही खबरदारी घेतली तरी दुःसंगति ही आपला दुर्गुण तुम्हांला दाखवीलच दाखवील. येवढ्याकरितां जे व्यसनी व दुर्गुणी असतील त्यांची संगत बिलकूल धरूं नये. जीं मुलें उनाड असतील त्यांच्या थाऱ्यासही उभें राहूं नये. सदा उद्योगी व अभ्यासी मुलांची संगत धरावी.

भर्तृहरीनें नीति शतकांत असें म्हटलें आहे कीं "सत्संगति हीं मनुष्यास काय बरें देणार नाहीं." सर्व कांही देईल हेंच त्याचें उत्तर आहे. चांगल्यांच्या संगतीनें तुम्हीं सदुद्योगी, ईश्वर भक्त व राजनिष्ठ असेच व्हाल. अज्ञानानें बुद्धीला आलेलें मांद्य चांगल्याच्या सहवासानें जातें. मनुष्यास नेहमीं मोह पडून, खोटें बोलावें, दुसऱ्याच्या द्रव्याचा अपहार करावा, वगैरे नाना तऱ्हेचीं वाईट कर्मे करण्याची बुद्धि होते. परंतु नित्य सज्जनांचा सहवास असेल तर मनुष्य अशा मोहाला सहसा बळी पडत नाहीं. तो वाईट गोष्टींपासून तेव्हांच पराङ्मुख होतो, खोटयांचा तिरस्कार करूं लागतो व पापमार्गाचें अवलंबन तो केव्हांही करीत नाहीं. सुसंगतीपासून मनुष्याचें अंतःकरण नेहमीं शुद्ध व प्रसन्न रहातें. सुगंधि पुष्पांच्या बागेंतून व नयनमनोहर

वृक्षांच्या गार छायेंतून जर आपण सहल करून आलों तर आपणास किती समाधान वाटतें बरें, आपलें अंतःकरण किती सुप्रसन्न होतें बरें ! याचा अनुभव प्रत्येकास थोडा-बहुत असतोच. त्याप्रमाणें तुम्हांस नेहमीं आनंद, व मनास शांति पाहिजे असेल तर तुम्ही सत्संगति धरा.

एका विद्वानानें म्हटलें आहे कीं, "वाईट संगति असण्यापेक्षां कोणाचीच संगति नसावी हें बरें. कारण दुसऱ्याच्या अंगच्या सद्गुणांपेक्षां दुर्गुण लवकर लागतात. स्पर्शानें रोग जडतात. आरोग्य प्राप्त होत नाहीं." खरें आहे. कारण माणसांचा स्वभाव सद्गुणापेक्षां दुर्गुणाकडे लवकर वळतो.

विद्यार्थ्यांनीं तर सदैव उत्तम आचरणाच्या मनुष्यांचाच सहवास करावा, व आपलें वर्तन नेहमीं शुद्ध व पवित्र ठेवावें; त्याचप्रमाणें नीतिपर पुस्तकें, सज्जन पुरुषांच्या तसबिरी व उमद्या प्राण्यांचीं चित्रें हीं नेहमीं त्यांनीं आपल्या अभ्यासाच्या खोलींत, सहज दृष्टीस पडतील अशीं ठेवावींत म्हणजे सत्संगतीप्रमाणेंच त्या पवित्र वस्तूंचा त्यांच्या मनावर चांगला परिणाम होईल.

सारांश सत्संगतीचा फायदा फार मोठा आहे. सत्संगतीचें वर्णन अनादिकालापासून कथापुराणांत व्यास, वाल्मीकी इत्यादि मोठमोठ्या महात्म्यांनीं पुष्कळच केलें

आहे. त्यांनीं सगळ्या लाभांत सत्समागम हा फार श्रेष्ठ ठरविला आहे. कारण सत्समागमामुळें इतर सर्व लाभ आपोआप घरीं चालत येतात. महान् साधु तुकाराम महाराज सत्संगतीविषयीं काय म्हणतात पाहाः—

दुष्टाचीये संगें दुष्टची जाहला ॥
विसरूनी गेला आपणासी ॥ १ ॥
ढेंकुणाचें संगें हिरा जो भंगला ॥
कुसंगें नाडला साधु तैसा ॥ २ ॥
वोढाळाचे संगें सात्विक नाडलें ॥
क्षणांत नासलें समागमें ॥ ३ ॥
तुका म्हणे धरा सत्संग हा बरा ॥
चुकेल तो फेरा चौऱ्यांशीचा ॥ ४ ॥

सत्संगतीचा एवढा मोठा लाभ आहे म्हणून ते देवापाशीं काय मागतात ? तरः—

नलगे धन मुक्ति संपदा ॥
संत संग देई सदा ॥

हें मागतात. मुलांनो परमेश्वरापाशीं तुम्ही हेंच नेहमीं मागत जा.

" दुष्टांनीं केलेल्या मसलतींत आपण पडूं नये; व ती मसलत गुप्त राखूं नये. तुमच्यावर माझा विश्वास आहे असेंही त्यांना सांगू नये. वाईट मसलत चालली असेल तर कांहीं तरी काम काढून तेथून निसटून जावें. "

विदुरनीति.

दुर्बलांनीं बलिष्ठांशीं संग करूं नये; जलप्रवाहांतील मातीचें भांडें व धातूचें भांडें यांच्या संगतीचा परिणाम दोघांपैकीं कोणावर घडेल ?

असमान मैत्रीपासून तिरस्कार उत्पन्न होतो.

इंग्लिश म्हणी.

वाईट संगतीचा परिणाम.

वाई क्षेत्रांत कोणी एक नीतिमान् गृहस्थ रहात असे. तो आपल्या मुलांस, तीं मोठीं झालीं असतांही वाईट चालीच्या माणसांच्या वाऱ्यास देखील उभें राहूं देत नसे. एके दिवशीं त्याची एक मुलगी, आपल्या भावाबरोबर एका गैर चालीच्या मुलीच्या घरीं जाण्याविषयीं त्याची परवानगी मागूं लागली. ती त्यानें दिली नाहीं. तेव्हां ती मुलगी बापास म्हणते " बाबा, मी आतां कांहीं लहान नाहीं.

तेऱ्हां कोणाच्याही येथें मी गेलें असतां त्याच्या संगतीनें आतां मी बिघडेन असें मला वाटत नाहीं.

बापानें यावर कांहीं एक उत्तर दिलें नाहीं. परंतु तो चट्‌कन आपल्या जाग्यावरून उठला व स्वयंपाक घरांत जाऊन एक कोळसा आणिला, व तो मुलीच्या हातांत देऊन म्हटलें " मुली, हा आपल्या मुठींत ठेव, यानें तुझा हात भाजणार नाहीं." तिनें तो थंड कोळसा हातांत घेतला, तेव्हां अर्थातच तिचा हात काळा झाला. मग बाप तीस म्हणतो, " मुली, पहा आतां, कोळशानें तुझा हात भाजला नाहीं, परंतु काळा झाला. तर अशीच गोष्ट कुसंगतीची आहे. तिजपासून प्रत्यक्ष हानि झाली नाहीं, तथापि काळिमा हा लागतोच. म्हणून वाईट माणसाच्या वाऱ्याला सुद्धां उभें राहूं नये हें फार चांगलें."

ही गोष्ट त्या मुलीस पटली, व गैरचालीच्या मुलीच्या घरीं जाण्याचा तिनें आपला बेत रहीत केला.

कोळसेविक्या आणि परीट.

एक कोळसेविक्या एका नगरांत धंद्याकरितां गेला होता, तेथें त्याच्या गांवच्या एका परटाची व त्याची गांठ पडली. त्यांनीं एकमेकांचें क्षेमकुशल पुसून बिऱ्हाडें विचारिलीं,

तेव्हां कोळसेविक्या परटास म्हणाला, तुझें बिऱ्हाड सोईचें नाहीं, तूं माझ्या बिऱ्हाडीं येऊन रहा. यावर परीट म्हणाला मित्रा, तें कसें होईल ? तुझ्या संगतीं राहिलों असतां, मी जें वस्त्र प्रातःकाळीं धुऊन आणीन त्यास तुझ्या कोळशांची धूळ संध्याकाळ झाला नाहीं तों काळें करील.

तात्पर्य.

या जगांत कोणाशीं समागम करावयाचा तो मोठा विचार पाहून केला पाहिजे. आपण मोठे गुणी आहों परंतु निरंतर दुर्गुणी माणसाची संगत आहे, तर तो आपणास आपल्यासारखेंच करील. यास्तव वाईट मनुष्याच्या संगतीपासून नेहमीं दूर असावें. त्याच्या संगतीपासून फार तोटा आहे. त्याचा समागम करून आपण निर्लेप राहिलों, तरी लोकांस तसें दिसणार नाहीं. प्रतिष्ठा स्वच्छ झऱ्याच्या पाण्यासारखी आहे. तें जसें गांव ओहोळास मिळून वाहूं लागलें असतां गढूळ होतें, तशीच दुष्टाच्या संगतीनें अब्रू मळीण होते.

हंस व कावळा.

उज्जनीनामक नगरीच्या वाटेवर एक मोठा वृक्ष होता. उन्हाळ्यांत कोणे एके वेळीं एक वाटसरू थकल्यामुळें

हातांतील तिरकमठा जवळ ठेऊन त्या वृक्षाखालीं निजला. कांहीं वेळानें त्याच्या तोंडावरची सावली गेली व ऊन आलें. हें पाहून झाडावरच्या हंसानें पंख पसरून पुन्हा त्याच्या तोंडावर सावली केली. तेव्हां गाढ झोंप लागून स्वस्थ झाल्यामुळें वाटसरानें झोंपेंत आ पसरला. त्या हंसाशेजारींच एक कावळा बसला होता. तो स्वभावानें दुष्ट असल्यामुळें त्याला हें सुख सहन न होऊन तो वाटसराच्या तोंडांत शिटून पळून गेला. वाटसरू जागा होऊन पहातो तों हंस त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां हाच आपल्या तोंडांत शिटला असें त्यास वाटून त्यानें जवळ असलेला तिरकमठा घेऊन हंसास ठार केलें.

दुर्जनाजवळ कधींही बसूं नये, व त्याबरोबर चार पावलें सुद्धां जाऊं नये, हें फार चांगलें.

शेतकरी आणि शहामृग.

एका शेतकऱ्यानें शेत पेरिलें होतें, त्यास बगळे व कावळे ह्यांचा उपद्रव फार झाला. तेव्हां त्यानें शेतांत जाळें मांडून, पुष्कळ बगळे व कावळे धरिले. त्यांबरोबर एक शहामृग आला होता. तोही सांपडला; तेव्हां तो शहामृग शेतकऱ्याची प्रार्थना करून म्हणतो, दादारे, मला मारूं

नको. मी बगळाही नव्हे व कावळाही नव्हे. मी दीन शहामृग आहें. आम्ही स्वधर्मानें वागत असतों. आईबापांस म्हातारपणीं आपल्या पाठीवर वाहून पोशितों. यावर त्यास शेतकरी म्हणतो, रे, तें सर्व खरें असेल, परंतु ह्या वेळेस तूं मला वाइटांच्या संगतींत आढळा आहेस, म्हणून तुलाही त्यांच्याबरोबर पारिपत्य केलें पाहिजे.

तात्पर्य.

दुर्जनांच्या संगतीनें सज्जन अप्रतिष्ठा पावतो, आणि ज्या संकटांत ते पडतात त्यांत तोही पडतो.

---

११ वाचन.

शास्त्रग्रंथ विलोकन मनुजा चातुर्य येतसे फार. ॥

ज्ञान संपादन करण्याचीं जीं कांहीं साधनें आहेत, त्यांत वाचन हें मुख्य साधन आहे. वाचनानें ज्ञान संपादन होतें व त्यापासून मनास फार आनंद वाटतो. याचा अनुभव जे नेहमीं चांगलीं पुस्तकें मन लावून वाचतात, त्यांसच येतो. इतरांस या आनंदाचा गंधही नसतो. खरें आहे. बहिऱ्यास मंजुळ व कोमळ गायनापासून काय आनंद होणार आहे. मनुष्य जेव्हां आपलीं नित्याचीं कामेंकाजें

आटपून थकून जातो, तेव्हां त्याला एकांतामध्यें सुखानें कालक्रमणा करण्यास वाचनासारखें दुसरें सुलभ व उपयुक्त साधन नाहीं. ज्याप्रमाणें सुसंगतीपासून मनुष्याचें कल्याण होऊन त्याचें ज्ञान वाढतें, त्याप्रमाणें चांगल्या पुस्तकांच्या वाचनापासून मनुष्याचें हित होतें, व त्याच्या ज्ञानांत भर पडते. मनुष्याच्या मित्रावरून जशी त्याची पारख करितात, तशी मनुष्य जीं पुस्तकें वाचतो, त्यांवरून त्याची पारख करण्यास हरकत नाहीं. कारण वाईट मनुष्य नेहमीं वाईटच पुस्तकें वाचणार ! त्याला चांगलीं पुस्तकें वाचण्याची बुद्धि होणें फार कठिण. चांगलीं पुस्तकें हीं उत्तम मित्राहूनही फार श्रेष्ठ आहेत. कारण मित्रांच्या स्वभावांत फरक पडण्याचा संभव असतो. परंतु चांगल्या पुस्तकांच्या अंतरंगात केव्हांही बदल होत नाहीं. तीं नेहमीं चांगलींच असतात. उत्तम पुस्तक हें नेहमींच आनंद देणारा मित्र आहे. कित्येक मित्र संकटाच्या वेळीं मनुष्याला सोडून जातात. परंतु चांगल्या पुस्तकांची गोष्ट तशी नाहीं. तीं मनुष्यास त्याच्या वैभवाच्या वेळीं जें सुख देतात, तसेंच किंवा त्याहून जास्त सुख त्याच्या विपत्तींत तीं त्यास देतात. चांगलीं पुस्तकें आपल्या तारुण्यांत आपणांस नीति-मार्गदर्शक होतात, व वृद्धापकाळीं तींच पुस्तकें पुढील पिढीस मार्ग दाखवितांना उपयोगीं पडतात. चांगल्या

पुस्तकांच्या वाचनानें सुस्वभावी मनुष्याशीं मैत्री जडते. कारण जे सुशील आहेत, ते उत्तमच ग्रंथ वाचणार, व असे ग्रंथ वाचणारे हे सम व्यसनी झाले, व ज्यांचें व्यसन एक आहे त्यांची मैत्री जमणें हें स्वाभाविक आहे.

सतत वाचनानें कोणतीही गोष्ट मनामध्यें चांगली बिंबते. निरनिराळ्या विषयांवरील उपयुक्त पुस्तकें नेहमीं मन लावून वाचल्यानें मनुष्य बहुश्रुत व विद्वान् होतो. खरी विद्वत्ता प्राप्त होण्यास वाचनासारखें दुसरें उत्तम साधन नाहीं. वाचनानें मनुष्याच्या अंगीं शहाणपणा येतो. शहाणपणाचा उपयोग व्यवहारांत फार होतो. वाचनानें मन सुसंस्कृत होतें, व विपुल माहिती मिळते. वाचनानें बहुश्रुत झालेल्या मनुष्यास कोणतेंही काम लवकर समजतें, व वाचन न झालेल्या मनुष्यापेक्षां, तो त्यांत प्राविण्य फार लवकर मिळवितो. कारण पुष्कळ ग्रंथावलोकनानें प्रत्येक गोष्टीचीं कारणें, उपयोग व ती सिद्धीस नेण्यासाठीं तिचे भाग कसे पाडावेत, आरंभ कोठें करावा, व मधल्या अडचणी कशा निवाराव्या, हें सर्व तेव्हांच त्याच्या लक्षांत येतें. अनुभवलेला लांकूड फोड्या कठिण लांकडाची कसलीही गांठ असली तरी तेव्हांच ती फोडून टाकितो. कारण नित्याच्या अनुभवानें त्याला लांकडाच्या शिरा व वळणें हीं माहीत झालेलीं असतात. तेंच काम तुम्हीं एखाद्या

अनभिज्ञ मनुष्यास सांगितलें तर त्याला सुलभ लांकडाची एक फाळ काढण्यास बराच वेळ लागेल व तीही प्रथम नीट निघणार नाहीं. हीच गोष्ट वाचनास लागू आहे. पुष्कळ प्रकारच्या ग्रंथांच्या वाचनानें व अनुभवानें कितीही कठिण काम असलें तरी मनुष्य तें तेव्हांच अनायासें करूं शकतो.

ज्यांना पोटाकरितां कांहीं श्रम करावे लागत नाहींत, असे पुष्कळ श्रीमंत लोक आहेत. या श्रीमंतांना पुष्कळ वेळ मोकळा असतो. कारण त्यांच्या पूर्वजांनीं पुष्कळ मेह-नत करून आपल्या पोरांबाळांकरितां पुष्कळ धनसंचय केलेला असतो. यामुळें यांना खाणेंपिणें व चैन यांशिवाय कांहींही व्यवसाय नसतो. अशा लोकांना उदरनिर्वाहा-करितां शरीर झिजविण्याचें कांहीं कारण पडत नाहीं. या लोकांनातर वाचनाची आवश्यकता फार आहे. या लोकांनीं जर चांगलीं पुस्तकें वाचण्याचें व्यसन आपणांस लावून घेतलें नाहीं तर तीं हटकून दुर्गुणी होतील. श्रीमंतांचीं मुलें दुर्गुणी निघाल्याचीं बरींच उदाहरणें नित्य आपल्या पाहण्यांत येतात. याचें मुख्य कारण त्यांच्या हातांत बीभत्स कादंबऱ्या व नाटकें पडतात, व तीं वाचण्यांत त्यांचा बहुत काळ जातो, हेंच होय. याकरितां श्रीमंत लोकांच्या मुलांना चांगल्या पुस्तकांच्या वाचनाची संवय लावावी हें

उत्तम. चांगलीं पुस्तकें हीं सुसंगतीप्रमाणेंच त्यांच्या मनावर चांगला परिणाम करितील, यांत तिळमात्र संशय नाहीं. चांगलीं पुस्तकें वाचून त्यांना कालक्रमणा करण्याची संवय लागली,तर त्यांच्या हातून दुष्कृत्यें केव्हांही होणार नाहींत. त्यांस बरेंवाईट कळून, आपलें कर्तव्य कोणतें, व तें कसें बजवावें हें तेव्हांच त्यांच्या ध्यानांत येईल. ऐश्वर्य हें क्षणिक आहे, क्षणांत मनुष्य रावाचा रंक होतो, कदाचित् तीच स्थिति आपल्यास प्राप्त होणार नाहीं कशावरून ? असें निरनिराळीं चरित्रें वाचून त्यांच्या मनांत बिंबतें. त्याचप्रमाणें परोपकारांत व मनुष्यांचीं दुःखें निवारण करण्यांत द्रव्य खर्चणें हा द्रव्याचा सदुपयोग आहे, असें त्यांच्या ध्यानांत येतें, व त्यांच्या द्रव्याचा ओघ सत्कर्मांकडे वळतो. चांगल्या पुस्तकांचा परिचय जर श्रीमंतांच्या मुलांस नसेल तर ते आपलें द्रव्य नाच, तमाशे, व इतर व्यसनें यांत उधळतात. गरीब काय आणि श्रीमंत काय या दोघांनाही पुस्तकें वाचण्याचा नाद हा हवाच आहे, कारण ज्ञान हें दोघांनाही सारखेंच उपयुक्त आहे.तेव्हां कोणत्याही स्थितींत मनुष्य असला तरी त्यानें आपलें वाचन सारखें सुरू ठेवावें. प्रत्येकानें कांहीं तरी नियमित वेळ वाचनांत घालवावा.

अलीकडे छापण्याची कला निघाल्यापासून पुस्तकें हें ज्ञानवृद्धीचें साधन सर्वांस फार सोपें झालें आहे. पृथ्वीच्या

कोणत्याही भागांत कांहीं कल्पना निघाली कीं, ती सर्व देशांत लवकर पसरते; व त्या योगें सर्व मनुष्य-जातीचा फायदा होतो. छापण्याची कला निघण्यापूर्वीं पुस्तक हा पदार्थ फार दुर्मिळ होता. फक्त श्रीमंतांनाच पुस्तकें मिळत असत. गरिबांना पुस्तकें मिळण्याची फार पंचाईत पडत असे, परंतु ही अडचण आतां दूर झाली आहे. सांप्रत पुस्तकें रावापासून रंकापर्यंत मिळूं शकतात. साधारण स्थितींतील मनुष्यास सुद्धां छोटासा ग्रंथसंग्रह करितां येतो. त्याला त्या गोष्टीची हौस मात्र पाहिजे.

निरनिराळ्या विषयांवरील पुस्तकें वाचल्यानें मनुष्यास बहुश्रुतपणा येतो असें वर सांगितलेंच आहे. आतां कोणतीं पुस्तकें वाचल्यानें कोणता फायदा होतो, याचें थोडक्यांत दिग्दर्शन करितों. धर्मशास्त्र व नीतिशास्त्र वाचल्यानें मनुष्याच्या अंगीं गांभीर्य व नेमस्तपणा हीं येतात. इतिहासाच्या अभ्यासानें मनुष्य शहाणा व दूरदृष्टि होतो. खरें आहे. " पुढच्यास ठेंच, मागचा शहाणा " ही म्हण सर्वश्रुतच आहे. गणिताच्या अभ्यासानें कल्पनाशक्ति वाढते. पदार्थविज्ञानशास्त्रानें मनुष्य सूक्ष्मदृष्टि होतो. काव्याच्या वाचनानें मनुष्य रसिक होतो. भूमितीच्या अभ्यासानें मन स्थिर होतें, व कोणत्याही एका गोष्टीकडे बराच वेळपर्यंत तें आपणांस लावतां येतें. कारण सिद्धांत

सिद्ध करून दाखविण्यास आरंभ केल्यावर तो सर्व सिद्ध केल्याशिवाय अर्धासुर्धा सोडतां येत नाहीं. कारण तो अर्धवट स्थितींत सोडला तर पहिले केलेले श्रम व्यर्थ जातात. कायद्याच्या वाचनानें मनुष्याचा भोळसरपणा जाऊन तो व्यवहारचतुर होतो. कोणत्याही गोष्टीचा सूक्ष्म विचार करण्याची त्याला संवय लागते व आपल्या मताच्या पुष्टीकरणार्थ नानाप्रकारचीं प्रमाणें तो देऊं शकतो. भूगोलाच्या वाचनानें पृथ्वीवरील सर्व देशांची व स्थळांची माहिती होते. निरनिराळ्या देशांतील हवामान, फळें, पुष्पें, लोक व पशुपक्षी यांची माहिती होऊन मोठी करमणूक होते. खगोलाच्या वाचनानें आकाशांतील ताऱ्यांची व ग्रहांची माहिती होते. भूगर्भशास्त्र वाचल्यानें पृथ्वीच्या पोटांतील नानातऱ्हेच्या खनिज द्रव्यांची माहिती होते. कादंबरीच्या वाचनानें निरनिराळ्या तऱ्हेचे मनुष्य स्वभाव आपल्या नजरेस येतात. थोर लोकांच्या चरित्रांच्या वाचनानें मनुष्यांस थोर होण्याची महत्त्वाकांक्षा उत्पन्न होते, व तसें होण्याचा तो प्रयत्न करितो. वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें वाचल्यानें वर लिहिलेल्या सर्व प्रकारच्या ग्रंथावलोकनाचे सर्व फायदे एकदम होऊं शकतात. कारण चांगल्या व भारदस्त मासिकांत व वर्तमानपत्रांत वर लिहिलेल्या सर्व विषयांची प्रसंगानुसार नेहमीं चर्चा होत असते.

वर्तमानपत्रें व मासिकें हीं वाचत असतां कंटाळा येत नाहीं. कारण त्यांमध्यें मनोरंजक व नवे नवे विषय नेहमीं येत असतात. त्यांत ताज्या चमत्कारिक व आश्चर्यकारक बातम्या प्रसिद्ध होतात. त्यांत विद्वान् लोक व कसलेले लेखक नानातऱ्हेच्या प्रचलित विषयांवर टीकात्मक, विनोद-पूर्ण व विद्वत्ताप्रचुर लेख लिहितात. यामुळें अनायासें मनोरंजन होऊन ज्ञानार्जन सहज होतें; व मनुष्याचें ज्ञान व माहिती हीं अगदीं चालू तारखेपर्यंत असतात. पृथ्वी-वरील निरनिराळ्या भागांत आजला कोणत्या गोष्टी चालू आहेत, कोणत्या व्यापारांत तेजीमंदी आहे, कोणीं कोणत्या गोष्टींत नवीन शोध लाविला वगैरे सर्व विषयांचें ज्ञान होऊन प्रत्येक मनुष्याला त्या त्या मानानें फायदा होत असतो. असो. विद्यार्थ्यांनीं व तरुण मुलांमुलींनीं कोणतीं पुस्तकें व वर्तमानपत्रें वाचावीत याची निवड त्यांच्या पालकांनीं व पंतोजींनीं करून द्यावी, म्हणजे त्यांच्या हातांत भलतींसलतीं पुस्तकें व वर्तमानपत्रें पडणार नाहींत.

इंग्लंड, अमेरिका, जर्मनी वगैरे सुधारलेल्या सर्व देशां-तील बहुतेक सर्व लोकांना वाचनाचा फार नाद आहे. इंग्लंडांत घरीं ग्रंथसंग्रह असणें हा एक ऐश्वर्याचा भाग समजतात. पुष्कळ श्रीमान् लोकांच्या संग्रहीं अनेक विषयां-

वरील पुष्कळ उपयुक्त ग्रंथ असतात. " जुने कपडे वापरा, पण नवीन ग्रंथ विकत घ्या, अशी इंग्रजींत एक म्हण आहे. अगदीं खालच्या दर्जाचे लोक सुद्धां तिकडे नियमानें ताजीं वर्तमानपत्रें वाचतांना दृष्टीस पडतात. आमच्या इकडे याच्या विरुद्ध स्थिति आहे. पुस्तकें विकत घेणें म्हणजे उधळपट्टी करणें असें आपले बहुतेक लोक समजतात. असो.

खरा रसिक व विद्याप्रिय विद्वान् आपल्या पुस्तकालयांत बसून ग्रंथवाचनांत गढून गेला असतां, त्याला त्या वेळेस जो आनंद होतो, त्यापुढें त्याला जगांतील सर्व वैभवें तुच्छ आहेत. सुप्रसिद्ध इंग्लिश इतिहासकार गिबन यानें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, " मला जरी हिंदुस्थानची सर्व संपत्ति कोणीं देऊं केली तरी मी वाचनाची आवड दुसऱ्या कोणास देणार नाहीं. त्याचप्रमाणें सर जॉन हर्शल याला वाचनाची गोडी फार होती. तो म्हणतो, " ज्या गोष्टीच्या छंदानें सर्व अवस्थांत माझी समाधानवृत्ति राहील, माझ्या सर्व आयुष्यांत जिच्या योगानें मला सुख होईल, आणि सर्व त्रासापासून माझें रक्षण होईल, अशी गोष्ट ईश्वराजवळ मागण्याचा मला प्रसंग आला तर मी " वाचनप्रियता " ही गोष्ट मागेन. मग मला सर्व गोष्टी प्रतिकूळ होऊन सर्व जग जरी मजवर फिरलें तरी त्याची

पर्वा मी करणार नाहीं. आपल्या इकडे कैलासवासी जस्टिस रानडे व रावबहादूर गणेश व्यंकटेश जोशी हे दोघेही फार वाचनप्रिय होते. जस्टिस रानडे यांचें वाचन तर अगदीं अंतकाळपर्यंत चालू होतें. रा० बा० जोशी हे आपला बहुतेक सर्व वेळ वाचनांतच घालवीत असत. केव्हांही व कोणताही गृहस्थ त्यांच्या भेटीस गेला असतां ते सर्वदा वाचनांत निमग्न असेच आढळत असत. खरें आहे. पुष्कळ वाचून बहुश्रुत झाल्याशिवाय जगांत नांव-लौकिक व कीर्ति मिळत नसते.

आपले सम्राट् पंचम जॉर्ज महाराज यांचा विद्याव्यासंग फार जबर आहे. ते वाचनाचे मोठे भक्त आहेत. ते आपला सायंकाळचा वेळ पुस्तकें, मासिकें व वर्तमानपत्रें वाचण्यांत घालवितात. व त्यापासून त्यांना जितका आनंद होतो तितका आनंद त्यांना दुसऱ्या फारच थोड्या गोष्टीं-पासून होतो. असो.

सारांश, वाचनासारखें आल्हादकारक व सद्गुणवर्धक दुसरें कांहीं नाहीं म्हटलें तरी चालेल. लहान, मोठा, गरीब, श्रीमंत, पुरुष व स्त्री, या सर्वांस वाचन सारखेंच हितकारक आहे. वाचनासारखें मनोरंजक आणि ज्ञान-प्राप्तीचें सुलभ साधन दुसरें नाहीं. सबब सर्वांनीं शक्य तितका वेळ वाचनाकडे लावावा हें इष्ट आहे.

मुसलमानांचा साधु महंमद म्हणतो, " वाटेल तो प्रयत्न करून विद्येचा लाभ करून घे. न्याय व अन्याय यांतील भेद विद्येनें अधिक स्पष्ट दिसतो. स्वर्गाचा मार्ग विद्या सुलभ करिते. विद्या सुखाचें मूळ व दु:खाचें मोठें औषध होय. स्त्री असो किंवा पुरुष असो प्रत्येकाच्या कर्तव्यांत विद्याचर्चेचा समावेश झालाच पाहिजे. निर्जन प्रदेशांत विद्या मनुष्याची चिरसंगिनी आणि ओसाड भूमींत सहचारिणी होते. "

१२ कर्तव्य कर्म.

कर्तव्य कर्म अपुलें काय असे हें विचारुनि मनांत ॥
तें तें करुनि यथाविधि संपादावें भलेपण जनांत ॥ १ ॥

सुबोध आर्या.

प्रत्येक मनुष्यास कर्तव्य कर्म हें आहेच; व तें त्यानें अवश्य बजाविलें पाहिजे; कारण तें त्याचें सर्वस्व होय. आयुष्याच्या निरनिराळ्या स्थितींत निरनिराळीं कर्तव्य कर्मे मनुष्याला बजावावयाचीं असतात. लहानपणीं आई-बाप, गुरु व इतर वडील मनुष्यें यांची आज्ञा पाळणें हेंच मनुष्याचें मुख्य कर्तव्यकर्म असतें. मोठे झाल्यावर मुलांचें

पालन पोषण योग्य प्रकारें करणें, त्यांना सुशिक्षित करणें, शेजाऱ्यांस हर प्रसंगीं शक्य ती मदत करणें व दुर्दैवानें जे कोणी संकटांत सापडले असतील त्यांचें संकट निवारण करणें वगैरे अनेक लहान मोठीं कर्तव्य कर्में मनुष्याला करावयाचीं असतात. त्याचप्रमाणें सामाजिक बंधनें पाळणें व राजनिष्ठ राहून राजाचे कायदे पाळणें हें लहानथोर मनुष्याचें मुख्य कर्तव्य कर्म होय. परमेश्वरावर निष्ठा ठेवून त्याची मनोभावें नित्य नियमानें प्रार्थना करणें हें सर्वांचें श्रेष्ठ कर्तव्य आहे.

जो मनुष्य आपलें कर्तव्यकर्म उत्तम प्रकारें बजावीत नाहीं, त्याची नीतिमत्ता मलीन झाली आहे असें समजावें. प्रत्येकानें आपलें कर्तव्यकर्म नेहमीं दृष्टीसमोर ठेवून तें उत्तम प्रकारें बजावावें. कितीही अडथळे आले तरी कर्तव्यापासून पराङ्मुख होऊं नये. जे आपलें कर्तव्य बरोबर रितीनें बजावितात तेच श्रेष्ठ पदाला चढतात. विद्यार्थी दशेंत आईबाप व गुरु यांची आज्ञा पाळून विद्याभ्यास करणें हें मुलांचें मुख्य कर्तव्य होय. हें कर्तव्य करण्यांत जर पूर्व वयांत हयगय झाली, तर त्याचें प्रायश्चित्त हयगय करणाराला जन्मभर भोगावें लागतें. म्हणून प्रत्येक विद्यार्थ्यानें विद्याभ्यास करण्याचें आपलें कर्तव्य सदा उत्साहानें व नेटानें करावें, म्हणजे पुढील आयुष्य सुखांत जाईल.

ज्याला जगांत उच्च पदवीला चढावयाचें आहे, त्यानें तर आपलें कर्तव्य बजाविण्यांत फार तत्तर असलें पाहिजे. त्यानें आपलें सुख व आवडनिवड यांना बळी पडतां कामा नये, सदा उत्साहानें त्यानें आपलें कर्तव्य केलें पाहिजे. उगीच कांहीं तरी करावयाचें म्हणून रेंगाळत कोणतेंही काम करण्यापासून कवडीचाही फायदा नसतो. त्या योगें वेळाची व आपल्या .उत्साह शक्तीची माल खराबी होते. कर्तव्य कर्म करण्याच्या कामांत मनाचा पक्का निश्चय पाहिजे. त्या कामीं धरसोड असतां कामा नये. कामांत धरसोड झाली कीं, त्यांत अपयश हें खात्रीनें येणारच. कर्तव्य नेटानें व दृढ निश्चयानें करावें म्हणजे अपयश येण्याची केव्हांही भीति नसते. महान् साधु तुकाराम महाराज यांनीं म्हटलें आहे कीं " निश्चयाचें बळ, तुका म्हणे तेंचि फळ. " काम करण्याचा निश्चय केला म्हणजे फळाची निराळी आशा करावयास नको. तें आपोआप आपल्यामागें चालत येतेंच.

काम करून पोट भरणें हें प्रत्येकाचें कर्तव्य होय. कोणत्याही स्थितींत मनुष्य असो, त्याला कोणत्याना कोणत्या तरी तऱ्हेचा उद्योग केलाच पाहिजे. मग तो मनुष्य गरीब असो वा श्रीमंत असो. कित्येक श्रीमंत असे असतात कीं, ते कांहींही काम न करितां आपला सर्व काळ खाण्या-

पिण्यांत, आळसांत व चैनींत घालवितात. परंतु ही त्यांची मोठी चूक आहे. जे सदसद्विवेक बुद्धीचे श्रीमंत आहेत, ते कोणता तरी चांगला उद्योग करून समाजाची व सरकारची उत्तम प्रकारें कामगिरी बजावितात. अशा पुरुषांना ऐदी बसून खाण्याची शरम वाटते. त्यांना वाटतें कीं, परमेश्वरानें आपणांला जें ऐश्वर्य दिलें आहे, तें विनाकारण आळसांत काळ घालविण्याकरितां दिलेलें नसोन, कांहीं तरी परोपकाराचीं कृत्यें करण्याकरितां दिलें आहे. त्यांचें हें वाटणें न्यायाचें आहे. कारण परोपकारासारखीं सत्कर्मे करणें हें श्रीमंतांचें पवित्र कर्तव्य होय. हें दृष्टीसमार ठेवून प्रत्येक श्रीमंतानें आपलें वर्तन ठेवावें. आळसांत वेळ घालवून अगदीं कुचकामाचें ठरणें हें लांच्छनास्पद आहे.

जो आपलें कर्तव्य योग्य प्रकारें बजावीत नाहीं त्याला सुख केव्हांही लागत नाहीं. कारण त्याचें मन नेहमीं त्याला खात असतें. याचा अनुभव थोडाबहुत प्रत्येकाला असतोच. विद्यार्थी दशेंत तर हा अनुभव बराच वेळ आलेला असतो. ज्या दिवशीं गुरुजींनीं नेमून दिलेला धडा उत्तम तऱ्हेनें आपण केलेला असतो, त्या दिवशीं आपल्या मनाला किती तरी समाधान वाटतें. परंतु ज्या दिवशीं खेळण्यांत अगर आळसांत वेळ घालविलेला असतो, व त्यामुळें गुरुजींनीं नेमून दिलेला पाठ झालेला नसतो त्या दिवशीं मनाला

किती तरी रुखरुख लागलेली असते. या दोन स्थितींची तुलना प्रत्येकानें आपल्या मनाशींच करावी म्हणजे ज्याचें त्यालाच असें कळून येईल कीं, कर्तव्य करण्यांतच खरें सुख आहे. कर्तव्याची टाळाटाळी करण्यांत सुख नाहीं. सर वॉल्टर स्कॉट म्हणतो " ज्या दिवशीं आपण आपलें कर्तव्य उत्तम तऱ्हेनें बजावितों त्या दिवशीं आपल्याला गाढ झोंप येते. व अशा गाढ झोपेंतून आपण निजून उठलों म्हणजे आपल्या मनाला फार समाधान वाटतें." खरें आहे. कर्तव्य केल्यावर विश्रांति घेतली म्हणजे जसें समाधान वाटतें, तसें समाधान कर्तव्य न बजावितां आळसांत पडून राहण्यानें बिलकूल वाटत नाहीं.

कित्येक चाकर लोक आपल्या कामांत फार हेळसांड व हयगय करितात. परंतु ही त्यांची मोठी चूक आहे. कारण नशिबानें म्हणा, अगर पूर्व वयांत कमी उद्योग केल्यामुळें म्हणा, ज्याला जी स्थिति प्राप्त झाली असेल त्यानें त्या स्थितीला अनुरूप असें आपलें वर्तन ठेविलें पाहिजे, व त्या स्थितींतील कर्तव्य त्यानें योग्य प्रकारें केलें पाहिजे. असें केलें म्हणजे धनी व चाकर या दोघांनाही सुख लागतें. नोकरानें आपलें काम योग्य रितीनें बजावून धन्याशीं अदबीनें वागलें पाहिजे. धन्यानें चाकराशीं सभ्यपणाचें व ममतेचें वर्तन ठेविलें पाहिजे. अशा

रितीनें धनी चाकरांशीं वागला असतां चाकर बहुधा कामांत चुकवाचुकव करीत नाहींत. इतकेंच नव्हे तर प्रसंग-विशेषीं ते धन्याकरितां आपला प्राणही खर्चीं घालण्यास तयार होतात. अशीं धन्याकरितां प्राण खर्चीं घातलेलीं उदाहरणें इतिहासांत पुष्कळ सांपडतात. यावरून असें सिद्ध होतें कीं,अमुक स्थितींतील माणसांनीं कर्तव्य बजाविलें पाहिजे असें नाहीं. तर तें सर्व स्थितींतील माणसांनीं सर्व कामांत व सर्व काळ बजाविलें पाहिज.

जो आपलें कर्तव्यकर्म उत्तम तऱ्हेनें बजावितो, तो बहुधा केव्हांही खोटें बोलत नाहीं, व त्याला खोटें बोलण्याचा प्रसंगच येत नाहीं. कारण त्याची वागणूक नेहमीं चोख असते, व तो खोटीं वचनें केव्हांही देत नाहीं. तो आपलें प्रत्येक काम योग्य वेळीं व योग्य दिशेनेंच करीत असतो. कर्तव्याकडे ज्यांचे लक्ष आहे त्यांच्या हातून केव्हांही अन्याय घडत नाहीं. इंग्लिश राष्ट्र आज वैभवाच्या शिखरास जाऊन पोंचलें आहे. याचें कारण इंग्लिश लोक आपलें कर्तव्यकर्म उत्तम तऱ्हेनें बजावितात, हेंच होय. ब्रिटिश लोकांसारखे कर्तव्यतत्पर लोक या जगाच्या पाठीवर फार थोडे आहेत. ब्रिटिश लोक इतके कर्तव्यदक्ष आहेत कीं, ते आपलें कर्तव्य बजावीत असतां ऐश्वर्याची किंबहुना जिवाची देखील पर्वा बाळगीत नाहींत. पंचम जॉर्ज महराज

यांच्याशीं पूर्ण परिचित असलेला एक गृहस्थ म्हणतो कीं, " अशी कोणतीही गोष्ट नाहीं कीं, जी कर्तव्याला तत्पर होण्याचे समयीं बादशहा दूर लोटणार नाहींत. म्हणजे आपले बादशहा स्वकर्तव्यापेक्षां इतर सर्व गोष्टी कमी दर्जाच्या समजतात. त्यांचें चरित्र मोठें मनोवेधक असून कित्ता घेण्यासारखें आहे. तें स्थलसंकोचास्तव समग्र येथें देणें शक्य नाहीं, म्हणून अगदीं थोडक्यांत पुढें देत आहें. त्यापासून सर्वांनीं बोध घ्यावा.

आपणाला जें कांहीं करावयाचें असेल तें मन लावून करावें. काम कितीही क्षुल्लक असलें तरी, तें एकदां हातीं घेतलें तर आपल्या हातून होईल तितक्या चांगल्या रीतीनें करण्यास झटावें. पैशासाठीं काम करणाराला गुलामासारखें खपावें लागतें; परंतु कर्तव्य म्हणून काम करणारा स्वतंत्र मनुष्यासारखा उद्योग करतो आणि यशस्वी होतो.

बादशहा पांचवे जॉर्ज.

जॉर्ज महाराजांचा जन्म इ. स. १८६५ सालीं, जूनच्या तिसऱ्या तारखेस इंग्लंड देशांत झाला. त्यांचें बाळपणचें शिक्षण पुरें झाल्यावर त्यांना आरमारसंबंधीं शिक्षण देण्यास ब्रिटानिआ नांवाच्या लढाऊ जहाजावर ठेविलें. त्या वेळीं

त्यांचें वय केवळ बारा वर्षांचें होतें. तेथें ते राजपुत्र म्हणून कधीं थाटानें वागले नाहींत. ते इतर शिकणाऱ्या उमेदवाराप्रमाणें सकाळीं साडेसहा वाजण्यापूर्वींच उठत असत, व आपलें नेमलेलें काम बिनचूक करीत. तेथें त्यांनीं दोन वर्षें सक्त मेहनत घेऊन, तेथील शिक्षण संपादन केलें. दोन वर्षें त्या जहाजावर पुस्तकी व प्रत्यक्ष शिक्षण झाल्यावर त्यांस दुसऱ्या एका लढाऊ जहाजावर ठेवून नानाप्रकारची माहिती होण्यासाठीं प्रवासास नेण्यांत आलें. सुमारें तीन वर्षें त्यांच्याकडून प्रवास करविल्यावर ते परत स्वदेशीं गेले जॉर्ज महाराज एवढ्या मुदतींत ब्रिटिश अमलाखालच्या बहुतेक देशांत सफर करून आले. या प्रकारें जहाजावर शिक्षण घेण्याकरितां ते प्रवास करीत असतांना त्यांना अगदीं साध्या कामगाराप्रमाणें सर्व कामें करावीं लागत. परंतु तीं करण्यास ते कधींही मागें घेत नसत. ते तीं आपलें कर्तव्य म्हणून उत्साहानें करीत. दुसऱ्यानें " मी आपलें काम करितों " असें त्यांना म्हटलें तर महाराजांना मोठा राग येत असे. रात्रीचा पहारा करण्याचें त्रासाचें कामही ते नियमितपणें व अगदीं शिस्तीनें करीत. कधींही चुकवाचुकव अगर हेळसांड करीत नसत. एकदां ते याप्रमाणें प्रवासांत असतां एका बंदरांत तुर्कस्थानचे बादशहा त्यांस भेटण्यासाठीं त्यांच्या जहाजावर आले. तों हे युवराज

इतर कामगारांप्रमाणेंच कोळशाच्या धुरानें मळकट झालेला पोषाख घालून इतर खलाशांबरोबर हौसेनें व नेटानें काम करीत आहेत, असें त्यांस दिसलें. तेव्हां ते तुर्कस्थानचे बादशहा अगदीं आश्चर्यचकित झाले. जॉर्जमहाराजांनीं आपल्या मित्रमंडळीस अशी ताकीद दिली होती कीं, " तुम्ही मला राजपुत्र या नात्यानें येथें लेखित जाऊं नका. मी राजपुत्र म्हणून येथें आलों नाहीं. तुम्ही जसे विद्यार्थी तसाच मी तुमच्या संगतींत विद्या संपादन करण्यासाठीं आलों आहें. "

प्रवासशिक्षण झाल्यावर ते परत इंग्लंडांत गेले व आरमारासंबंधी वरच्या दर्जाचें शिक्षण घेण्यासाठीं कॉलेजांत जाऊं लागले. तेथें त्यांनीं इतरांप्रमाणेंच झटून अभ्यास केला व सर्व परीक्षा देऊन उत्तम नांव मिळविलें. पुढें त्यांनीं वेगळाल्या जहाजांवर निरनिराळ्या हुद्यांचीं कामें, आपलें कर्तव्य म्हणून उत्तम रीतीनें बजावून आपल्या परीक्षकांस खूष केलें.

सन १८९३ सालीं त्यांचा प्रिन्सेस मेरी ऑफ टेक यांच्याशीं विवाह झाला. त्या त्यांच्या पत्नी, आपल्या महाराणी मेरी ह्या होत. ह्या महाराणीसाहेबही आपल्या पतीप्रमाणेंच सर्वगुणसंपन्न आहेत. महाराजांस संतति सुखही चांगलें आहे. सन १९११ च्या जून महिन्यांत

महाराजांना राज्याभिषेक झाला. सन १९११ च्या दिसेंबर महिन्याच्या बाराव्या तारखेस त्यांनीं हिंदुस्थानांत " न भूतो न भविष्यति " असा प्रेक्षणीय व प्रचंड ' दिल्लीदरबार' भरवून स्वमुखानें आपण राज्यसूत्रें घेतल्याचें जाहीर केलें.

सारांश, आपले वैभवशाली सार्वभौम पंचम जॉर्ज महाराज हे संतति, संपत्ति, विनय व विद्या वगैरे सर्व गुणांनीं संपन्न असून प्रजापालनदक्ष आहेत. अशा कर्तव्यदक्ष राजाला पुढें लिहिलेला वेदोक्त आशीर्वाद कोण देणार नाहीं ? अर्थात् सर्व देतीलच देतील. तो आशीर्वाद हा—

" हे महाराजा, आपण अढळ सिंहासनावर बसलां आहां. या देशावर सुखानें राज्य करा. आपण अढळ असा. आपण कायम असा. आम्ही सर्व प्रजाजन तुमचें कल्याण चिंतूं. तुमच्याशीं राजनिष्ठपणें वागूं. आपलें साम्राज्य कधींही क्षीण न होवो. "

" आपण पर्वताप्रमाणें अचल रहा. इंद्राप्रमाणें अचल रहा. व राज्य चालवा. "

" आकाश अढळ आहे. पृथ्वी अढळ आहे. पर्वत अढळ आहेत. हें सर्व विश्व अढळ आहे. त्याचप्रमाणें आम्हां प्रजाजनांचा हा राजा पंचम जॉर्ज अढळ होवो."

तथास्तु.

१३ सदाचरण.

कार्याकार्य विवेकीं । शास्त्रेंचि करावीं पारखीं ॥

ज्ञानेश्वर.

भावार्थः—काय करावें, काय न करावें हें ठरविण्याला शास्त्रांचाच आधार घेतला पाहिजे.

संस्कृत भाषेंत मनुस्मृति नांवाचा एक उत्तम ग्रंथ आहे. त्यांत सनातन म्हणजे सर्वकालीं व सर्वांस मान्य अशा धर्माचें प्रतिपादन केलें आहे. त्यांत मनुष्यानें नेहमीं सदाचरणानें म्हणजे नीतीनें वागाव म्हणून सांगितलें आहे, व सदाचरणाचे पुष्कळ नियम घालून दिले आहेत. त्यांपैकीं थोडेसे नियम येथ दता. कारण, ते नीतीचे प्रत्यक्ष मार्गदर्शक आहेत.

शास्त्राला विरुद्ध नाहीं, अथवा शास्त्राने निषिद्ध मानलेलें नाहीं, असें कोणतेंही मनास संतोष देणारें कर्म करावें. विषापासून अमृत प्राप्त झाल्यास घ्यावें, तसेंच सुभाषित लहान मुलापासूनही घ्यावे. शत्रूपासूनही सदाचरण शिकावें. अनिंद्य अशीं जीं स्वकर्मे तीं करून कुटुंबसंरक्षणाकरितां द्रव्यसंचय करावा. वय, कर्म, द्रव्य, पूर्वज व बुद्धि यांस

योग्य असें आचरण करावें. नेहमीं शास्त्रांचा अभ्यास करीत असावें. पाण्यांत, पाण्याशेजारीं लघुशंका, शौचविधि करूं नये, पाण्यांत थुंकूं नये, अपवित्र पदार्थ लागलेलें असें दुसरें कांहींच पाण्यांत टाकूं नये; तसेंच रक्त अगर विषारी पदार्थ पाण्यांत टाकूं नये. विनाकारण मातीनें हात मळवूं नयेत. निष्फळ किंवा ज्यापासून पुढें दुःख होईल असें कर्म करूं नये. शुष्क वैर अथवा भांडणतंटा कोणाशीं करूं नये.

अंगविकल (म्हणजे ज्यांच्या अवयवांत कांहीं व्यंग आहे उदाहरणार्थ डोळे नसणें, नाक नकटें असणें वगैरे) अधिकांग (म्हणजे आवाळू वगैरे असलेले), म्हातारे,कुरूप व भिकारी यांची निंदा करूं नये.

श्रेष्ठ लोक आपल्या घरीं आले असतां त्यांचें अभिवंदन करावें. आपलें आसन त्यांस बसावयास द्यावें, व जाते वेळीं त्यांस पोहोंचवावयास जावें. सदाचारानें आयुष्य वाढतें, संतति चांगली होते, संपत्तीचा क्षय होत नाहीं, व अवलक्षण म्हणजे वाईटपणा नाहींसा होतो. दुराचारी मनुष्याची लोकांत निंदा होते, त्यास नेहमीं दुःख होतें, रोग होतात व त्याचें आयुष्य क्षीण होतें. मनुष्य सदाचार-युक्त, आस्तिक व परदोष न काढणारा असा असला तर तो चिरायु होतो. जें कर्म करतांना मनुष्याचा अंतरात्मा

संतुष्ट होईल तें प्रयत्नानें करावें, याच्या उलट असेल तें वर्ज्य करावें. नास्तिकपणा, धर्मनिंदा, द्वेष, ढोंग, गर्व, क्रोध, तीक्ष्णता, हीं टाकावीं. पुत्र आणि शिष्य यांशिवाय दुसऱ्या कोणावर काठी उगारूं नये; राग आला तरी कोणासही मारूं नये; शिक्षणाकरितां मात्र पुत्र आणि शिष्य यांना ताडन करावें.

अधार्मिक व पापी यांचा लौकर नाश होतो, म्हणून धर्माचरण करीत असतां दुःख प्राप्त झालें तरी, अधर्माचरण करण्याचें मनांत सुद्धां आणूं नये. अधर्माचें फल हलके हलके वाढून कर्त्याचा समूळ नाश करितें. सत्य, धर्म, सदाचार यांची आवड धरावी. वाक्संयम, (असत्य न बोलणें) बाहुसंयम, (परपीडा न करणें) आणि उदरसंयम (मिताहार करणें) हें ठेवावें; हस्तचापल्य, (विनाकारण हात नाचवून चाळे वगैरे करणें) पादचापल्य, (उगाच मनाला येईल तसें भटकणें) वाक्चापल्य, (परनिंदा, शिव्या वगैरे देणें) दुसऱ्याचा नाश करणें किंवा नाश करण्याचें मनांत आणणें, या गोष्टी करूं नयेत. ज्या सन्मार्गानें आपले पूर्वज गेले, त्या चांगल्या मार्गानें चालावें; त्यानें चाललें असतां नाश होत नाहीं. थोडी थोडी माती आणून मुंग्या वारूळ करितात, त्याप्रमाणें कोणत्याही प्राण्यास पीडा न देतां परलोकसाहाय्याकरितां हळूहळू

धर्मसंचय करावा. धर्म एकटा मनुष्याबरोबर परलोकीं जातो. धर्मरूप मित्राच्या योगानें मनुष्य दुस्तर अशा दुःखांतून पार पडतो. ज्यास आपल्या कुळाचा उत्कर्ष करणें असेल त्यानें उत्तमाशीं संबंध ठेवावा; नीचाशीं कोणत्याही प्रकारें संबंध ठेवूं नये. आरंभिलेलें सत्कार्य निश्चयानें तडीस नेणारा कृपाळु, सहनशील, दुष्टसंग न करणारा, हिंसा न करणारा, जितेंद्रिय, (ज्यानें आपलीं इंद्रियें जिंकलीं आहेत) व दान करणारा असा मनुष्य स्वर्गाप्रत जिंकील. जागा स्वच्छ आहे असें पाहून पाऊल टाकावें. पाणी वस्त्रानें शुद्ध करून म्हणजे गाळून प्यावें. सत्यानें पवित्र असें भाषण करावें. मनास पवित्र वाटेल असें आचरण करावें. लोकांनीं अद्वातद्वा बडबड केली तरी सोसून घ्यावी. कोणाचाही अपमान करूं नये. क्षणिक देहास्तव कोणाशींही वैर करूं नये. स्वहित इच्छिणारे असे जे दुःखी, बाल, वृद्ध, रोगी यांनीं निंदा केली तरी समर्थानें सोसून घ्यावी दुःखितांनीं निंदा केली असतां जो सोसतो तो स्वर्गलोकीं मान्य होतो, जो ती ऐश्वर्यमदानें सहन करीत नाहीं, तो नरकास जातो. कर्माचें बरेंवाईट फळ मरणानंतर प्राप्त , मनांत वागवून मनुष्यान मन, वाणी, शरीर यांच्या योगानें सर्वदा शुद्ध कर्म करावें. सदाचरणानें कुल चांगलें रहातें.

परस्त्री मातेप्रमाणें समजावी. परद्रव्यास वांतीप्रमाणें तुच्छ मानावें व सर्व प्राण्यांस आपणाप्रमाणें समजावें.

सदाचरण पुढें चालू.

जॉर्ज वॉशिंगटन या नांवाचा एक थोर पुरुष अठराव्या शतकांत अमेरिकेंत होऊन गेला. जगांत स्वपराक्रमानें जे पुरुष उदयास आले व मोठी योग्यता पावले त्यांत जॉर्ज वाशिंगटन याची गणना प्रमुखत्वानें करितात. "मनुष्यानें कसें वागावें" याविषयीं त्यानें पुष्कळ नियम घालून दिले आहेत. त्यांतील कांहीं येथें देतों.

"दुसऱ्याच्या व्यंगाबद्दल त्यास दोष देऊं नको. कारण असें करण्याचा अधिकार फक्त वडील, गुरु आणि वरिष्ठ यांचा आहे. दुसऱ्याविषयीं वाईट गोष्टी बोलूं नको, किंवा एखाद्याची फार प्रशंसाही करूं नको. कोणाशीं तुटकपणानें वागूं नको. सर्वांशीं ममतेनें व आदरानें वाग. दुसऱ्यानें तुला नमस्कार करण्यापूर्वीं तूं त्याला आधीं नमस्कार कर. नीट ऐकून घेऊन शांतपणानें उत्तर देत जा. कोणी बोलावयास आलें असतां कपाळाला आंठ्या घालूं नको. दुसऱ्याचे मनास क्लेश होतील असे शब्द थट्टेनें किंवा मनापासून बोलूं नको. कोणाला तुच्छ मानूं नको. आपले पराक्रम, आपले गुण, व आपली थोरवी लोकांपुढें

मिरवूं नको. असभ्य गोष्टीचा उच्चार करूं नको. तुझ्या भाषणास द्वेष आणि हेवा ह्यांचा वाराही लागूं देऊं नको. रस्त्यांत कांहीं खाऊं नको. तुझी मान्यता व्हावी असें तुला वाटत असेल तर चांगल्या माणसांची संगत धर. वाईट लोकांची संगत असण्यापेक्षां मुळींच संगत नसणें फार चांगलें. आपला पोषाख नीटनेटका आहे कीं नाहीं, तो सुंदर दिसतो कीं नाहीं हें पाहण्यासाठीं वारंवार मोरासारखा मुरडूं नको. रस्त्यांतून चालतांना धांऊं नको, किंवा अगदीं हळू चालूं नको. तुझा पोषाख साधा असूं दे. लोकांनीं आपल्या पोषाखाकडे पाहून आपणास वाखाणावें यापेक्षां तो शरीर संरक्षणास जास्त उपयोगी कसा होईल याकडे तुझें लक्ष असूं दे. आपल्या अंगावरचे कपडे कसे तरी घालूं नको. त्यांच्या वरचा मळ नेहमीं झाडीत जा. घाणेरड्या जागीं जाऊं नको. कोणास शाप देऊं नको अगर त्यास अभद्र बोलूं नको. ज्या गोष्टी न करण्याबद्दल तूं दुसऱ्यास उपदेश करतोस त्या तूं स्वतः करूं नको. कारण उपदेशापेक्षां उदाहरण लोकांत जास्त फैलावतें. कोणाहीबरोबर संभाषण करतांना त्याचा दर्जा पाहून त्याच्याशीं वर्तन कर. तुझ्यापेक्षां जे थोर असतील त्यांच्याशीं वाद घालूं नको; पण तुझें मत नम्रपणें त्यांच्या पुढें मांड. तुझ्यापेक्षां मोठ्या दर्जाचा गृहस्थ तुला भेटल्यास तूं उभा रहा,

आणि दरवाज्यांत किंवा मार्गांत त्याची गांठ पडल्यास तूं बाजूला होऊन त्यास वाट दे. समारंभांत मर्यादा सोडून बसूं नको, किंवा वागूं नको. तुझ्या शत्रूला सुद्धां संकटांत मदत कर. नेहमीं आनंदी मुद्रा ठेव, परंतु महत्त्वाच्या गोष्टींत गंभीर मुद्रा असूं दे. दुसरा पत्र लिहीत असतां तें तूं पाहूं नको. काणाचा ताडपुजेपणा करूं नको. कोणाची थट्टा करूं नको.आपलीं नखें दांत व हात स्वच्छ ठेव.मान व पाय किंवा मांड्या हालवूं नको. डोळे फिरवूं नको. तोंड वांकडें करूं नको, आणि दुसऱ्याच्या तोंडाजवळ तोंड नेऊन बोलूं नको. दुसरे लोक जवळ असतां अंगास आळे पिळे देऊं नको, आणि दांतांनीं नखें कुरतुडूं नको. बिस्तवा-वर थुंकूं नको. बाकीची मंडळी बोलत असतां तूं निजूं नको. जे भाग तूं सहसा उघडे ठेवीत नाहींस त्या भागांस मंडळीमध्यें हात लावूं नको. तुझी करमणूक आणि खेळ माणुसकीला शोभतील असे असूं देत. त्यांना पापाचा स्पर्श होऊं देऊं नको. देवाविषयीं आणि देवाच्या गुणां-विषयीं बोलतांना अंतःकरणापासून आणि आदरानें बोल. आपले आईबाप गरीब असले तरी त्यांचा मान ठेव आणि त्यांच्या आज्ञेंत रहा. कांहीं झालें तरी जेवावयाच्या वेळीं रागावूं नको. कारण जेवतांना आनंद असला म्हणजे साधे पदार्थ देखील मोठ्या पक्कान्नासारखे वाटतात. आधाशा-

सारखा खाऊं नको. आणि खाण्याच्या अन्नास नांवें ठेवूं नको. आपल्याहून जाणतीं माणसें कोणापाशीं बोलत असतां तेथें जाऊन ऐकूं नको, व बोलूं नको. जें तुला करतां येणार नाहीं तें करण्याचें पतकरूं नको. बोलण्यापूर्वी विचार कर. शब्द अर्धवट उच्चारूं नको, किंवा फार घाईनें बोलूं नको. सावकाश आणि स्पष्ट बोल.

× × × ×

दुःख परासि न द्यावें सत्य वदावें क्षमा न सोडावी॥
जोडावी कीर्ति जनीं नय-मर्यादा कदा न मोडावी ॥

सुबोध आर्या.

समाप्त.

शुद्धिपत्र.

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१५	१०	ना त्रिष्णुः	नाऽविष्णुः
२०	१६	प्रजनही	प्रजेनेंही
२५	५	काण	कोण
२८	११	आम्हा	आम्हीं
,,	१२	खाव	खावें
,,	१३	मोठ्य	मोठ्या
३२	२०	मलाच	मुलाचे
३३	१६	पवतापेक्षां	पर्वतापेक्षां
३४	६	अस	असें
४३	१२	सीब	सैबी
८४	१	पसा	पैसा
९३	१४	त	तूं
१२९	१०	दृष्टीसमार	दृष्टीसमोर
१३२	१६	जम्म	जन्म
१३६	७	वागाव	वागावें
,,	९	येथ	येथें
,,	९	दता	देतों
१३७	२०	परदाष	परदोष
१३९	२	धमरूप	धर्मरूप
,,	१८	,,	होतें हें
,,	१९	मनुष्यानं	मनुष्यानें
१४२	६	काणाचा	कोणाचा
,,	६	ताडपुजेपणा	तोंडपुजेपणा